# केपे परिसरातील दैवतविषयक लोककथांचा अभ्यास

## (Kepe Parisratil Daivatvishyk Lokkathancha Abhyas)

**एम.ए. (मराठी) पदवीसाठी सादर केलेली संशोधन प्रबंधिका**

**MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION**

**मराठी अध्ययनशाखा**

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

**गोवा विद्यापीठ**


अभ्यासक

**पूर्वा प्रसाद शिरोडकर**

हजेरी क्र. 22P0190023

ABC ID 613188012341

पी. आर 201912241

मार्गदर्शक

**डॉ. हेमंत बाळकृष्ण अय्या**

(सहायक प्राध्यापक)

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

मराठी अध्ययनशाखा


गोवा विद्यापीठ

**शैक्षणिक वर्ष 2023 – 2024**

# KEPE PRISRATIL DAIVATVISHYK LOKKATHANCHA ABHYAS

**Submitted in partial fulfilment of Masters Degree**

**MA in Marathi**

**MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION**

**Marathi Discipline**

Shenoi Goembab School of Language & Literature

**Goa University**

by

**Purva Prasad Shirodkar**

Seat No: 22P0190023

ABC ID: 613188012341

PRA: 201912241

Under the supervision of

**Dr. Hemant Aiya**

(Assistant Professor)

**Marathi Discipline**

Shenoi Goembab School of Language & Literature

**Goa University**

**2023 – 2024**

## DECLARATION BY STUDENT

I hereby declare that the data presented in this Dissertation report entitled, "केपे परिसरातील दैवतविषयक लोककथांचा अभ्यास" is based on the results of investigations carried out by me in the Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University under the Supervision of Dr. Hemant B. Aiya and the same has not been submitted elsewhere for the award of a degree or diploma by me. Further, I understand that Goa University or its authorities will be not be responsible for the correctness of observations/experimental or other findings given the dissertation.

I hereby authorize the University authorities to upload this dissertation on the dissertation repository or anywhere else as the UGC regulations demand and make it available to any one as needed.

Shirodkar

**(Purva Prasad Shirodkar)**

22P0190023

Date: 15/04/2024

Place: Goa University

## COMPLETION CERTIFICATE

This is to certify that the dissertation report **"केपे परिसरातील दैवतविषयक लोककथांचा अभ्यास"** is a bonafide work carried out by **Ms. Purva Prasad Shirodkar** under my supervision in partial fulfilment of the requirements for the award of the degree of Master of Arts in the Discipline Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University.

15/04/2024

Dr. Hemant B. Aiya

Date: 15/04/2024

Signature of Dean of the School

School Stamp

Date: 25/04/2024

Place: Goa University

# मनोगत

'केपे परिसरातील दैवतविषयक लोककथांचा अभ्यास' याविषयी गोवा विद्यापीठाच्या एम.ए.(मराठी) पदवीसाठी संशोधन प्रबंधिका सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे. एम. ए. भाग एकमध्ये असताना आम्हाला प्राध्यापक जयेश गावकर सर लोकसाहित्य विषय शिकवायचे. त्यावेळी आम्हाला लेखक 'सूर्यकांत आजगावकर' यांचे 'कोकणातील लोककथा' हे पुस्तक अभ्यासासाठी लावलेले. त्यात अनेक प्रकारच्या कथा होत्या. त्यातील दैवत लोककथा वाचल्यावर माझ्या मनातही आपल्या गावातील दैवत लोककथांचा अभ्यास करण्याची इच्छा प्रकट झाली.

सुरुवातीला प्राध्यापिका पूर्वा वस्त मॅडमकडे याविषयावर माझे बोलणे झाले. त्यांनी मला 'चंद्रेश्वर भूतनाथ दैवताचे २२ गणांचा अभ्यास' तसेच इतर लोकसाहित्यातील विषय सुचवले, आणि लोकसाहित्याच्या अभ्यासासाठी डॉ. हेमंत अय्या सर आणि प्रा. जयेश गावकर सर मार्गदर्शक म्हणून निवडण्यास सुचवले. एम.ए भागच्या दुसऱ्या वर्षाच्या सुरुवातीला मी निवडलेल्या संशोधन कार्याला मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. हेमंत अय्या सर मार्गदर्शक म्हणून मला लाभले. डॉ. हेमंत अय्या सरांशी चर्चा करून मी 'केपे परिसरातील दैवतविषयक लोककथांचा अभ्यास' असा विषय निवडला. त्यानंतर सरांनी प्रकरणाची मांडणी कशी असेल, यावर चर्चा करून प्रथम संकलन पूर्ण करायला सांगितले.

केपे परिसरात अनेक दैवतविषयक लोककथा समाजात प्रचलित आहेत. केपे परिसरातील काही महत्त्वपूर्ण दैवतांच्या कथा त्यांच्या देवस्थानातील संपादकीय पुस्तकात छापलेल्या आहेत. पण या परिसरातील लोकदैवत कथा कुठेही छापलेल्या नाहीत. या कथा त्या एकच गावापुरत्या सीमित असलेल्या दिसतात. त्यामुळे या कथांविषयी अभ्यास करून त्या कथा इतरांपर्यंत पोहोचवणे मला महत्त्वाचे वाटले. या परिसरातील दैवताविषयी असलेली आत्मीयता, विधी, सण-उत्सव विषयी जाणून घेण्याची उत्सुकतामुळे मी हा विषय निवडला. केपे परिसरातील लोकसाहित्याविषयी सातत्याने लेखन करणारे उल्हास प्रभू देसाई, प्रा.आशा मणगुतकर, डॉ.जयंती नायक आणि बा.द सातोस्कर या अभ्यासकांचे स्थळ संबंधित लेखनातून मला माझ्या संशोधन कार्यात मदत मिळाली.

लोकसाहित्याच्या संशोधनात महत्त्वाचे काम म्हणजे संकलन होय. 'केपे' हा माझा परिचयाचा परिसर असून देखील संकलन करताना अनेक अडचणी समोर आल्या. सर्वेक्षणामध्ये माझ्यासोबत माझे बाबा श्री. प्रसाद शंभू शिरोडकर आणि माझा भाऊ कु. शिवम प्रसाद शिरोडकर हे दोघे होते. तसेच माझ्या जवळच्या गावातील दैवतकथांचे संकलन करताना माझी आई सौ. प्रांजली प्रसाद शिरोडकर माझ्यासोबत होती. माझ्या बाबाचे मित्र विनय खोलकर, लवू घाडी, आणि विकास रायकर यांनी मला खूप मदत केली. या सर्वांच्या शिवाय हे सर्वेक्षण होणे शक्य नव्हते.

या संशोधनाच्या अभ्यासासाठी अनेक ग्रंथालयांना भेटी देण्यात आल्या. विशेष करून गोवा विद्यापीठ ग्रंथालय, सरकारी तालुका वाचनालय कुडचडे, सरकारी तालुका वाचनालय केपे, कृष्णदास शामा सरकारी केंद्रीय वाचनालय पणजी आणि शासकीय महाविद्यालय कला, वाणिज्य आणि विज्ञान केपे या ग्रंथालयातील ग्रंथसंपदा माझ्या या संशोधनासाठी उपयुक्त ठरली. त्यासाठी मी या सर्व संस्थेचे मनापासून आभारी आहे. तसेच मराठी विभागातील सर्व कर्मचारीवर्गाचे ही मला सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. या संशोधनकार्यात सर्वात महत्त्वाचे स्नेहशील, मौलिक आणि सदैव आम्हाला प्रेरक करणारे, ज्यांच्या मार्गदर्शनामुळे माझ्या अभ्यासाला दिशा आणि संशोधनाची शिस्त प्राप्त झाली ते म्हणजे माझे मार्गदर्शक डॉ. हेमंत बाळकृष्ण अय्या सरांचे मी आभार मानते. माझ्या या संशोधन कार्याला प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे ज्या-ज्या व्यक्तींनी मला मार्गदर्शन, सहकार्य केले, प्रोत्साहन दिले. त्या सर्वांचे तसेच कुटुंबीयांचे, मित्रांचे मी अत्यंत ऋणी आहे.

माझे कुलदैवत श्री शिवनाथ, ग्रामदेवता श्री धानुघाडी, श्री वेताळ, श्री चंद्रेश्वर भूतनाथ आणि इतर केपे परिसरातील दैवतांच्या चरणी वंदन करून ही प्रबंधिका मी गोवा विद्यापीठाच्या मराठी अध्ययन शाखेला सुपूर्त करत आहे.

पूर्वा प्रसाद शिरोडकर

१५/०४/२०२४

# केपे परीसरतील दैवतविषयक लोककथांचा अभ्यास

## अनुक्रमणिका


| प्रकरण क्र. | प्रकरण | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| Declaration | | |
| Completion certificate | | |
| मनोगत | | |
| प्रस्तावना | | १-४ |
| १. | **लोकसाहित्य, लोकवाङ्मय आणि लोककथा** | ५-२४ |
| २. | **केपे परिसरातील लोकसंस्कृती आणि लोकजीवन** | २५-४५ |
| ३. | **केपे परिसरातील दैवते आणि लोकदैवते** | ४६-६४ |
| ४. | **केपे परिसरातील लोकदैवतकथांचा अभ्यास** | ६५-९८ |
| ५. | **निष्कर्ष** | ९९-१०२ |
| परिशिष्ट | | १०३-१४१ |
| संदर्भसूची | | १४२-१४५ |

# प्रस्तावना

या प्रबंध लेखनाचा विषय “केपे परिसरातील दैवतविषयक लोककथांचा अभ्यास” असा असून त्यातून केपे परिसरातील लोकदैवतविषयीच्या कथांचा अभ्यास होणार आहे. लोकसाहित्य म्हणजे लोकांनी मौखिक परंपरेने जपलेले साहित्य, या साहित्याच्या माध्यमातून लोकसंस्कृतीचे प्रातिनिधिक दर्शन घडत असते. लोकसाहित्यातून समुहमनाचा आविष्कार होतो. कथा सांगणे आणि कथा ऐकणे ही मानवी जीवनातील परंपरागत आवड आहे. लोककथा ही मौखिक परंपरेने चालत आलेली आहे. मौखिक परंपरेने समाजामध्ये प्रचलित असलेल्या कथेला लोककथा म्हणतात. कथा व गीतकथा असे दोन प्रकार त्यामध्ये येतात. लोककथामध्ये दैवतलोककथा हे समाजातील लोकजीवनाचा केंद्रबिंदू असतो.

लोकसाहित्याचा अभ्यास करत असताना दैवतलोककथांचा अभ्यास करणे आवश्यक असते. प्रत्येक दैवतकथेमागे एक कार्य (हेतू, श्रध्दा) असतो. मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ही लोककथा संक्रमित होत असते. हा अभ्यास फक्त ग्रंथालयात बसून पूर्ण करणे शक्य नसते. क्षेत्रीय अभ्यास हा या विषयाचा गाभा आहे. कित्येक जागृत दैवतांची कृपा केपे परिसराला लाभलेली आहे. या लोकदैवताविषयी जाणून घेणे व त्यासंबंधी माहिती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे महत्त्वाचे आहे.

## संशोधन विषयक समस्या

लोककथा अभ्यास करत असताना अनेक समस्या संशोधकासमोर असतात. लोककथा या जास्त जुन्या काळातील असल्याने एखाद्या कथेविषयी पूर्ण माहिती मिळणे कठीण असते. तसेच जाणकार, वयस्कर लोक आता हयात नसल्याने दैवत्यकथाविषयी माहिती मिळणे कठीण असते. त्यांना ज्या लहान – सहान गोष्टी माहीत होत्या. त्या त्यांच्या मुलांना किंवा गावातील लोकांना इतरांच्या माहितीतल्या नसतात. ज्यांना थोडीफार कथा माहीत असते, त्यात चुका असण्याची संभावना असते. तसेच बदलत्या काळात दैवतांच्या विधी, सण, परंपरा यात झालेल्या बदलामुळे काही जुन्या गोष्टी लुप्त झालेल्या आहेत.

## संशोधनकार्याची उपयुक्तता/आवश्यकता

केपे परिसरातील लोकदैवतकथांचे संकलन केल्याने या कथा पुढच्या पिढीला उपयुक्त ठरेल. सध्याच्या काळात लोकसाहित्यातील अनेक गोष्टी लुप्त होत आहेत. त्यामुळे आजची पिढी आपल्या संस्कृतीशी दूर

जाताना दिसते. या प्रबंधिकाद्वारे किंवा एखाद्या पुस्तक लिखित स्वरूपात या क्षेत्राबद्दल, त्यांच्या संस्कृतीबद्दल, देवताबद्दल लिहून ठेवल्यास पुढच्या पिढीला आपल्या मातीशी, संस्कृतीशी जोडून ठेवण्यास मदत होईल. सांस्कृतिक व भूगोलिक दृष्टीने केपे परिसरातील लोकदेवतांचा परिचय होईल. लोकदैवत कथा मागची पार्श्वभूमी समजणार देवतांच्या विधी, सण, परंपरा पूर्वी कशा होत्या आणि आता त्यात कोणते बदल झालेले आहे याबद्दल माहिती मिळणार.

## संशोधनकार्यामागची उद्दिष्टे

1. केपे परिसरातील दैवताविषयी असलेली लोकांची श्रद्धा, त्याविषयी कथांची माहिती इतर लोकांपर्यंत पोहोचवणे.
2. केपे परिसरातील लोककथाचे संकलन करुन त्यांची वर्गवारी करणे.
3. केपे परिसरातील लोककथा आणि भौतिक संस्कृती यातील सहसंबंध जाणणे.
4. केपे परिसरातील दैवतंलोककथा आशय आणि अभिव्यक्तीच्या अंगाने पाहणे.
5. देवतांच्या विधी, सण विषयी जाणून घेणे.

## गृहितकांची मांडणी

1. केपे परिसरातील मौखिक परंपरा ‘आशय’ आणि ‘अभिव्यक्ती’ या अंगाने महत्त्वाचे आहे.
2. केपे परिसरातील प्रत्येक दैवतकथामागे लोकांची असलेली श्रद्धा तसेच स्थानिक लोकसंस्कृतीचे दर्शन घडते.
3. केपे परिसरातील लोककथा आणि भौतिक संस्कृती यातील परस्पर संबंध आहे.
4. लोकसाहित्यत प्रत्येक दैवतलोककथामागे काहीतरी कार्य (हेतू) असतो.
5. केपे परिसरातील लोककथा लोकसंस्कृतीचे समालोचन करतात.

## संशोधन पद्धती

लोकसाहित्याचा अभ्यास हा एक व्यक्ति पुरता न राहता, तो समाजिक असतो. लोकसाहित्य हे समूहमनाची निर्मिती असते. लोकसाहित्यत मौखिक परंपरा आणि भौतिक संस्कृतीचा अभ्यास आवश्यक

असतो. त्यासाठी क्षेत्रीय अभ्यास पद्धती आणि या प्रबंधिका लेखनासाठी वर्णनात्मक पद्धतीचा संशोधनात वापर होणार आहे.

### १. क्षेत्रीय अभ्यास पध्दती

केपे परिसरातील लोककथांचे अभ्यास इथे अभिप्रेत असल्याने प्रामुख्याने क्षेत्रीय अभ्यास पद्धतींचा वापर केलेला आहे. लोकसाहित्याचा अभ्यास फक्त ग्रंथालयात बसून करणे शक्य नाही, यासाठी क्षेत्रीय अभ्यास हा महत्त्वाचा ठरतो. प्रत्यक्ष भेटी, मुलाखती, आधुनिक यंत्रणांच्या आधारे दृक-श्राव्य पद्धतीद्वारे संकलने, छायाचित्र असे संशोधनाचे स्वरूप आहे.

### २. वर्णनात्मक पद्धती

या पद्धतीने विशिष्ट काळातील माहिती फार मोठ्या प्रमाणात संकलित करता येते. ही माहिती प्रश्नावली, मुलाखत या सारख्या साधनाचा उपयोग करून कमी वेळेत संकलित करता येते. वर्णनात्मक सर्वेक्षण हे गुणात्मक असते. लोककथांचे संकलन करून लोकसमाजातील मिळालेल्या माहितीची शास्त्रीय निकषावर आधारलेली वर्गवारी करून, विश्लेषण आणि चिकित्सा वर्णनात्मक स्वरूपात संशोधना द्वारे होईल.

## प्रकरणांची मांडणी

'केपे परिसरातील दैवतविषयक लोककथांचा अभ्यास' या विषयावर संशोधनपर प्रबंधिकालेखन करत असताना सदर विषयाची मांडणी खालीलप्रमाणे एकूण पाच प्रकरणाद्वारे केलेली आहे.

| |
|---|
| प्रकरण 1 : **लोकसाहित्य, लोकवाङ्मय आणि लोककथा** |
| प्रकरण 2 : **केपे परिसरातील लोकसंस्कृती आणि लोकजीवन** |
| प्रकरण 3 : **केपे परिसरातील दैवते आणि लोकदैवते** |
| प्रकरण 4 : **केपे परिसरातील लोकदैवतकथांचा अभ्यास** |
| प्रकरण 5 : **निष्कर्ष** |

## समारोप

केपे परिसरातील दैवतविषयक लोककथांचा अभ्यास' या विषया अंतर्गत केपे परिसरातील अनेक लोकदैवताविषयी अभ्यास होणार आहे.  केपे परिसरातील लोककथातून दिसणारा समाज, संस्कृती, परंपरा, रुढी, विधी याबद्दल जाणून घेणार आहे. या लोकदैवतविषयी जाणून घेणे व त्यासंबधी माहिती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे महत्त्वाचे आहे. या प्रबंधीकेसाठी इतर लोकसाहित्य संशोधनाचा व अभ्यासाचा आधार ग्रंथ म्हणून वापर होणार आहेत. प्रबंधासाठी काही मुलाखती, प्रत्यक्ष गाठी- भेटी, त्याचबरोबर छायाचित्राचाही समावेश परिशिष्टामध्ये समाविष्ट करुन घेतले जाणार आहे.

# प्रकरण १

# लोकसाहित्य, लोकवाङ्मय आणि लोककथा


**प्रास्ताविक ........ 7**

**१.१ लोकसाहित्य म्हणजे काय? ........ 7**

**१.२ लोकसाहित्याची व्याप्ती ........ 9**

१.२.१ मौखिक परंपरा ........ 9

१.२.२ भौतिक संस्कृती ........ 9

१.२.३ विधी, लोकविश्वास, लोककला, समजूती इत्यादी ........ 9

१.२.४ प्रयोगसिद्ध लोककला: ........ 10

**१.३ लोकसाहित्याची व्याख्या ........ 10**

१.३.१ पाश्चात अभ्यासकांची मते ........ 10

१.३.२ भारतीय अभ्यासकांची मते ........ 11

**१.४ लोकसाहित्य आणि लोकवाङ्मय ........ 13**

**१.५ लोकवाङ्मयाचे लोकप्रकार ........ 13**

१.५.१ गीतरूप ........ 14

१.४.२ कथारूप ........ 15

१.४.३ संवादरूप ........ 16

**१.५ लोककथा आणि लोककथाची वैशिष्ट्ये ........ 17**

**१.६ लोककथा आणि लोकसाहित्य परस्पर संबंध ........ 18**

**१.७ लोककथा प्रकार ........ 19**

१.७.१ दैवतकथा ( Myths)......................................................................19

१.७.२ उत्पत्तीकथा......................................................................20

१.७.३ दंतकथा ( Legends)......................................................................20

१.७.४ परिकथा ......................................................................20

१.७.५ प्राणीकथा......................................................................21

१.७.६ व्रतवैकल्यकथा ......................................................................21

१.७.७ वास्तवकथा ......................................................................21

**१.८ लोककथा अध्यायनाची आवश्यकता आणि उपयुक्त ......................................21**

**१.९ समारोप......................................................................22**

**१.१० निष्कर्ष......................................................................22**

**संदर्भ सूची ......................................................................23**

# प्रकरण १

# लोकसाहित्य, लोकवाङ्मय आणि लोककथा

## प्रास्ताविक

लोकसाहित्य हा लोकसमूहाचा अविष्कार आहे. मानव जसा प्रगत होत गेला तसेच लोकसाहित्यही वेगवेगळया रूपाने निर्माण होऊ लागले. लोकसाहित्यातून लोकजीवन, लोकसंस्कृती, परंपरा, रुढी समजण्यास मदत होते. प्रत्येक प्रदेशाची भाषा वेगळी असते. त्यामूळे प्रत्येक प्रदेशाप्रमाणे भाषिक किंवा संदर्भाच्या अंगाने लोकसाहित्यात बदल होत असतो. त्यामुळे काळानुरूप लोकसाहित्यात, लोकवाङ्मयात, लोककथेत थोडे फार बद्दल होत असतात.

लोकसाहित्य, लोकवाङ्मय आणि लोककथा या पहिल्या प्रकरणात प्रस्तुत संशोधन कार्याबद्दल जाणून घेणे अपेक्षित आहे. लोकसाहित्य ही व्यापक संकल्पना आहे. त्यासाठी प्रथमत: लोकसाहित्य म्हणजे काय?, लोकसाहित्याची व्याप्ती, लोकसाहित्याची व्याख्या या अंतर्गत भारतीय आणि पाश्चात अभ्यासकांची मते समजून त्यांचा अभ्यास केलेला आहे. लोकवाङ्मयचा विचार केल्यास लोकवाङ्मय म्हणजे काय?, लोकवाङ्मययातील विविध प्रकार समजणे महत्त्वाचे आहे. तसेच प्रस्तुत संशोधनात लोककथांचा अभ्यास महत्त्वाचा असून लोककथा म्हणजे काय हे जाणून घेणे, या लोककथाची वैशिष्ट्ये, लोककथा आणि लोकसाहित्यातील परस्पर संबंध, लोककथेचे प्रकार आणि लोककथा अध्ययनाची आवश्यकता आणि उपयुक्तता समजून या प्रस्तुत प्रकरणाद्वारे अभ्यास केला जाणार आहे.

## १.१ लोकसाहित्य म्हणजे काय?

लोकसाहित्य हे मौखिक स्वरूपात एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असते. त्यांचा कर्ता हा अनामिक आणि अज्ञात असतो. इंग्रजी राजवटीत जे परदेशी लोक भारतात आले त्यांनी आपल्या देशात जसे लोकसाहित्याचे संकलन केले, त्याप्रमाणे भारतात येऊन भारतीयांची जीवनपद्धतीचा शोध घेतला आणि लोकसाहित्याचे संशोधन भारतातही केले. लोकसाहित्याचा अभ्यास करत असताना लोकजीवनविषयी समजून

घेणे महत्त्वाचे आहे. कारण लोकसाहित्याची निर्मिती ही एका व्यक्तीपूर्ती मर्यादित नसते. ती समूहमनाची निर्मिती असते.

इंग्रजीतील 'Folklore' या शब्दाला मराठीत 'लोकसाहित्य' हा शब्द वापरला गेलेला आहे. दत्तो वामन पोतदार यांनी लोकसाहित्याला 'लोकविद्या' असा शब्द सुचवला होता पण तो रूढ झाला नाही. रा.चि. ढेरे यांनी 'लोकतत्त्व' शब्द सुचवला. लोकसाहित्यातील अभ्यासकांनी 'Folklore' साठी मराठीत अनेक शब्द सुचवले पण शेवटी दुर्गा भागवत यांनी सुचवलेला 'लोकसाहित्य' हा शब्द 'Folklore' साठी रूढ झाला.

"लोकसाहित्य हे परिवर्तनशील असते तरी त्याचा मूळ गाभा तोच असतो."[1] जसा काळ बदलतो तसेच लोकसाहित्यातील भाषेत, स्थळ, किंवा संदर्भ मांडत असताना त्यात बद्दल होत असतात. पण लोकसाहित्यातील मूळ हेतू तोच राहतो. सांस्कृतिक, धर्मशास्त्र, समाजशास्त्र, भूगोल इ. ज्ञानशाखेशी लोकसाहित्याचा संबंध आहे. "लोकसाहित्य हा सामासिक शब्द असून लोक आणि साहित्य या दोन पदापासून बनलेला हा शब्द आहे."[2] लोकं म्हणजे लोकसमुहाचा गट. लोकांनी समुहमनाने स्वतःसाठी निर्माण केलेले साहित्य जे लोकजीवनातील परंपरा, लोकंसंस्कृतीशी जवळ जाणारे असते. लोकसाहित्य हा लोकजीवनाचा आणि लोकसंस्कृतीचा आरसा असतो. "लोकसाहित्याची निर्मिती अधिक असते असे मानले असले तरी बदलत्या काळानुसार लोकसाहित्यात सुद्धा बदल होत असते. त्यामुळे लोकसाहित्य हे जुनेही नसते आणि नवे ही नसते."[3] लोकसाहित्यातून बदलते समाजजीवन, संस्कृती, रूढी-परंपरा या जुन्या साहित्याला स्पर्श करत लोकसाहित्य आधुनिकतेकडे वाटचाल करत असते.

लोकजीवनात पारंपारिक लोकजीवनाचे संदर्भ येत असतात. लोकसाहित्यात लोकांची जीवन जगण्याची पद्धत टिकून ठेवते पण जसे-जसे समाजात बदल होत राहतात तसेच या पद्धतीतही परिवर्तन होतात. म्हणून लोकसाहित्य हे परिवर्तनशील असते. लोकसाहित्य हे लोकांनी निर्माण केलेले असून ते परंपरेने चालत आलेले आहे. या लोकसाहित्यातून लोकजीवनातील लोकभाषा अभिव्यक्त होत असते. गीत, कथा, नाट्य तसेच रुढी, परंपरा यामधून लोकसाहित्याचा अविष्कार होत असतो. समाज, जग, कुटुंब, निसर्ग यांनी आपल्याला लोकंसंस्कृतीशी बांधलेले असते. परदेशीय लोकांची संस्कृती न मानता स्वतःची संस्कृती सांभाळणे त्याचे जतन

करून पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे हा प्रयत्न लोकसाहित्यातून होत असतो. लोकभ्रम, लोकरुढी, लोकसमाज, लोकमानस, लोकविधी, लोकसंस्कृती, लोकपरंपरा इत्यादी लोकसाहित्याचे भाग आहे.

### १.२ लोकसाहित्याची व्याप्ती

लोकसाहित्य हे परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असते. लोकसाहित्यातून समाजव्यवहार, संस्कृतिक परंपरा, विधी, मानवीमनाचे प्रकटीकरण होत असते. लोकसाहित्याची व्याप्ती प्रचंड आहे. या व्याप्तीमुळे समजते की लोकसाहित्याची परंपरा ही व्यापक स्वरूपाची आहे.

### १.२.१ मौखिक परंपरा

मौखिक परंपरा ही पहिली लोकसाहित्याची व्याप्ती आहे. मौखिक परंपराही समाजात मौखिक स्वरूपात चालत आलेली असते. हे साहित्य मौखिक परंपरेने चालत आलेली असून त्याचा कर्ता हा अज्ञात असतो. मौखिक साहित्य हे परंपरेने जतन करून ते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सोपवले जाते. मौखिक साहित्य हे एका व्यक्तीपुरते न राहता ते समूहाचे बनते. लोककथा, लोकगीत, म्हणी, स्त्रीगीते, उखाणे, कथागीते इत्यादी गोष्टींचा समावेश मौखिक परंपरेत केला जातो.

### १.२.२ भौतिक संस्कृती

भौतिक संस्कृती ही दुसरी लोकसाहित्याची व्याप्ती आहे. भौतिक संस्कृतीत परंपरेने चालत आलेला व्यवसाय. उदा: सुतार, न्हावी. हा व्यवसाय एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे पोहोचवला जाते. वैद्यकीयशास्त्र, व्यवसायातील कौशल्ये, मंत्रतंत्र आदी गोष्टींचा समावेश भौतिक संस्कृतीत केला जातो. भौतिक संस्कृतीत लोकजीवनातील कौशल्य, विधी या गोष्टी एका पिढीकडून जतन करून दुसऱ्या पिढीकडे पोहोचवली जाते.

### १.२.३ विधी, लोकविश्वास, लोककला, समजूती इत्यादी

विधी, लोकविश्वास, लोककला, समजूती ही तिसरी लोकसाहित्याची व्याप्ती आहे. या व्याप्तीत जे सण-उत्सव उदा: तुळसीविवाह, दसरा, गणेशचतुर्थी, गुढीपाडवा. लोकांची श्रद्धा धार्मिक विधी उदा: लग्न, हळदविधी, सठी, अंतिमसंस्कार. या सर्व गोष्टी येतात. या सर्व गोष्टीशी लोकसमाज दूर राहू शकत नाही. लोकांची जी श्रद्धा,

रुढी, परंपरा आहे या सर्व गोष्टीशी लोकसमाज बांधला गेला आहे. विधी, समजुती, परंपरेमुळे, समाज संस्कृतीशी बदलेला असतो. या सर्व गोष्टी लोकसमूहात महत्त्वाचा असतात.

### १.२.४ प्रयोगसिद्ध लोककला:

प्रयोगसिद्ध लोककला ही चौथी लोकसाहित्याची व्याप्ती आहे. प्रयोगसिद्ध लोककलेत लोकनाट्य, लोकनृत्य, लोकसंगीत, विधीनाट्य, यांचा समावेश होतो. या कलांचा प्रयोग केला जातो म्हणजे ही कला लोकापुढे सादर केली जातात. प्रयोगसिद्ध लोककलातून सादर करणाऱ्या व्यक्तीचे तसेच प्रेक्षकांच्या हावभावावरून मनातील प्रश्न त्यांचे विचार व्यक्त होत असतात.

### १.३ लोकसाहित्याची व्याख्या

लोकसाहित्य ही व्यापक संकल्पना आहे. ही लोकसाहित्याची संकल्पना स्पष्ट करत असताना अनेक पाश्चात लोकसाहित्य अभ्यासकांनी तसेच भारतीय लोकसाहित्य अभ्यासकांनी आपली मते मांडली आहे. त्यांच्या या व्याख्येतून लोकसाहित्य संकल्पना समजण्यास मदत होते.

### १.३.१ पाश्चात अभ्यासकांची मते

**व्याख्या क्रमांक १)** “लोकसाहित्य हे आदिमानवनिर्मित असून परंपरा प्राप्त असते. त्याचप्रमाणे सुसंस्कृत मानवाने निर्मिलेले असते. ही निर्मिती ध्वनी आणि शब्द यांच्या द्वारे पद्द किंवा गद्य स्वरूपात केली जाते. लोकसाहित्यात लोकविश्वात, लोकभ्रम, रूढी, लोककला प्रकार यांचाप्रमाणे नृत्य, नाट्य इत्यादीचा अंतर्भाव त्यात होतो. लोकसाहित्य हे समूहाच्या अविष्करचे शस्त्र नाही, तर लोकसमूहाच्या परंपरागत चालत आलेल्या जीवनाच्या अविष्काराचे शास्त्र आहे.”[4] जोनास बॅलिस यांची ही व्याख्या आहे.

**-जोनास बॅलिस**

**व्याख्या क्रमांक २)** “लोकजीवनातील पारंपारिक व्यवसायाचे ज्ञान व कौशल्य, लोकजीवनातील रूढी-प्रथा, मौखिक परंपरेने प्रचलित असलेली गीते, कथा, लोकोक्ती, नृत्य, खेळगीते व उत्सव इत्यादी समावेश लोकसाहित्यात करता येतो.”[5] मारियास बार्डो यांची ही व्याख्या आहे.

**-मारियास बार्डो**

**व्याख्या क्रमांक ३)** "लोकसाहित्य हा शब्द लवचिक असून त्यात लोकसमूहाच्या अलिखित म्हणजेच मौखिक रूपातील भाषाविष्काराचा, लोकविश्वास, लोकभ्रम, पारंपारिक खेळ, उत्सव, चेटूक, तोडगे इत्यादींचा समावेश लोकसाहित्यात होतो."[6] जॉर्ज एम. फास्टर यांची ही व्याख्या आहे.

**-जॉर्ज एमफास्टर .**

**व्याख्या क्रमांक ४)** "लोकसाहित्य एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होते. त्याचा निर्माता अज्ञात असतो. त्याची निर्मिती कुणीतरी एका व्यक्तीकडून झालेली असली तरी निश्चितपणे त्या व्यक्तीचे नाव सांगता येत नाही. त्या रचनेचे स्वरूपही बदलत असते."[7] आर्चर टायलर यांची ही व्याख्या आहे.

**- आर्चर टायलर**

### १.३.२ भारतीय अभ्यासकांची मते

**व्याख्या क्रमांक १)** "हम अपनी दृष्टीसे कह सकते है कि लोक मनुष्य समाज का वह वर्ग है, और जो एक परंपरा के प्रवास मे जिवित रहता है, ऐसे लोक की अभिव्यक्ती मे जो तत्व मिलते है वे लोकतत्त्व कहलाते है। ऐसे लोग या साहित्य ही लोकसाहित्य है।"[8] डॉ.सतेंद्र यांची ही व्याख्या आहे.

- **डॉ. सतेंद्र**

**व्याख्या क्रमांक २)** "लोकसाहित्य लोकप्रतिभेचा आविष्कार असतो. तसेच लोकांच्या पारंपारिक जीवनाच्या संदर्भात दडलेला असतो. लोकसाहित्य हे लोकमानसाचा अविष्कार असते. त्यातून समाजमानस अभिव्यक्त होतो. "[9] डॉ. प्रभाकर मांडे यांची ही व्याख्या आहे.

- **डॉ. प्रभाकर मांडे**

**व्याख्या क्रमांक ३)** "विविध प्रकारच्या जातिवंत स्वरविलासानी शिणगारलेले व अशिक्षिततानी कितीक वर्षामागे रचले असतानाही केवळ पाठांतराच्या बळावर पिढ्यानपिढ्या आपल्या नवनवोनन्मेषशालीनी ते जाने पुढच्या पिढ्याला उत्तेजित करण्यारे ते लोकसाहित्य."[10] डॉ. सरोजिनी बाबर यांची ही व्याख्या आहे.

- **डॉ. सरोजिनी बाबर**

**व्याख्या क्रमांक ४)** "लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे संस्कृतीच्या अभिसरणाचा अभ्यास आहे. संस्कृतीचे सातत्य आणि तिच्यात होणारे बदल यांचे निरीक्षण करायचे तर ते लोकसाहित्यातच करावे. मानव व त्यांच्या सभोवारची चराचर सृष्टी हिचे नाते लोकसाहित्याच्या अभ्यासानंतर विशेष लक्षात येते ."[11] दुर्गा भागवत यांची ही व्याख्या आहे.

**-दुर्गा भागवत**

लोकसाहित्याची संकल्पना व्यापक स्वरूपाची आहे. 'लोकांचे साहित्य' ते लोकसाहित्य असे म्हटले जाते. पाश्चात आणि भारतीय लोकसाहित्य अभ्यासकांची व्याख्या पाहिल्यास जोनास बॅलिस, मारियास बार्डो, जॉर्ज एम. फास्टर, आर्चर टायलर या पाश्चात अभ्यासकांनी आपल्या व्याख्यातून लोकसाहित्य ही संकल्पना सरळ आणि अगदी सोप्या भाषेत मांडली आहे. एकंदरीत पाश्चात्य अभ्यासकांच्या व्याख्यातुन लक्षात येते की लोकसाहित्य हा समूहजीवनाचा आविष्कार असून त्यातून पारंपारिक लोकजीवनाचे दर्शन घडते.

भारतीय अभ्यासकांची व्याख्या पाहिल्यास त्या व्याख्या समजण्यास गोंधळ होतो. भारतीय अभ्यासकानी आपल्या व्याख्यात काही जड शब्दांचा वापर केलेला आहे. त्यामुळे त्या शब्दांचा अर्थ समजण्यास कठीण होतो. लोकसाहित्याचा अभ्यासकानी लोकसाहित्याचे संकलन करत असताना त्यात चुका असता कामा नये. डॉ.सतेंद्र यांनी हिंदी भाषेतही लोकसाहित्याची व्याख्या सांगितली आहे. उपरोक्त भारतीय अभ्यासकांनी मांडलेल्या व्याख्यापैकी डॉ.प्रभाकर मांडे यांनी आपली व्याख्या कमी शब्दात मांडली असली तरी त्यांची व्याख्या लोकसाहित्य संकल्पनेला न्याय देते.

## १.४ लोकसाहित्य आणि लोकवाङ्मय


‘Folklore’ म्हणजे ‘लोकसाहित्य’ आणि ‘Folk literature’ म्हणजे ‘लोकवाङ्मय.’ लोकसाहित्य आणि लोकवाङ्मय हे वेगळे आहे. साहित्य हा शब्द आपण व्यापक रूपाने वापरतो आणि वाङ्मय हा आपण कमी प्रमाणात वापरतो. वाङ्मय म्हणजे ते वाणीद्वारा युक्त असते. लोकसाहित्यातील मौखिक परंपरेला एक व्यापक अर्थाने लोकवाङ्मय म्हणजेच ‘Folk literature’ असे म्हटलेले आहे.

लोकवाङ्मयातून लोकजीवनाचा आविष्कार होत असतो. लोकसंस्कृती, प्रथा, परंपरा यांचे दर्शन लोकवाङ्मयातून होतो. लोकांची भावना, रुढी आचार विचार यांचा समावेश लोकवाङ्मयत होताना दिसतो. लोकसाहित्य आणि लोकवाङ्मय हे समूहमनामुळे निर्माण होत असते. लोकवाङ्मयाची निर्मिती मौखिक स्वरुपातच होत असते. प्रत्येक प्रदेशाची भाषा एकच स्वरूपाची नसल्याने लोकवाङ्मयात भाषिक बद्दल होत असतो. भाषा ही समाजाने स्वीकारलेली महत्वाची संपत्ती आहे. लोकसाहित्यातील मौखिक आविष्कार ही पहिली व्याप्ती लोकवाङ्मया अंतर्गत येते. कारण लोकवाङ्मय मौखिक स्वरूपात परंपरेने चालत आलेले आहे. लोककथा, लोकगीत, लोकनाट्य, उखाणे, म्हणी व वाक्यप्रचार यांचा समावेश लोकवाङ्मयात होतो. लोकवाङ्मय मौखिक परंपरेने लोकसमाजात चालत आलेले आहे. “लोकवाङ्मय लोकभाषेची निर्मिती असते आणि तिचा अनेक लोकशास्त्राची संबंध असते.”[12] तसेच लोकसाहित्य आणि लोकवाङ्मय यांचा विविध सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक कार्याशी संबंधित असते. “लोकवाङ्मय संकेतबद्ध असते.” “लोकवाङ्मयात होणारा अविष्कार हा लोकपरंपरेत चालत आलेल्या लोकजीवनाचा आविष्कार असतो हा अविष्कार सहजस्फूर्त असतो.”[13] लोकसाहित्य आणि लोकवाङ्मय ही समूहमनाची निर्मिती असते. त्यामुळे लोकजीवनातील अनेक संदर्भ लोकसाहित्यात आणि लोकवाङ्मयत शोधता येते.

## १.५ लोकवाङ्मयाचे लोकप्रकार

लोकवाङ्मय मौखिक परंपरेने समाजामध्ये चालत आलेली आहे. ‘लोकवाङ्मय’ हे लोकसंस्कृतीचाच आविष्कार असल्याने लोकवाङ्मयातून त्याचे दर्शन घडते. लोकजीवनातील रुढी, परंपरा, प्रथा, लोकांच्या भाव-भावना, आचार-विचार समाजाचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हे सर्व लोकवाङ्मयतून प्रकट होत असते.

लोककथा, लोकनाट्य, आख्यान, लोककथागीत, लोकगीत, म्हणी, वाक्प्रचार लोकसमूहामुळे सादर होत असतात. लोकवाङ्मयात गीतरूप, कथारूप, संवादरूप असे प्रकार येतात.





सौजन्य१.१ लोकवाङ्मयाचे लोकप्रकार, कुबल रमेश, ‘लोकसाहित्याचे अतरंग’, पृ. क्र ४

### १.५.१ गीतरूप

लोकवाङ्मयात गीत प्रकार हा मौखिक परंपरेने चालत आलेला आहे. लोकगीत हे जिवंतवाणी भाषा आहे. गीतरूपात लोकगीत, गीतकाव्य, कथाकाव्य येतात. “लोकगीतांची वैशिष्ट्ये म्हणजे त्यांचे कृत्तव कोणा एका व्यक्तीकडे देता येत नाही. गेयता आणि स्वरप्रधानता ही लोकगीतांची वैशिष्ट असतात.”[14] लोकसाहित्य आणि लोकवाङ्मयाचे दालन हे व्यापक असून त्यातील जास्त भाग लोकगीतांचा आहे. लोकगीतांना लोकसाहित्याचा आत्मा मानला जातो. गीतरूप प्रकाराकडे पाहत असताना ते एकट्याचे असे नसते तर तो समूहाचे असतो. या गीतरूपाचे अनेक उपप्रकार असतात. एखादा कुठलीही विधी करत असताना जे गीत गायले जाते त्याला विधी गीत असे म्हणतात. तसेच खेळगीते, पुरुषांची गीते, स्त्रियांच्या गीते असतात. पुरुषांच्या गीतामध्ये एखादा शेतात काम करत असताना आपले श्रम कमी करण्यासाठी जे गीत म्हटले जातात ते श्रम गीत. तालगडी, तोणयाखेळ आदी पुरूषगीतात येतात.तसेच खेळगीतामध्ये जे लहान मुले म्हणतात रिंगा रिंगा रोजी, आईचा रुमाल हरवला, ही गीते

आणि बडबडगीतात नाच रे मोरा, ससा हा कसा, माऊच्या कुशीत जोपलस कोण ही लहान मुलाची गीते येतात. स्त्री गीतामध्ये दळण, कांडण, लग्नगीत, म्हणी, पाळणे, फुगडी, धालो, ओव्या, झिम्मासारखी गीते येतात.





सौजन्य १.२ गीतरूप, कुबल रमेश, 'लोकसाहित्याचे अतरंग', पृ. क्र ४६

### १.४.२ कथारूप

जिथे माणूस आहे तिथे कथा आहे. लोककथाचा निर्माता हा कोणाला माहित नसतो. शिक्षित तसे अशिक्षित लोकात लोककथा प्रचलित असते. "भारत हा कथाप्रिय देश आहे. लोककथाचा जनक म्हणून भारत देशाची ओळख आहे. या कथांमधून रंजन आणि बोध केलेला आढळतो."[15] लोककथेच्या निर्मितीमागे धार्मिक समजुती, समाजजीवन, फलप्राप्ती, संस्कृतीचे दर्शन, संकटणीवरण अशी प्रयोजने असतात. दैवतं लोककथामध्ये राम, कृष्ण, गणपती या देवाच्या कथा आहे. माणसाने ज्याला देवाचं स्थान दिले त्यांच्या कथा येतात. उदा:- वृक्ष असो (वटवृक्ष- वटदेवता), सूर्यदेव असो, चंद्रदेव या सर्व गोष्टी दैवतं कथेत येतात. परिकथा ही अद्भुतकथे सारखी आहे. "लोककथागीत हे सर्वप्रथम गीत असून या गीतात कथनाला किंवा कथेला महत्त्व असतो."[16] लोककथागीत

ही अशी पदशैली असते की ज्या गीते निर्माता अनामिक असून या गीतात एखादे आख्यान सांगितलेले असते ही गीते मूखपरंपरेने प्रचारात राहतात आणि ललित कथेमध्ये जी सूक्ष्मता आढळते तिचा त्यात अभाव असतो." पौराणिक कथागीते, ओवी आख्यान, वीरच्या कथा सांगणारे कथागीत आहे. तसेच लोककथा मध्ये भूत- प्रेत, एखादा स्थळाविषयी असलेली कथा या सर्व कथांचा समावेश होतो. दंतकथेत एतिहासिक सत्य घटनांचा आधार असतो. (उदा:- सप्तकोटेश्वर मंदिराच्या उंभरठ्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा हाताचा ठसा).





सौजन्य १.३ कथारूप, कुबल रमेश, 'लोकसाहित्याचे अतरंग', पृ. क्र ४६

**१.४.३ संवादरूप**

संवादरूपात संवाद साधला जातो. लोकनाट्य, म्हणी, वाक्यप्रचार, शिव्या आदी. लोकनाट्यातून सादर होणारे नाट्य हे समाज प्रत्यक्ष जगत असतो. रंगमंचावर एखादा प्रयोग होणाऱ्या नाटकापेक्षा लोकनाट्य हा वेगळा लोककलाप्रकार आहे. आदिवासी, ग्रामीण भागात सण, उत्सव, विधी समारंभ वेळी लोकनाट्य खेळली जातात. तमाशा, दशावतार, गोंधळ, भारुड आदी विधी नाट्य आहे. "थोडक्यात अनेक संदर्भीय अर्थ व्यक्त करणारा शब्दसमूदाय म्हणजे वाक्यप्रचार असे म्हणतात येईल."[17] डोळ्यात तेल घालून पाहणे - लक्ष देऊन पहाणे, रात्रीचे दिवस करणे - खूप कष्ट करणे, लोकजीवनामध्ये हे वाक्यप्रचार महत्त्वाचे आहे. संवाद साधण्यासाठी, विचार

मांडण्यासाठी, वाक्यप्रचाराचा, म्हणीचा वापार महत्त्वाचा आहे. “म्हणींना संस्कृतीमध्ये लोकोक्ती, प्रवाद, आभाणक, लोकप्रवाद, लौकिकगाथा असे पर्याय शब्द आढळते. इंग्रजीत त्याला ‘Proverbs’ असे संबोधले जाते.”[18] म्हणी ही संपूर्ण वाक्यासारखे असते. उदाहरणार्थ:- नाचता येईना अंगण वाकडे रानता येईना ओली लाकडे, शिता फुडें मीठ खाता, एका कपड्यांन बायल मातारी जायना, कावळ्याच्या शापाने गाय मरत नाही. शिव्या माणसांमध्ये असणारा राग, तणाव कमी करण्यासाठी माणूस शिव्या देत असते. शिव्या दिल्याने त्या व्यक्तीच्या मनाला शांतता मिळते.




सौजन्य १.४ संवादरूप, कुबल रमेश, ‘लोकसाहित्याचे अतरंग’, पृ. क्र ४६

**१.५ लोककथा आणि लोककथाची वैशिष्ट्ये**

लोककथेचा उगम मौखिक परंपरेने झालेला आहे. कथा ऐकायला सर्वांनाच आवडते. जिथे माणूस असतो तिथे कथाही असतेच. लोककथा ही लोकजीवनाशी निगडित असते. लोककथाचा निर्माता हा कुणालाही माहीत नसतो. समाजजीवनाचे सांस्कृतिक संदर्भ लोककथेत दिसतात. प्राचीन इतिहासाचा शोध घेण्यासाठी, आधुनिक विचार मांडण्यासाठी, चांगल्या कथा सांगून सकारात्मक विचार लोकापर्यंत पोहोचवण्यासाठी लोककथांचा उगम झाला. प्रदेश, स्थळ, भाषा, काळ, प्रांत अशा वेगवेगळ्या टप्प्यातून ह्या लोककथाचा प्रवास अनेक वर्षाचा असल्याने मूळ कथेचा कथावस्तू तसाच ठेवून त्या कथांमध्ये अनेक वेगवेगळे बदल झालेली दिसतात.

लोककथा ही वेगवेगळ्या अवस्थेतून समोर येत असते. उदा: नदी, डोंगर, वृक्ष इत्यादी. जेव्हा लोकांमध्ये धर्म, भावना, देव, अंधविश्वास, परंपरा निर्माण झाले तसेच लोकांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होऊ लागले. या प्रश्नाचे उत्तर शोधत असताना अनेक लोककथा समोर आल्या. लोककथेचे स्थान लोकवाङ्मयात महत्त्वाचे आहे. जसे आजच्या काळात आधुनिक मनोरंजनाची साधने आहे. तशी पूर्वीच्या काळात नव्हती. लोकसमाजात या लोककथा प्रचलित होत्या. या लोककथातून लोकजीवनाला मनोरंजन, समाज प्रबोधन करणे, काही नवीन शिकणे आणि शिकवणे हे लोककथेच्या माध्यमातून होत असे. लोककथेत बद्दल होत असते. जुन्या गोष्टीला स्पर्श करत ती आधुनिकतेकडेही पोहोचते. लोककथेचे दोन प्रकार आहे. कथा आणि गीतकथा. गीतकथा म्हणजेच जी गाऊन सांगितली जाते. कथानक, वातावरण, पात्र, निवेदक, लोककथेची भाषा हे महत्त्वाचे घटक असतात.

- लोककथा ही समाजजीवनाशी निगडित असते.
- लोककथेतून अनेक विषय समाजापुढे येत असतात.
- कथेतून अनेक प्राचीन संस्कृतीचे अवशेष प्रकट होत असतात.
- लोकांचे मनोरंजन आणि प्रबोधन करणे हा लोककथेचा उद्देश आहे.
- दैनंदिन जीवनातील जशी लोकभाषा असते तशीच भाषा लोककथेत वापरतात.
- लोककथेत काळाप्रमाणे बदल होत असते पण कथेचा मूळ गाभा तोच राहतो.

### १.६ लोककथा आणि लोकसाहित्य परस्पर संबंध

लोकसाहित्य हे व्यापक आहे. लोकसाहित्यातील एक प्रकार म्हणून लोककथेकडे पाहिले जाते. लोकगीत, लोकनाट्य, म्हणी, वाक्यप्रचार, लोकवाद्य या लोकसाहित्यातील प्रकारातून जसे समाजजीवन दर्शवते तसेच लोककथातूनही समाजजीवन दर्शवते. लोकसाहित्यातील लोककथा हा एक भाग असून या लोककथेचे वेगवेगळे उपप्रकार आहे. दैवतकथा, उत्पत्तीकथा, दंतकथा, परिकथा, वास्तवकथा आदी. लोकसाहित्य आणि त्यातील लोककथेचा कर्ता हा कुणालाही माहीत नसतो. म्हणजे तो अनामिक असतो. लोकसाहित्य हा मौखिक परंपरेने

संक्रमित झालेला वाङ्मय प्रकार आहे. लोकसाहित्यत मौखिक अविष्काराचा विचार केल्यास लोककथा ही मौखिक आहे. प्रदेशात रूप त्यात भाषिक अंगाने बदल होतो. लोकसाहित्य हा लोकजीवनचा आविष्कार असल्याने लोककथाततून लोकजीवन, लोकसंस्कृतीचे दर्शन घडते.

लोकसाहित्यातील लोककथेचे दलन लोकजीवनाची श्रद्धा, अंधश्रद्धा, विश्वास, अचार- विचार, परंपरा या प्रेरणा घेऊन विस्तारलेले आहे. लोकसाहित्यातील या लोककथा परंपरेने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे चालत राहिल्याने लोककथा मूळ स्त्रोतापासून वेगवेगळया मानवसमुहाबरोबर विविध प्रदेशात त्यांचा प्रसार होऊ लागला. या लोककथा समाजमानसाशी एकरूप झाल्या. “लोकसाहित्याच्या संशोधनातून बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचा आणि संस्कृतीच्या अभिसरणाचा अभ्यास होतो.”[19] जसे बदलत्या काळाप्रमाणे लोकसाहित्यात आणि लोककथेतही जुन्या विचारांसोबत आधुनिक विचार मांडले जाते.

लोकजीवनातील लोकआविष्काराची परंपरा- रुढी, लोककथा, नृत्य, लोकनाट्य या सर्वांचा सामावेश लोकसाहित्यात होतो. लोकसाहित्यातील लोककथेत माणूस हा केंद्रस्थानी असतो. माणसाशी संबधीत अनेक गोष्टीचा उलगडा लोकसाहित्यातील लोककथातून व्यक्त होतो.

### १.७ लोककथा प्रकार

लोककथेचा लोकजीवनाशी संबंध असतो. लोककथा हा लोकसाहित्यातील एक महत्त्वाचा प्रकार आहे. लोककथेचे अनेक प्रकार आहेत त्यातील काही महत्वाचे  दैवतकथा, उत्पत्तीकथा, दंतकथा, परिकथा, प्राणीकथा, व्रतवैकल्यकथा, वास्तवकथा इत्यादी.

#### १.७.१ दैवतकथा ( Myths)

देवदेवता संबंधित असलेल्या कथांना दैवतकथा म्हणतात. या दैवतकथा, अद्भुतकथा, धर्मकथा, देवांच्या कथा, पुराणकथा अशा विविध नावाने प्रचलित आहे. दैवत कथेमध्ये देवदेवतांचे जन्म, त्यांचे अवतार, त्यांचे कार्य, शत्रु – मित्र, त्यांच्याविषयी असलेली श्रद्धा, त्यांच्या सामर्थ्याची गाथा हे सर्व येतात.

अंड्रयु त्यग यांच्या मते “दैवत्यकथा म्हणजे मानवजातीच्या प्रारंभकाळाचा इतिहास असून अभौतिक शास्त्र ही आहेत. तसेच मालती मालती दोडेकर यांनी दैवतकथांच्या रूपाने प्राचीन विज्ञान कथा समोर येते.” [20] दैवत कथेमध्ये अद्भुतरम्यता असते. तसेच ही कथा धर्माशी संबंधित असतो. उदाहरणार्थ: श्रापाने फुलाचे दगड होणे.

### १.७.२ उत्पत्तीकथा

मनुष्याच्या श्रद्धेविषयी असलेल्या कथेला उत्पत्ती कथा म्हणतात. ही कथा दैवत कथा प्रमाणेच धर्म, भावनाशी निगडित असते. या कथेत अद्भुतरम्य घटना आढळतात. उदाहरणार्थ- मंत्र उच्चारल्याने पुत्र प्राप्त होणे (सूर्यपुत्र कर्णाचा जन्म). उत्पत्ती कथेचे स्वरूप काल्पनिक असते. पण या कथेतील कथा समाज सत्य आणि ऐतिहासिक आहे असे म्हणतात.

### १.७.३ दंतकथा ( Legends)

समाजात ऐतिहासिक घटनेचा आधार घेऊन आलेली, ऐतिहासिक व्यक्ती संदर्भात घडलेली कथा असते. या कथा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असताना त्यात मूळ घटनेचे स्वरूप फार बदलते. काल्पनिकतेचा वापर होतो. “लोकजीवनात मौखिक परंपरेने चालत आलेली अशी कथा, जिचा आधार एखादी ऐतिहासिक घटना असते. मात्र मौखिक परंपरेमध्ये तिचे स्वरूप पूर्णपणे बदलले असते तिला दंतकथा म्हणतात.” [21] दंतकथेतून रुढी, चालीरीती, परंपरा, दिसतात.

### १.७.४ परिकथा

परीकथेला अद्भुतकथा म्हणतात. धर्म आणि नीति कथासारखी याचे स्वरूप नसते. परिकथा ही काल्पनिक असून मनात प्रश्न निर्माण करणाऱ्या आणि चांगली शिक्षा देणाऱ्या असतात. ह्या कथात परी, जादूगर, राक्षस, पशुपक्षी, वृक्ष, माणूस ही पात्रे असतातच. कथेचे मूळ प्रयोजन मनोरंजन आहे. आशावाद, उत्साह निर्माण करण्याचे कार्य परिकथातून करतात. या कथेत सुरुवातीला दुःख असले तरी शेवट मात सुखात्म असतो.

### १.७.५ प्राणीकथा

या कथातून बोध दिला जातो. या कथांची निर्मिती प्राचीन काळी झाली. मांजर आणि उंदीर, आळशी ससा आणि हुशार हुशार, इमानदार मोत्या ( कुत्रा). या कथातून समाजाला बोध देणे, नितीनमूल्याचे शिक्षण देणे, प्रबोधन करणे हे निसर्गातील पशुपक्ष्यांच्या आधार घेऊन लोकांसमोर या कथा येतात.

“यांना बोधकथा, प्राणीकथा, दृष्टांतकथा अशा विविध नावाने ओळखले जाते. इंग्रजीत त्यांना ‘Fable’ अशी परिभाषा संज्ञा व्यापार वापरण्यात आली आहे.”[22] काल्पनिक कालपिक या प्राणी कथा असतात या कथां सत्यावर आधारित नसतात.

### १.७.६ व्रतवैकल्यकथा

व्रतवैकल्य या कथातून देवी देवतांच्या कथा सांगितल्या जातात. देवाविषयी श्रद्धा निर्माण करणाऱ्या या कथा आहे. माणसाचा देवांवर विश्वास असतो. त्यामुळे देवाला प्रसन्न करण्यासाठी अनेकजण व्रत करतात. देवी देवतांची उपासना, व्रत करताना या कथा वाचल्या जातात.

उदाहरणार्थ: श्री महालक्ष्मी व्रतकथा, संतोषीमाता व्रतकथा, सत्यनारायणाची कथा, मंगळागौरीव्रत इत्यादी.

### १.७.७ वास्तवकथा

वास्तवकथा मधून समाजातील वास्तव्याचे दर्शन घडते. या कथातून समाजातील वाईट गोष्टी तसेच चांगले विचार मांडतात. आधुनिक विचार, आधुनिक जीवनातील घडामोडी या कथातून समाजापर्यंत पोहोचवली जातात. या कथेत वास्तवाला महत्त्व आहे.

## १.८ लोककथा अध्यायनाची आवश्यकता आणि उपयुक्त

लोककथा ही समाजजीवनाशी निगडित असल्याने लोककथातून समाजामध्ये अनेक चांगले वाईट पैलू समोर येत असते. लोककथा ही कोणत्याही काळापुर्ती मर्यादित नसते. लोककथा आपल्या सोबत जुने विचार तसेच

आधुनिक विचार मांडत असतात. रुढी, परंपरा, श्रद्धा, समजूती लोककथातून दिसतात. कथा सांगणे आणि ती ऐकणे ही अतिशय प्राचीन मानवी प्रवृत्ती आहे. लोककथा ही पूर्वी लिखित स्वरूपात आढळत नसेल कारण ती मौखिक परंपरेने चालत आलेली असते. त्यामुळे एकच कथा त्यात थोडेफार भाषिक संदर्भाच्या अंगाने बदल करून अनेक गावात सांगितली जाते. लोककथातून भूगोलिक निसर्गात होणारे अनेक चमत्कार आढळतात.

पूर्वीच्या काळात लोककथा सांगण्याची किंवा ऐकण्याची जी माणसांमध्ये, लहान मुलांमध्ये उत्सुकता होती ती आता जास्त दिसत नाही. लहान मुलांमध्ये कथा ऐकण्याची जी ओढ होती ती आता मोबाईल, व्हिडिओ गेम सारख्या तंत्रामुळे लुप्त होत आहे. फॅशनच्या नावाखाली माणसं आपल्या संस्कृती, परंपरेत बदल करत आहे त्यामुळे लोकसाहित्यातील अनेक गोष्टी सध्याच्या काळात लुप्त होत आहे. आजची पिढी आपल्या संस्कृतीशी परंपरेची दूर जाताना दिसते. तसेच वयस्कर लोक हयात नसल्याने अनेक लोककथाबद्दल जाणून घेण्यास समजण्यास कठीण होते. सण, विधी, परंपरा पूर्वी कशा होत्या आणि त्यात आता कोणते बदल झाले आहे हे लोककथातून जाणवते. लोककथाचे संकलन केल्याने पुढच्या पिढीला आपल्या संस्कृतीशी निसर्गाशी जोडून ठेवण्यास मदत होईल. त्यामुळे आपल्याला पुढच्या पिढीपर्यंत ह्या लोककथा पोहचवणे महत्त्वाचे आहे.

### १.९ समारोप

लोकसाहित्याचा अभ्यास करताना लोकसाहित्य, लोकवाङ्मय आणि लोककथा या विषयी समजून घेणे महत्वाचे आहे. लोकजीवनात परंपरा, आचार- विचार लोकसाहित्यातून प्रकट होत असतो. लोकसाहित्यातून लोकजीवनाचे, लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. लोकवाङ्मय हे मौखिक परंपरेने चालत आलेले आहे. लोकसाहित्याच्या व्याप्तीमधून समजते की लोकसाहित्याची परंपराही व्यापक स्वरूपाची आहे. लोकसाहित्यातील एक प्रकार हा लोककथा आहे. ह्या लोककथाअंतर्गत अनेक प्रकार येतात दैवतकथा, परिकथा, प्राणीकथा वास्तव्यकथा उत्पत्तीकथा आदी. या लोककथाचा संबंध लोकजीवनाशी असतो. ही परंपरा सभाळून ती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे महत्त्वाचे आहे.

### १.१० निष्कर्ष

1. लोकजीवनातून लोकवाङ्मय निर्माण होते आणि ते लोकजीवनाला प्रेरणा देते.

2. लोककथा ही एका मानवसमुहापर्यंत किंवा एका भाषिक प्रदेशापुरती मर्यादित नसते तर, त्यांचे प्रवाहीपणा अबंधित असते.
3. लोककथेची भाषा ही दैनदिन जीवनात वापरणारी लोकभाषा असते.
4. पारंपरिक आचार - विचार लोकसाहित्यातून प्रकट होत असल्याने परंपरा राखणे, टिकवणे आणि ते पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे कार्य घडते.
5. लोकांचे हावभाव, मानवी स्वभाव, मानवी संवेदनाच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास लोकसाहित्यातून होतो.
6. लोकसाहित्य हा लोकजीवनाचा व लोकसंस्कृतीचा आरसा असतो.
7. लोककथा ही मौखिक परंपरेने चालत आलेली असून ती लोकजीवनाशी निगडित असते.
8. स्थळ, भाषा, काळ, प्रदेश, निसर्ग अशा विविध टप्प्यांतून लोककथांचा प्रवास वर्षानुवर्षे अखंडितपणे चालत जाते.
9. लोकवाङ्‌मयात गीतरूप, संवादरूप आणि कथारूप यांच्या अनेक प्रकारांचा समावेश असतो.
10. कालांतराने लोकसाहित्यात बदल होत राहतो, त्यामुळे लोकसाहित्य हे परिवर्तनशील असते.

**संदर्भ**

---

[1] गमे, भाऊसाहेब. धनगर, धनराज. '*लोकसाहित्याचे संशोधन*'. प्रशांत पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती; २०१६ पृ.२३

[2] गमे, भाऊसाहेब. धनगर, धनराज. 'लोकसाहित्याचे संशोधन'. प्रशांत पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती; २०१६ . पृ.२७

[3] गमे, भाऊसाहेब. धनगर, धनराज. '*लोकसाहित्याचे संशोधन*'. प्रशांत पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती; २०१६ . पृ.२७

[4] गमे, भाऊसाहेब. धनगर, धनराज. '*लोकसाहित्याचे संशोधन*'. प्रशांत पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती; २०१६ . पृ.४१

[5] शिवाजी विद्यापीठ. '-*लोकसाहित्य व लोककला*'. भाग.ए .एम -१ मराठी 'शिवाजी विद्यापीठ. ,कोल्हापूर, पृ.३

[6] शिवाजी विद्यापीठ. '-*लोकसाहित्य व लोककला*'. भाग .ए .एम -१ मराठी ,'कोल्हापूर, पृ.३

[7] शिवाजी विद्यापीठ. '-*लोकसाहित्य व लोककला*'. भाग .ए .एम -१ मराठी ,'कोल्हापूर, पृ.५

[8] शिवाजी विद्यापीठ. '-*लोकसाहित्य व लोककला*'. भाग .ए .एम -१ मराठी ,'कोल्हापूर, पृ.५

[9] शिवाजी विद्यापीठ. '-*लोकसाहित्य व लोककला*'. भाग .ए .एम -१ मराठी ,'कोल्हापूर, पृ.७

[10] गमे, भाऊसाहेब. धनगर, धनराज. '*लोकसाहित्याचे संशोधन*'. प्रशांत पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती; २०१६ , पृ.४३

[11] शिवाजी विद्यापीठ. '-*लोकसाहित्य व लोककला*'. भाग .ए .एम -१ मराठी ,'कोल्हापूर, पृ.७

[12] कुबल, रमेश. '*लोकसाहित्याचे अतरंग*'. मुंबई विद्यापीठ- मराठी विभाग आणि शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथम आवृत्ती; २०१४ पृ.४७

[13] कुबल, रमेश. '*लोकसाहित्याचे अतरंग*'. मुंबई विद्यापीठ- मराठी विभाग आणि शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथम आवृत्ती; २०१४. पृ.४५

[14] शिवाजी विद्यापीठ. '-*लोकसाहित्य व लोककला*'. भाग .ए .एम -१ मराठी ,'कोल्हापूर, पृ.२७

[15] शिवाजी विद्यापीठ'.-*लोकसाहित्य व लोककला*'. भाग .ए .एम -१ मराठी ,'कोल्हापूर, पृ.२६

[16] कुबल, रमेश. '*लोकसाहित्याचे अतरंग*'. मुंबई विद्यापीठ- मराठी विभाग आणि शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथम आवृत्ती; २०१४, पृ.७९

[17] शिवाजी विद्यापीठ. '*लोकसाहित्य व लोककला*'. भाग .ए .एम -१ मराठी ,'कोल्हापूर, पृ.२८

[18] शिवाजी विद्यापीठ'*लोकसाहित्य व लोककला*'. भाग .ए .एम -१ मराठी ,'कोल्हापूर, पृ.३१

[19] गमे, भाऊसाहेब. धनगर, धनराज. '*लोकसाहित्याचे संशोधन*'. प्रशांत पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती; २०१६, पृ.३२

[20] शिवाजी विद्यापीठ. -*लोकसाहित्य व लोककला*'. भाग .ए .एम -१ मराठी ,'कोल्हापूर, पृ.१४२

[21] शिवाजी विद्यापीठ. -*लोकसाहित्य व लोककला*'. भाग .ए .एम -१ मराठी ,'कोल्हापूर, पृ. १४६

[22] शिवाजी विद्यापीठ'-*लोकसाहित्य व लोककला*' . भाग .ए .एम -१ मराठी ,'कोल्हापूर, पृ. १४३

# प्रकरण २

# केपे परिसरातील लोकसंस्कृती आणि लोकजीवन

**प्रास्ताविक ........................................................................................................27**

**२.१ गोमंतकातील केपे परिसर ....................................................................................27**

२.१.२ केपे परिसरातील भौगोलिक रचना......................................................................29

**२.२ केपे परिसरातील 'लोक' .......................................................................................29**

२.२.१ कुळमी..........................................................................................................30

२.२.२ गावडा..........................................................................................................30

२.२.३ सुतार / लोहार .................................................................................................31

२.२.४ गुरव..............................................................................................................31

२.२.५ सोनार (शेट)....................................................................................................32

२.२.६ धोबी (मडवळ).................................................................................................32

२.२.७ न्हावी ............................................................................................................32

२.२.८ कुंभार ( मटकर) ...............................................................................................33

२.२.९ चांभार ...........................................................................................................34

२.२.१० घाडी............................................................................................................34

२.२.११ महार.............................................................................................................34

२.२.१२ देवळी...........................................................................................................35

२.२.१३ धनगर...........................................................................................................35

२.२.१४ नाईक-भंडारी.....36

**२.३ केपे परिसरातील लोकजीवन .....36**

२.३.१ व्यवसाय आणि उत्पादन.....37

२.३.२ बाजारपेट.....37

२.३.३  जैविक संपदा.....37

**२.४ केपे परिसरातील लोकसंस्कृतीचे घटक .....38**

२.४.१ केपे परिसरातील मौखिक परंपरा .....39

२.४.२ केपे परिसरातील भौतिक संस्कृती .....39

२.४.३ विधी लोकविश्वास लोककला समजूती इत्यादी.....40

२.४.४ केपे परिसरातील प्रयोगासिद्ध कला.....40

२.४.५ केपे परिसरातील लोकवाद्ये.....41

२.४.६ इतर संस्कृती.....41

**२.५ समारोप.....43**

**२.६ निष्कर्ष .....43**

**संदर्भ ग्रंथ .....44**

# प्रकरण २

# केपे परिसरातील लोकसंस्कृती आणि लोकजीवन

**प्रास्ताविक**

केपे परिसर हा निसर्गाने नटलेला प्रदेश आहे. कुशावती नदीच्या तीरावर वसलेला केपे परिसर भौगोलिक, सांस्कृतिक आणि इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. केपे परिसरात अनेक दैवतांची मंदिरे आहेत. वेगवेगळ्या जाती-जमातीचे लोक केपे परिसरात राहतात. लोकसाहित्य, लोकवाङ्मय आणि लोककथा या प्रकरणाची सैद्धांतिक मांडणी पहिल्या प्रकरणात केलेली आहे.

या पहिल्या प्रकरणानंतर ज्या प्रदेशातील दैवतविषयक लोककथांचा अभ्यास होणार आहेत, त्या केपे परिसराबद्दल दुसऱ्या प्रकरणात आपण जाणून घेणार आहोत. ‘केपे’ या नावाचा इतिहास, केपे परिसरातील भौगोलिक रचना, केपे परिसरातील लोक, तेथील जाती-जमाती या अंगाने अभ्यास केलेला आहे. तसेच केपे परिसरातील लोकजीवन, तेथील जैविक आणि वनसंपदा, लोकसंस्कृतीच्या अंगाने समजून या प्रकरणाद्वारे अभ्यास होणार आहे.

**२.१ गोमंतकातील केपे परिसर**

गोवा हा भारताचा छोटासा निसर्गसंपन्न प्रदेश आहे. “भगवान परशुरामाने तप आचरणासाठी पश्चिम समुद्रावर शरसंधान भूप्रदेश निर्माण केला.”[1] याविषयीची आख्यायिका कोंकणापासून केरळपर्यंत प्रचलित आहे, त्यामुळे भगवान परशुरामाने जो प्रदेश निर्माण केला त्यात गोमंतकही येतो. या विषयाची माहिती बा. द. सातोस्कर यांनी आपल्या गोमंत प्रकृती आणि संस्कृती खंड १ या पुस्तकात सविस्तर मांडलेली आहे. या प्रदेशाला प्राचीन इतिहास लाभलेला आहे. या प्रदेशाला गोवापुरी, गोमंतक, गोपकपट्टण, गोवा इ. नावे आहे.

गोमंतक हा समुद्र, डोंगर, शेती तसेच जैविक आणि वन्य सपंदा लाभलेला हा भूप्रदेश आहे. गोमंतकातील असाच निसर्गाने नटलेला आणि कुशावती नदीच्या काठावर वसलेला एक प्रसिद्ध गाव म्हणजे ‘केपे’. केपे परिसरात

अनेक दैवतांची मंदिरे आहे. या मंदिरातील अनेक सण उत्सव, विधी, परंपरा साजरा करण्याची प्रत्येक गावातील लोकांची त्यांची वेगळी पद्धत असते. या केपे परिसराबद्दल 'केपे' या स्थल नामाची माहिती, भौगोलिक रचना, लोकजीवनाबद्दल, येथील लोकसंस्कृतीबद्दल अधिक माहिती पुढे या प्रकरणातून मिळणार आहे.

### २.१.१ केपे स्थळनामाची माहिती

'केपे' या नामाविषयी, या परिसराबद्दल अनेक लेखकांनी आपली मते मांडलेली आहेत. कुशावती नदीच्या काठावर 'केपे' हे गाव वसलेले आहे. " 'कोशंबी' ह्या स्थळ नामाचे 'केपे' हे अपभ्रंश रूप असावे." [2] असे गोवा स्थलनामाची जडणघडण या पुस्तकात देसाई रत्नाकर राघोबा ह्यांनी सांगितले आहे. 'Quepem' हे नाव पोर्तुगीजांनी दिले असावे. 'Quepem' हे पोर्तुगीज भाषेत आहे. बाळकृष्ण दत्तात्रय सातोस्करांनी आपल्या गोमंतक: प्रकृती आणि संस्कृती या पुस्तकात गोव्यातील स्थलनामाची माहिती दिलेली आहे. त्यांच्या मते "कुस्मण (केपे) या गावाचे शिलाहारकालीन नाव होते. कुष्मांडी आणि कुष्मांड म्हणजे कोहळा." [3] गोव्यातील काही गावांची स्थळनामे वृक्ष-वनस्पती व फळ निर्दशक आहेत. त्यातील 'केपे' हे नाम ही आहे. केपे परिसरातील वाहणाऱ्या कुशावती नदीचा संबंध सरळ 'केपे' या नावाच्या संदर्भात येतो, या परिसरात पूर्वी भरपूर 'कुश' म्हणजे दर्भ पिकायचा. त्यामुळे या परिसराला 'कुशवन', 'कुस्मण', 'कुशबन' अशी नावे लाभली. केपे परिसरातील कुशवनातून वाहणाऱ्या, कुशवन फुलविणाऱ्या नदीला 'कुशावती' हे नाव प्राप्त झाले.

आशा मणगुतकरानी संपादित केलेल्या 'चंद्रवाडी' या स्मरणीकेतून केपे परिसराची संस्कृती व इतिहासिक नावा संदर्भात माहिती मिळते. 'भोजवंशी राजा देवराज गोमीन' यांनी गोमंतकात आपली स्वतंत्र राजधानी स्थापन केली. या राजनगराला 'चंद्रपूर' असे नाव दिले. चंद्रपूर म्हणजे आजचे 'चांदर' होय. राजा देवराजा गोमीन हे चंद्रेश्वराचे म्हणजे महादेवाचे उपासक होते. देवराजानंतर चंद्रवर्मा राजांनी चंद्रनाथ पर्वतावर चंद्रेश्वराचे देऊळ बांधले आणि ब्राह्मणास दान दिले. "चंद्रेश्वर देव व चंद्रनाथ पर्वत ही नावे स्वतंत्र भोजाच्या दुसऱ्या तक्ताधीश राजा चंद्रवर्मा यांनी दिलेली असली तरी चंद्रवाडी हे नाव चंद्रपूर राजधानीचे संस्थापक देवराजा गोमीन यांच्याकडून या प्रदेशाला प्राप्त झाले."[4] केपे परिसरात असलेले चंद्रेश्वर मंदिरामुळे इतिहासात ह्या परिसराला 'चंद्रवाडी' हे नाव मिळाले. या चंद्रवाडी भागात पूर्वीचे काकोडे, कुंकळी, बाळ्ळी, असोळणे ही गावे होती. चंद्रवाडीतील मुख्य गाव आमोणे

होता. केपे परिसरातील संस्कृती ठेव्याचा विचार चंद्रेश्वर पर्वतावर असलेल्या श्री चंद्रनाथ मंदिरापासून करावा लागतो.

**२.१.२ केपे परिसरातील भौगोलिक रचना**

गोवा या राज्याला उत्तर गोवा आणि दक्षिण गोवा असे दोन जिल्हे आहेत. गोव्यात एकूण १२ तालुके आहेत. दक्षिण गोव्यातील सासष्टी, सांगे, मुरगाव, धारबांदोडा, काणकोण आणि केपे हे तालुके आहे. केपे तालुका हा दक्षिण गोव्यात समावतो. केपे तालुक्यात दोन नगरपालिका आहेत. एक 'केपे' नगरपालिका आणि दुसरी 'कुडचडे' नगरपालिका. केपे परिसरात अडणे, अंबावली, असोडा, बाळ्ळी, कोठंबी, पारोडा, आमोणे, काकोड, मोरपिल्ला आदि गावे येतात.

"केपे तालुक्याचा भौगोलिक विस्तार ३१८.२४ आहे. केपे परिसरातील हिंदू धर्माची लोकसंख्या ६३.७८%, केपे परिसरातील ख्रिश्चन धर्माची लोकसंख्या २९.४५% , केपे परिसरातील इस्लाम (मुस्लिम) धर्माची लोकसंख्या ६.५३%, इतर धर्माची लोकसंख्या ०.२४% आहे.

केपे परिसरातील अधिक लोक कोंकणी भाषेत बोलतात. कोंकणी भाषा बोलणाऱ्यांची संख्या ७५.६३%, मराठी बोलणाऱ्यांची संख्या ८.२५%.  हिंदी बोलणाऱ्यांची संख्या ६.०६%. कन्नड बोलणाऱ्यांची संख्या ४.१३%, उर्दू २.०० इतर भाषा बोलणाऱ्यांची संख्या ३.९३% आहे."[5]

**२.२ केपे परिसरातील 'लोक'**

केपे परिसरातील भौगोलिक प्रदेशाशी संबंधित लोकसाहित्याचा अभ्यास होत असल्याने या प्रदेशातील लोकांविषयी जाणून घेणे महत्त्वाचे आहे. केपे परिसरात अनेक लोक जमाती आहेत. केपे परिसरातील दैवत लोककथांचा अभ्यास करत असताना अनेक दैवतांचे कार्य, पूजा, विधी करण्यासाठी या लोक जमाती वावरत असतात. केपे परिसरातील लोकसाहित्य सामग्रीला ज्या लोकांनी समृद्ध आणि संपन्न केले त्या 'लोका' विषयी जाणून घेणे गरजेचे आहे.

### २.२.१ कुळमी

'कुळमी' ही जमात अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण अशी 'लोकसमाजात' असून वनक्षेत्रात आणि डोंगरळ परिसरात जास्त आढळते. ही जमात प्रोटो-ऑस्ट्रलाइड ह्या जमातीशी जसा 'गावडा' समाजाचा संबंध येतो तसाच 'कुळमी' समाजाचाही संबंध येतो. मुळात हा समाज एकच असलेला, पण दोन वेगवेगळे समाज असे आज चित्र पाहायला मिळते. गावडा आणि कुळमी लोकांचे राहणीमान, कुळ, कामधंदा, चालीरीती यात साम्य आहेत. फक्त वेगवेगळया नावाने या समाजाला ओळखतात.

'केपे' परिसरात कुळमी जमात असलेली पाहिला मिळते. 'वेळीप' आणि 'गावकर' हे कुळमी जमातीत येतात. कुळमी समाजात वेळीप आणि गावकर हे गावातील देवाचे धार्मिक कार्य करतात. कुळमी समाजाचे जीवन, शेती व्यवसाय, झाडांशी प्राण्यांची असलेला संबंध, लोककला, त्यांची लोकसंस्कृती राहणीमान या सर्व गोष्टीमुळे त्यांना वैशिष्ट वेगळेपण प्राप्त झाले आहे.

### २.२.२ गावडा

'केपे' परिसरात 'गावडा' ही जमात आहे. "गावडा ही जमात प्रोटो-आस्ट्रोलाइड वंशीय असून आर्यापूर्वीच ती गोव्यात आली होती." [6] या जमातीचा मुख्य व्यवसाय शेती, कुळागरे व भाटात काम करणे. केपे परिसरात 'हिंदू गावडा' तसेच 'ख्रिश्चन गावडा' समाज ही आहे. गोव्यात पोर्तुगीज सरकारच्या काळात ज्या गावडा समाजाला पोर्तुगीजांनी बाटवले त्यांना 'ख्रिश्चन गावडा' म्हणून ओळखतात. केपे परिसरातील काकूमड्डी, बेतमड्डी या गावात ख्रिश्चन गावडा समाजाचे लोक राहतात.

"गोमंतकात कुणबी व गावडा या शेतकरी जाती आहे. बरेच लोक आणि जाती हे नाव धारण करतात परंतु सर्व एकच नाही त्यात बरेच भिन्नत्व आहे."[7] काही केपे परिसरातील गावडा जमातीची लोक गावडा आडनावे लावताना दिसतात. या जातीचे लोक शेतकामे करतात. त्यांची चालीरीती, वेशभूषा, भाषा, जेवणपद्धती, पुरुषांचे पोशाख- लंगोटी, कुडते, कांबळ आणि स्त्रियांचे पोशाख वैशिष्ट्ये 'देठली' नेसण्याची पद्धत या समाजात प्रचलित आहे.

### २.२.३ सुतार / लोहार

सुतार आणि लोहार जातीचे लोक प्रत्येक गावात असतात. आपला देश हा कृषीप्रधान असल्याने या जातीची पूर्वी फार गरज होती. केपे परिसरातील सुतार आणि लोहार या जातीचे लोक ‘चारी’ आणि ‘मेस्त’ या नावाने ओळखतात. “कोणत्याही व्यवसायात काम करणाऱ्या कामगारच्या तीन पायऱ्या असून त्या पायऱ्यावर असणाऱ्यांना Apprendiz (ॲप्रेटीस) शिकाऊ, official (कुशल) आणि Mestre (मास्टर = तज्ज्ञ) असे पोर्तुगीज भाषेत संबोधले जाते. यापैकी मेस्त हा शब्द मॅस्त्री यावरून आला असून प्रथम तो सुतारांना उद्देशून वापरण्यात आला आणि पुढे जातीवाचक बनला.” [8] या जातीचे लोक सर्व साधारण कामापेक्षा जास्त कलाकुसरीची कामे करणारे असतात. या जातीतील लोक हिंदू धर्मातील सर्व संस्कार समाजात करतात. त्यांच्या मुलांचे मुंजीबंधन होते. लग्नविधी ही ब्राह्मणासारखेच होतो.

गोमंतकात प्रत्येक गावात मेस्ताचे घर असतेच. त्यांची वस्ती अधिक प्रमाणात ‘केपे’ तालुक्यातील ‘कुंकळ्ळी’ गावात आढळते. चारी, मेस्त हे लोक गावातील विशेष कार्य करतात. देऊळात देवांची कामे करण्यासाठी यांची गरज असते. देवस्थानातील देवांची पालखी, रथ, देऊळाचे दरवाजे (द्वार), केरीव खांब ते बनवतात. गोव्यात कुशल कारागिरी जे आजही चंदनी लाकडाच्या नक्षीदार वस्तू बनवितात ते चारी लोक केपे परिसरातील कुंकळ्ळी या गावात आहे. आर्थिक दृष्टीने ही जात दुर्बल असली तरी कष्टकरी कलावंत म्हणून प्रसिद्ध आहे.

### २.२.४ गुरव

गुरवांची राहणी ब्राह्मणासारखीच असते. केपे परिसरात ‘गुरव’ या जातीच्या लोकांची वस्ती कमी प्रमाणात पाहिला मिळतात. एखादा गावात ५-६ गुरवांची घरे असतात. “आपल्या मूळपुरुषाने शिवपूजेत अनास्था दाखवल्यामुळे महादेवाने त्यांना श्राप दिला व उच्च वर्णापासून च्युत केले, असे हे सांगतात…वेतन घेऊन पूजा करणारे ब्राह्मण हव्यकव्याला निषिध्द असल्याचे स्मृतीकारांनी ठरविल्यामुळे गुरव हे निषिध्दत आले व पुढे त्यांची एक स्वतंत्र जात बनली असा तर्क आहे.” [9] शंकराची पूजा म्हणजे शिव स्वरूपी जे दैवत आहे. रवळनाथ, बेताळ, कालभैरव, भूतनाथ यासारख्या गणांची पूजा गुरव करतात. प्रसाद लावणे, कौल घेणे, दसऱ्याच्या दिवशी सणाला तरंग घेणे, गाऱ्हाणे घालणे हे काम गुरव करतात.

### २.२.५ सोनार (शेट)

सोनाराला गोव्यात ‘शेट’ या नावाने संबोधले जाते. “सोनार हा सुवर्णकार या शब्दाचा अपभ्रंश असून तो त्याचा व्यवसायनिदर्शक आहे.”[10] सोनाराचा आचार-विचार, राहणी व धार्मिक व्यवहार ब्राह्मणासारखेच आहेत. ‘शेट’ हा प्रत्येक गावात असतो. “शेट हा शब्द संस्कृतातील श्रेष्ठ, श्रेष्टीन या शब्दांचा अपभ्रंश होय.” [11] धार्मिक कार्यासाठी सोनाराची आवश्यकता असते.

देऊळात देवासाठी दागिने, सोन्या- चांदीच्या मूर्ती, रथ इत्यादी सोनार बनवतो. केपे परिसरातील काही देवी-देवता कुळागरे - भाटाने श्रीमंत आहेत, तर काही सोन्या- चांदी, पैसे, धनाने श्रीमंत आहे. उदाहरणार्थ:- *सोन्या-चांदी, पैसे, धनाने श्रीमंत असलेली केपे परिसरातील देवी म्हणजे फातर्पोची कुंकाळ्ळीकान देवी, आणि फातर्पोची शांतादुर्गा फातर्पोकान देवी भाटानी, कुळगरानी श्रीमंत आहे.* या देवी- देवतांच्या स्वर्णभूषण बनवण्यासाठी गावात शेंट (सोनार) पाहिजे असतो. ‘ शेट’ हे सुवर्णालंकारातील कलाकुसर हे कौशल्याचे श्रेष्ठ काम आहे.

### २.२.६ धोबी (मडवळ)

धोबीला गोव्यात ‘मडवळ’, ‘परीट’ या नावाने संबोधले जाते. पूर्वी ‘धोबी’ हा गावातील लोकांचे कपडे धुण्याचे काम करायचा. पण आता हे चित्र दिसत नाही, म्हणजे धोबी समाजाचे लोक आता कपडे धुण्याचे कार्य करताना जास्त दिसत नाही, त्यांचे स्वतःचे कपडे इस्त्री करण्याचे दुकाने असलेली पाहायला मिळतात. पूर्वी त्यांना त्यांच्या कामासाठी ग्राम संस्थेच्या उत्पादनातला वाटा दिला जायचा, पण आता पैशाने व्यवहार केला जातो.

“धू म्हणजे धुणे आणि धौतिक म्हणजे धुण्याचे काम करणारा. धौतिक – धोबीअ – धोवीअ - धोबी असा या शब्दाचा व्युत्पादिला जातो.” [12] देवस्थानातील देवांचे कार्य ‘मडवळ’ ही जात लागते. देवळात उत्सवाच्या वेळी देवाला पायघड्या घालण्याचे काम धोबी करी. मडवळ समाज आपल्या कुलदेवताप्रमाणेच ज्या गावात राहतात त्या गावातील देवाचे कार्य ते करत.

### २.२.७ न्हावी

गोव्यातील प्रत्येक गावात ‘न्हावी’ असतोच. गोमंतकात न्हावीला ‘महाले’ या नावाने संबोधले जाते. काही ‘महाले’ समाजातील लोक आपले आडनावही महालेच लावतात. ‘महाले’ या नावाची त्यांची स्वतंत्र जातही

आहे. माणसाच्या जन्मायेण्यापासून ते मृत्यू वेळी देखील धार्मिक विधी करण्यासाठी न्हावी हा लागतोच. प्रत्येक समाजातील लोकांना आपले केस कापण्यासाठी न्हावीची गरज असते.

"न्हावी हा शब्द स्नापित या संस्कृत शब्दावरून प्राकृतात ना (न्हा) विय, आणि पुढे मराठीत न्हावी बनला."[13] न्हावी समाजाचे लोक कुठेही एका गावात केंद्रित झालेले दिसत नाहीत, तर या समाजाचे लोक गोव्यातील प्रत्येक गावात विखुरलेले दिसतात. केपे परिसरातील प्रत्येक गावात 'महाले' समाजातील लोकांची घरी आहे. पूर्वी 'महाले' समाजाच्या लोकना गाव वाटून दिले जायचे, त्याप्रमाणे ते त्या गावात जाऊन एका झाडाखाली किंवा एका मोकळ्या जागेत बसून गावातील लोकांचे केस, दाढी करत. याला कोंकणी भाषेत 'गावकरपाक वाता' असे म्हणत. त्यावेळी लोकांकडे पैसे जास्त नव्हते, त्यामुळे गावातील लोक त्यांना नारळ, कडधान्य अश्या गोष्टी त्यांना देत.

**२.२.८ कुंभार ( मटकर)**

मातीची भांडी बनवणारे म्हणजे कुंभार जातीचे लोक. केपे परिसरात कुंभार लोकांची घरे आहे. कुंभार जातीचे सर्वच लोक आता मातीचे भांडे बनवतात असे नाही, तर इतर व्यवसाय ही करताना ते दिसतात. कुंभार जातीचे लोक 'मटकर' आडनाव लावतात. "कोकणातील कुमार किंवा मराठीतील कुंभार हा शब्द संस्कृत 'कुंभकार' या शब्दावरून आला आहे."[14] कुंभाराचा व्यवसाय वंशपरंपरागत चालू असतो. मातीचे नळे, कौले, मडकी, मातीच्या भांडी इत्यादी तो बनवतो. पूर्वी मातीच्या भांड्यात स्वयंपाक केला जायचा. त्यामुळे कुंभाराची आवश्यकता जास्त असे, पण आता लोक मातीच्या भांड्यात जेवण बनवत नाही, तरीही गावातील प्रत्येक घरात एक तरी मातीचे भांडे असतेच.

धार्मिक विधीसाठी काही ठिकाणी आजही मातीच्या भांड्यांचा वापर होतो. लग्नकार्यात करवली जी मातीची मडकी हातात धरते त्याला 'करो' असे म्हणतात. अंतिम संस्काराच्या वेळी मातीच्या मडक्याचाच वापर करतात त्याला 'वाशो' असे म्हणतात. मटकीचा आकार, मटकी बनवण्याची पद्धत एकाच असली तरी, प्रत्येक विधीसाठी वापरणाऱ्या या मातीच्या भांड्यांना वेगवेगळी नावे असतात.

### २.२.९ चांभार

चांभार ही जात अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातीत उच्चवर्णीय आहे. 'महार' ही जात जशी गावाबाहेर राहत होती तशी चांभाराची स्थिती नव्हती. चांभार जातीचे लोक 'मांद्रेकर', 'पार्सेकर', 'वाडकर' अशी आडनावे लावतात. चांभार लोकांनी ग्रामनामावरूनही आडनाव लावतात.

गोमंतकातील महार आणि चांभार या जातीत फरक म्हणजे महार लोक देवस्थानाचे कार्य करण्यासाठी महत्वाचा आहे, तसा चांभार जास्त लागत नाही. चांभार लोक इतराप्रमाणे सर्व सण उत्साहाने साजरा करतात.

### २.२.१० घाडी

केपे परिसरात काही गावात 'घाडी' ही जमाती आहे. घाडी जमातीचे लोक 'घाडपण' करतात, म्हणजे गावातील देवाकडे संभाषण साधने, ग्रामदेवताची पूजा करणे, एखादा भूत, वारे यांच्यापासून पिढीत असलेल्या लोकांना मदत करणे, देवाला गाऱ्हाणे घालणे ही कामे करतात.

"घाडपण' करणारा तो 'घाडी' देवचाराच्या सहाय्याने गावाच्या पंचिषट ग्रामपुरुष, ग्रामदेव, आदि देवतांच्या सहाय्याने यजमानांच्या कुलदेवतापर्यंत आपल्या यजमानासाठी रद्दबदली करण्यासाठी घाडी जे जे करत ते ते सारे 'घाडपणात' जमा होते."[15] केपे परिसरात घाडी लोकांची घरे आहे. त्यांचा एक स्वातंत्र असा स्वतःचा वेगळा वाडा ही आहे. उदाहरणार्थ :- *घाडीवाडा*. केपे परिसरात राहणारे अनेक जण घाडी हे आडनाव लावतात, पण हे सगळेच घाडीपण करणारे नव्हे. 'घाडीपण' करणारे खरे घाडी आहे ते कधीही आपल्या कामाचे पैसे हात पुढे करून मागत नाहीत, तर आपल्या खुशीने जो व्यक्ती त्यांना जे काही देतो तेच स्वीकारतात.

### २.२.११ महार

महार जातीतील लोकांच्या घरी पूर्वी इतर जातीचे लोक जात नसे, त्यांच्याशी नीट बोलले देखील जात नसे. महार ही जात अस्पृश्य मानणाऱ्या जातींपैकी एक जात होती, पण आताच्या काळात हा भेदभाव कमी दिसतो. गावात महारांचे स्थान खास आहे. काही गावात पूर्वी महार नसायचे, त्यांना देवाचे कार्य करण्यासाठी दुसऱ्या गावाहून आणले जायचे. गावात आणून त्यांना राहण्यासाठी जागाही दिली जात होती.

धार्मिक कार्य असेल तर महाराची गरज असते. देऊळात जत्रेवेळी, सण उत्सवाच्या वेळी देवासाठी वाजंत्री म्हणून महार जातीचे लोक पाहिजे असतात. एखादा प्राण्यांची बळी देवाला मान म्हणून देण्याचे कार्य काही ठिकाणी महार जात करतात, ह्या ऐवजी गावकर लोकही देवाला मान देतात. एखादा भूत प्रेत लागले तर त्या व्यक्तीची दृष्ट काढण्यासाठी, काही गावात लग्नविधीत वर वधूला देवळापर्यंत वाजंत्री म्हणून घेऊन जाण्यासाठी महार लागतो.

### २.२.१२ देवळी

"देवाची सेवा करून गणिक वृत्तीने राहणारी स्त्री म्हणजे देवदासी." [16] 'देवळी' या जातीत रूढ झालेली प्रथा म्हणजे देवाला मुली अर्पण करणे. मंदिरातील देवाचे कार्य देवळी लोक करत. "देवमूर्ती म्हणजे प्रत्यक्ष देव असे मानून त्याला स्नान, गंध, पुष्प, अन्न, वस्त्र इत्यादी मानवी भोग अर्पण करण्याची प्रथा देवपूजा या नावाने रूढ झाल्यावर, देवाला शयनबोगीही मिळावा म्हणून मंदिरात दासी ठेवण्याची प्रथा मध्ययुगात सुरू झाली." [17] ह्या देवदासींचे लग्न समाजातील इतर लग्नाप्रमाणे नसतात. देवरूपी समजणाऱ्या मंदिरातील खांब्याला किंवा नंदिशी त्या मुलीचं विवाह केलं जायचं. एक सुंदर मुलीला देवाला अर्पण केले जायचे, ती मुली देवाची सेवा करत असत. या देवाला वाहणाऱ्या 'शेंस घालवणे' म्हणतात.

या देवदासी मंदिरात देवाची कामे करून आपले पोट चालवत. या देवदासी स्त्रियांना गोव्यातील जमीनदार, श्रीमंत माणूस त्यांची पावणी (बोणी) मारत. जो व्यक्ती त्यांच्यावर जास्त पैसे लावत त्यांच्याबरोबर ही देवदासी स्त्री जात. ह्या स्त्रियांना राहण्यासाठी जागा, कपडे त्यांना लागणाऱ्या गरजेच्या वस्तू, सर्व तो व्यक्ती देत. त्या व्यक्तीकडून त्यांना मुल ही होत. या विषयाची माहिती संकलन करत असताना 'काकोडा' गावातली शिल्पा देविदास यांचा कडून मिळाली. हे देवळी जातीची लोक ग्रामनावे आडनाव म्हणून लावत, तर काहीजण 'देविदास' हेच नाव आडनाव लावतात दिसतात.

### २.२.१३ धनगर

केपे परिसरात धनगर समाजाच्या लोकांची वसाहत आहे. गाई, म्हैस, शेळी पाळणे आणि त्यांचे दूध विकून स्वतःचे पोट भरणे हा त्यांचा मूळ व्यवसाय होय. धनगर लोकांना 'गवळी' असेही म्हणतात. केपे परिसरात या

जातीचे त्यांचे स्वतःचे स्वतंत्र असा गाव आहे. उदाहरणार्थ:- *गोवळ्यावाडी*. पण या गावात राहणारी सर्वच लोक धनगर नव्हे तर इतर जातीचे लोकही राहतात. धनगर लोक आपल्या जनावरांची काळजी खूप घेतात.

### २.२.१४ नाईक-भंडारी

गोमंतकात बहुतांशी नाईक-भंडारी समाज आढळतो. या समाजाची वसाती केपे परिसरातही आहेत. बहुतांशी भंडारी समाजाच्या लोकांनी नाईक हे कुटुंबनामे स्वीकारलेली आहे. “ भंडारी व नाईक या दोन स्वतंत्र जाती नसून किंवा एक दुसऱ्याची पोटजात नसून त्या दोन्ही मिळून एक जोड-जात बनलेली आहे.”[18] अर्थात ‘नाईक’ म्हणणारी हे नाईक-भंडारी नाहीत. नाईक नाव लावणार हे लोक स्वतःला भंडारी म्हणत नाही. नाईक समाज मानतो की भंडारी हे कनिष्ठ आहे. एका दंतकथा अनुसार ‘भावपूर्ण’ हे भंडारी जातचे दुसरे नाव आहे. भंडारी जातीची उत्पत्ती सांगितली जाते की भांडाराचा अधिपती तो भंडारी.

या व्यतिरिक्त गोमंतक मराठा समाजातील देसाई, सावंत, बामण ई. जातीचे लोक केपे परिसरात आहे. केपे परिसरातील या सर्व जातींचा वैशिष्ट असा व्यवसाय, विधी, परंपरा पाहिला मिळतात. केपे परिसरातील लोक या अंतर्गत माहिती इथे उपरोक्त मांडलेली दिसते.

### २.३ केपे परिसरातील लोकजीवन

केपे परिसर जसा निसर्ग सौंदर्याने नटलेला आहे, तसेच केपे परिसरातील लोकही निसर्गाच्या सानिध्यात राहून जीवन जगणारी आहे. केपे परिसरात राहणाऱ्या उच्चवर्गीय (बामण, देसाई, सावंत ज्यांचा समावेश गोमंतक मराठा समाजात होतो) या लोकांची जास्त भाट- कुळागरे असलेली दिसतात. तसेच केपे परिसरात काही लोकांची शेती ही आहे. केपे परिसरातील ‘लोक’ या विषयी उपरोक्त मांडलेल्या माहितीवरून समजते की केपे परिसरात अनेक जातीचे लोक राहतात. या लोकांची वेगवेगळे व्यवसाय आहे. केपे परिसरात देवी-देवतांची मंदिरे आहे. ह्या दैवतांचे सण-उत्सव, विधी, रुढी, परंपरा, या दैवताच्या अनेक कथा समाजात प्रचलित आहे. केपे परिसरातील व्यवसाय-उत्पादन, औषधी वनस्पती, जैविक संपदा, लोकसंस्कृती याबद्दलचे विवेचन पुढे केले आहे.

### २.३.१ व्यवसाय आणि उत्पादन

केपे परिसरातील वेगवेगळ्या जाती-जमातीचे वेगवेगळे व्यवसाय आहे. केपे परिसरात आपल्या परंपरेने जातीप्रमाणे व्यवसाय करणारे, तसेच उच्च अधिकारी पदावर काम करणारे लोक राहतात. केपे परिसरातील अनेक प्रकारचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होतो. या परिसरातील मुख्य उत्पादन म्हणजे शेती (भात) होय. या व्यतिरिक्त काही लोक (ऊशेल) ऊसही लावतात, तसेच नारळ, सुपारी, काजूची लागवड इत्यादी व्यवसाय करतात. मासे पकडून विकणारी लोकही केपे परिसरात आहे.

केपे परिसरातील लोक प्रत्येक ऋतूप्रमाणे उत्पन्न होणारी फळे, भाजी, फुले उदाहरणार्थ:- रतनआबोली, मोगरा आदि फुले, भाज्यात तांबडी भाजी, मुळा, धवीभाजी इतर पालेभाजी तसेच मिरी, मिरची लावणे, आपल्या बागेतील फळे, मळयातील उत्पादन या सर्वांचा व्यवसाय करतात. वयस्कर लोक किंवा ज्या लोकांची शेती आहे ते लोक आजही भातशेतीतून पिकवणाऱ्या तांदुळाची पेज (उकड्या तांदळाची पेज) आहारात वापरतात.

### २.३.२ बाजारपेट

केपे परिसरात अनेक गावे येतात. ‘केपे’ आणि ‘कुडचडे’ हे गाव नगरपालिका अंतर्गत येतात. प्रत्येक गावात आठवड्याच्या एक दिवस लहानसा बाजार भरतो. ‘केपे’ आणि ‘कुडचडे’ या गावात इतर गावाप्रमाणे मोठा बाजार भरतो. केपेत रविवारी आणि कुडचडेला ही रविवारी बाजार भरतो. या दिवशी वेगवेगळ्या धर्माचे लोक या बाजारात आपली दुकाने लावतात, आपला व्यवसाय करतात. कपडे, फुले, फळे, मासे (सुकेखारे), भाजी, नारळ, नारळाचे तेल, मिरची, मसाला छोट्या सामानापासून मोठ्या सामानापर्यंत माणसाला आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी या बाजारात विकतात, त्यामुळे माणसे व्यवहाराच्या दृष्टीने एकमेकांशी जोडून राहतात.

### २.३.३ जैविक संपदा

पाळीव प्राण्यांबरोबर अन्य प्राणी, पशु, पक्षी हा जैविक संपदा असलेला केपे परिसरात आहे. त्यांची खूप काळजी घेतात. केपे परिसरात अनेक प्रकारचे पशु- पक्षी आहे. झाडांच्या फांदीवर मनमोहक त्यांचे घरटे दिसतात. ‘कृषी’ हा या परिसराचा मुख्य व्यवसाय असल्याने काही लोकांकडे गाय, बैल, म्हैस, बकरी पाळलेली आहे. ह्या प्राण्यांचे पालन पोषण ती आपल्या मुलासारखे प्रेमाने करतात. या प्राण्यांचे दूध विकून आपले घर चालवतात. केपे

परिसरातील बहुतांश घरात एकतरी पाळीव प्राणी असतोच. घरात मांजर, कुत्रा इतर पाळीव प्राणी असल्याने कोणतीही वाईट शक्ती घरात येत नाही असेही हे लोक मानतात. वृक्षवेली तसेच पक्षी,पशु प्राणी यांचे समृद्ध संपदा केपे परिसरात अनुभवायला मिळते.

**२.४ केपे परिसरातील लोकसंस्कृतीचे घटक**

गोव्याच्या अन्य गावाप्रमाणे केपे परिसराला समृद्ध असा लोकसंस्कृतीक संपन्नतेचा वारसा लाभलेला आहे. केपे परिसरातील संस्कृती येथील लोकजीवनातून समोर येते. केपे परिसरातील मंदिरांना वैशिष्ट्य स्वरूपाची संस्कृती लाभलेली आहे. गावातील कष्टकरी लोकांच्या अं:तकरणातील श्रद्धा आणि भक्तीचा अपूर्व संगम या भागात पाहायला मिळतो. केपे परिसरातील काही जुन्या घरांचे नमुने म्हणजे मातीच्या भिंती असलेली, लाकडी माळयाचे, कौलारू घरे आजही आहे. अंगणात तुळशी वृंदावन आणि सभोवताली फुले झाडे. प्रत्येक घरात सणासुदीच्या दिवशी शेणाने सारवलेले अंगण, सुबक रांगोळी, दारात आंब्याच्या पानाचे तोरण बांधतात.

केपे परिसरात मंदिरातील देवांच्या मूर्ती, शिल्पकला, नक्षीदार दरवाजे, केरीव खांबे, या संस्कृतीक कलेमुळे केपे परिसरतील मंदिरे प्रसिद्ध आहे. केपे परिसरात अनेक दैवतांचे उत्सव साजरा करतात. या परिसरातील वर्तमान काळातील समाजाचा पेहराव म्हणजे पेंट, शर्ट, साडी इ. या प्रमाणात अजूनही वयस्कर म्हातारी माणसे नऊवारी कापड नेसताना दिसतात. नारळी पौर्णिमा, नागपंचमी, दसरा, आषाढी एकादशी, दिवाळी, गणेश चतुर्थी, शिगमा, होळी इत्यादी सण मोठ्या उत्सवात साजरा करतात.

केपे परिसरातील मोठ्या प्रमाणात हिंदूची लोकसंख्या आहेत, त्याचप्रमाणे या परिसरातील बहुतांशी हिंदू कुटुंबात गणेश चतुर्थी दिवशी प्रत्येकाच्या घरी गणपतीची मूर्ती आणून मोठ्या थाटात पूजा करतात. काही गावात ‘तिरसल’ केले जाते. बहुतांश केपे परिसरातील लोक मासे खाणारे आहेत. केपे परिसरातील संस्कृतीचा लोकसाहित्याच्या व्याप्ती मौखिक परंपरा, भौतिक संस्कृती, विधी लोकविश्वास लोककला समजूती इत्यादी, प्रयोगसिद्ध लोककला या अंगाने अभ्यास करणे गरजेचे आहे.

### २.४.१ केपे परिसरातील मौखिक परंपरा

मौखिक साहित्य हे परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होते, त्यामुळे केपे परिसरातील लोकगीते, म्हणी, स्त्री गीते, पुरुष गीते, उखाणे या सर्वांचा समावेश मौखिक संस्कृतीत होतो. सण उत्सवात लोककथा, लोकगीत, कथा गीत म्हणतात. देवी देवतांच्या जत्रोत्सवात पालखी समोर गीत, भजन सादर केले जाते. केपे परिसरातील ग्रामीण भागात आजही लग्नसमारंभात स्त्रिया मोठ्या आनंदाने हळद लावताना, मांडप घालण्यासाठी मेडी लावताना, बाशिंग बांधण्याच्या विधी वेळी, कांढण गीत, दळण गीत यासारखी गीते म्हणतात. या परिसरातील लोकगीतातून, लोककथातून प्रतिबिंबित होणारे लोकजीवन येथील लोकसंस्कृती दर्शवते.

केपे परिसरात उत्सवाच्या वेळी मंदिरात देवाच्या प्राचीन कथेवर आधारित कथा गीते म्हटली जातात. या कथा गीतातून देवाची स्तुती केली जाते. मंदिरातील उत्सव संगीत भजन, कीर्तन, पंचवाद, आरत्या सादर केल्याशिवाय पूर्ण होत नाही. स्त्रिया आपल्या गीतातून, उखाण्यातून, म्हणीतून समाजजीवन दर्शवतात. पूर्वी स्त्रियाचे जीवन म्हणजे चूल आणि मूल पुरते होते. त्यांच्या भावना, दुःख, सुखातील प्रसंग मांडण्यासाठी स्त्रिया गीतातून, म्हणण्यातून, उखाण्यातून, व्यक्त होत असे. कथागीतातून, लोककथातून, समाजात दडलेल्या पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक स्वरूपाच्या अनेक गोष्टी समोर येतात.

### २.४.२ केपे परिसरातील भौतिक संस्कृती

केपे परिसरातील काही व्यवसाय एका पिढी पुरता न ठेवता तो आपल्या पुढच्या पिढीला सुपूर्त केला जातो. मंदिरातील देवाची कामे पूर्वीपासून एकच समाज करत असेल तर तो पिढ्यान पिढ्या त्याच कुटुंबाकडे ते काम करण्याचा हक्क राहतो. उदाहरणार्थ:- *महार जातीचे लोक देवाच्या उत्सवाच्या वेळी वाजंत्री म्हणून असतात, ते काम त्या जातीच्या लोकांनी करावे लागते. एखादा देवाला गाऱ्हणे घालायचे काम गावातील गावकर करत असतात तर ते काम त्यांनीच करावे लागते.*

तसेच एखादा देवस्थानाचे महाजनपद, कुळाजन हे परंपरेने तसेच त्यांच कुटुंबात राहतात. उदाहरणार्थ: *श्री सातेरी शांतादुर्गा( शेल्डे) या देवीचे महाजनपद देसाई कुटुंबातील लोकांकडे आहे*. एखादा गावातील वयस्कर माणूस आपल्या औषधी वनस्पतीचे ज्ञान आपल्या मुलांना देतो, ते ज्ञान आपल्या कुटुंबा व्यतिरिक इतरापर्यंत न पोहोचणे,

इतरांना जर त्याची माहिती मिळाली तर ह्या आपल्या औषधी वनस्पतीचे ज्ञान कमी होणार अशी ही त्यांची मानसिकता असते. अशा तऱ्हेने भौतिक संस्कृतीतील अनेक घटक केपे परिसराला लोकांनी जतन करून ठेवलेले आहे.

### २.४.३ विधी लोकविश्वास लोककला समजूती इत्यादी

आधुनिक काळात लोक समाजातील काही विधी लुप्त होत आहे. केपे परिसरातील अनेक गावात वेगवेगळ्या विधी आजही करतात. प्रत्येक गावातील विधी करण्याची आपली वेगळी अशी पद्धत असते. जुन्या विचारासोबत आधुनिक गोष्टींचा विचारही गावातील लोक करतात.

उदाहरणार्थ:- *'खान्सीदेवी' नावाची एक देवी 'काकोडा' गावात आहे. या देवीला पूर्वी सोन्याचे आभूषण दिले जायचे. अशी त्यांची परंपरा होती. एखादा घरातील वडीलधाऱ्याकडून एक चूक घडली. सोन्याचे आभूषण देताना एक दागिने कमी दिलं. त्यामुळे देवीला क्रोध आला आणि देवीने सोन्याने भरलेला करंडा बाहेर फेकला. त्यामुळे या घरात जास्त सोन्याचे दागिने येत नाही. परंतु परंपरा चालू ठेवायला पाहिजे. त्यासाठी गावातील लोक देवीला सोन्याच्या दागिना ऐवजी सिंदूर, फणी, काजळ, खण, श्रृंगारचे वस्तू दिले जातात आणि आपली विधी पूर्ण करतात.*

यासारखे देवावर अखंड श्रद्धा असलेले लोक केपे परिसरात आहेत. एखादा धार्मिक विधी, सण उत्सव ते आनंदाने साजरा करतात. आपल्या समजूतीमुळे, विधीमुळे काही अनिष्ट न घडता सर्वांचे चांगले होऊ हा त्यांचा हेतू असतो.

### २.४.४ केपे परिसरातील प्रयोगासिद्ध कला

केपे परिसरात लोकनाट्य, लोकसंगीत, लोकनृत्य, विधी नाट्य होतात. या कलेला इंग्रजीत 'परफॉर्मिंग आर्ट्स' तर मराठी त्याला 'प्रयोगसिद्ध लोककला' म्हणतात. एखादा प्रयोग करून प्रेक्षकांच्या हावभाव मनातील जाणून घेण्यासाठी ही कला महत्त्वाची आहे. केपे परिसरातील प्रदीर्घ काळापासून लोकसंस्कृती कला प्रवाहाबरोबर चालत आलेल्या अनेक दृष्टीने संपन्न आहे. संगीत, शिल्पकला, चित्रकला, नाट्य, हास्य कला, नृत्य इत्यादी दृकश्राव्य माध्यमातून त्यांची प्रचिती लोकसमूहाणे अभिव्यक्त केली आहे. मंदिरात भजन सादर करतात. " गीत नृत्य नाट्य यांचा त्रिवेणी संगम असलेली भक्तीची कळी भजनाच्या रूपाने सर्वत्र उमलत गेली" [19] फुगडी, धालो,

देखणी, कट्टी फुगडी यासारखे स्त्रियांचे लोकनृत्य केपे परिसरात पाहिला मिळतात. केपे परिसरातील प्रत्येक मंदिरात उत्सवाच्यावेळी, सप्ताहाच्या वेळी भजन, दिंडी असतेच. भजनाप्रमाणे कीर्तनही असते. प्रयोगसिद्ध लोककलेत केपे परिसरातील अनेक घटक येतात.

### २.४.५ केपे परिसरातील लोकवाद्ये

केपे परिसरात लोक आविष्करणातून ताळ, तबला, पेटी हे भजन, कीर्तन म्हणताना, तसेच पारंपारिक वाद्य बरोबर ढोल, घुमट, शेमेळ, तासा इत्यादी वाजवली जातात. ह्या वाद्यांचा ग्रामीण भागात स्त्रियांच्या फुगडी, धालोच्या मांडावर वापरली जात नसे, तर स्त्रियांच्या हाताची 'ताळी'च या वाद्यांचे कार्य करत. केपे परिसरातील शिगमोत्सवाचा मुख्य वाद्य म्हणजे 'ढोल'. या ढोलावर बडी मारून गावातील देवाला 'नमन' घालतात. गणेश चतुर्थीला किंवा मंदिरात आरत्या वेळी 'घुमट' आणि 'शेमेळ' असतेच. 'घुमटाला' " गोमंतकीय लोकवाद्याचा अग्रदूत" [20] असा फळ देसाई पांडुरंग यांनी आपल्या गोमंतकीय लोकवाद्ये या पुस्तकात म्हटले आहे. घुमट वाजवताना त्याला शेमेळची साथ असतेच.

### २.४.६ इतर संस्कृती

केपे परिसरात गणेशचतुर्थी, दीपावली, तुळशी विवाह, होळी इत्यादी. प्रत्येक धर्माचे लोक आपले सण आनंदात साजरा करतात. जसे हिंदू लोकांचे सण साजरा करतात तसेच ख्रिश्चन लोकांचे ख्रिसमस, गुड फ्रायडे आदि, मुस्लिम लोकांचा ईद, हुरस, आदि सण साजरा करतात. केपे परिसरात मंदिरे, चर्च आणि मस्जिद आहे. गोव्यातील केपे परिसरात मुसलमान लोकांचा हुरूस दोन ठिकाणी मोठ्या प्रमाणात साजरा करतात, एक 'काकोडा' आणि दुसरे 'अडणे' गावात. केपे परिसरातील काही गावात 'गडे' उत्सव साजरा करतात. उदाहरणार्थ: *श्री शांतादुर्गा बाळ्ळीकरीन देवीच्या गडे उत्सवात मुलगा वयात येण्याच्या आधी त्याला उपाशी ठेवून सजवतात, त्याच्या पाठीच्या कण्याला दोन्ही बाजूंच्या चामडीतून सुई टोचून धागा ओवतात. या विधीला 'गडा डोचणे' म्हणतात. म्हणजे तो गडी पूर्वीच्या काळी लढाईवर जाण्यास तयार झालेला 'सवाई' गडी शिपाई असे.*

केपे परिसरात प्रत्येक गावात साजरा होणाऱ्या शिग्मोत्सवाची पद्धती वेगवेगळी आहे. लोकनृत्य, लोकगीत, लोकवाद्याचा आणि लोकदैवत अश्या संकल्पना या शिग्मोत्सवात समावलेली आहे. प्रत्येक गावात एका सारखे

सण साजरे होत नाहीत, त्यात थोडेफार त्यांच्या विधीत, संस्कृतीत बदल असतो. प्रत्येक गावात 'मांड' असतो. ह्या मांडावर मूळ देव ( पुरीस) असतात. या मांडावर स्त्रिया धालो खेळतात. या मांडावर स्त्रिया धालो खेळताना त्यांच्या गावातील देवी-देवता, रंभा त्यांच्यावर येतात. 'मेळ' हा कलात्मक लोकनृत्य गावातील प्रत्येक घराच्या अंगणात खेळला जातो. अनेक गावात तालगडी, रोमट नावाचे लोकनृत्य सादर करतात. ह्या मेळात गावातील देवळातील तरंगे घरोघरी फिरतात. ह्या मेळात पुरुष मंडळी गोफ, मोरुलो, तोण्यामेळ, चौरंग इत्यादी अन्न प्रकार सादर करतात. केपे परिसरातील बाळ्ळी, सुलकर्ण, आमोणे, मलकर्णे या भागात हा प्रकार प्रसिद्ध आहे. ककोडा, कौटंबी, शेल्डे या गावात ह्या नृत्यांचा प्रयोग कमी प्रमाणात सादर होतो. ज्या दिवशी गावात मेळ येतो त्या दिवशी घरात दोणे (फणसाच्या पानाचा उपयोग करुन दोणे  तांदळाच्या किंवा गहूच्या पिठात पंचखाद्य घालून दोणा भरतात आणि ते शिजवतात), शेवग्यावर बनवलेल्या शेवया करतात. काही गावात होळीच्या आदल्या रात्री एक झाड (आंब्याच्या झाडाची फांदी, माडी यासारखे प्रत्येक गावात वेगवेगळे झाड) मारून त्याला होलिका मानून वाजत गाजत गावात आणतात. त्या झाडाच्या फांदीला वडे (गहूच्या पिठाची पुरी) बांधतात. आणि ते जाळतात त्या होळीला आग पेटल्यावर गावातील माणसे उडी मारून ते ते बांधलेली वडे काढून खातात. त्या आग लावलेल्या झाडापुढे एक दगड असतो, त्या दगडावर गावातील प्रत्येक घरातील एक माणूस नारळ फोडतो. केपे परिसरात येणाऱ्या 'मळकर्णे' गावात होळीच्या आदल्या दिवशी 'शेण्या उजो' हा प्रकार खेळला जातो. या होळीच्या माडीवर तरुण वर चढू लागतात आणि खाली असलेले भाविक त्यांच्यावर पेटलेली शेणी फेकून मारतात. 'शेण' म्हणजे शेणाची 'सुकी गोवरी'. ही पेटवलेली शेणी अंगावर फेकली की गावातील रोगराई टाळते असा समज असून त्या उत्सवात भाग घेणारे भाविक सात दिवस व्रतस्थ राहतात. या शेण्या उज्याला २ प्रकार आहे. एक गडी छत्री आणि होळी मारणे, ही अनोखी परंपरा पाहण्यासाठी शेकडोच्या संख्येने लोक मंदिराच्या प्रांगणात जमा होतात. असे प्रत्येक गावात सण साजरा करण्याची वेगवेगळी पद्धत दिसते. श्रावण महिन्यात गावातील प्रत्येक देवळात भजन, कीर्तन, सप्ताह चालू असतो.

कित्येक वर्षांपासून परंपरेने लाभलेली आणि केपे परिसरातील लोकांनी जपलेली पेरणीस जमातीचा जागर आहे. स्वतःचे चेहरे लपवून गणपती, शारदा (मोर), वाघ, पुतना, गवळण यासारखी सवंग घेऊन मुखवटे लावून हा नृत्य नाट्य सादर करतात. "केपे, सांगे, फोंडा, काणकोण आणि पेडणे तालुक्यातील अनुक्रमे मलकर्णे, कोळंब,

वाघुरमे, पैगिण आणि मोरजी यातील काही गावात अजूनही पेरणी जमातीचा जागर भोगावळीच्या स्वरूपात सादर केला जातात.”[21] वटपौर्णिमेला काही गावात स्त्रिया वडाच्या वृक्षाकडे जाऊन विधी करतात, फेरे मारतात. तर जास्त स्त्रिया घरातच वडाच्या झाडाची एक फांदी आणून त्याची पूजा करतात. केपे परिसरातील जाणकार, वयस्कर लोक कमी होत आहेत, परंतु त्यांनी त्यांची संस्कृती पुढच्या पिढीला सुपूर्त केलेली माणसे आज ह्या ‘लोकसंस्कृतीचा’ वारसा जपत आहे.

## २.५ समारोप

केपे परिसरातील दैवत लोककथांचा अभ्यास करत असताना केपे परिसरातील सामाज आणि संस्कृती समजून घेत असताना अनेक गोष्टी उलगडत गेल्या. केपे या स्थलनामा विषयी माहिती, भौगोलिक प्रदेशाशी संबंधित, लोक लोकजीवनाविषयी माहिती, केपे परिसरातील लोकव्यवसाय, एकंदरीत या परिसरातील जीवनशैलीचा उल्लेख या प्रकरणात आलेला आहे. या प्रकरणात जाती विषयी माहिती मिळवण्यासाठी गावातील व्यक्तींची मुलाखत घेतली, तसेच काही साहित्यिकांच्या पुस्तकातून माहिती मिळवलेली आहे. या सर्व गोष्टीचा अभ्यास उपरोक्त प्रकरणाद्वारे केलेला आहे.

## २.६ निष्कर्ष

1. ‘केपे’ परिसरातील लोकजीवनातून, येथील विधी, सण-उत्सव, परंपरा या सर्वातून या परिसरातील ‘लोक’ आपल्या संस्कृतीची जवळ असलेले दिसते.
2. लोकांनी आपल्याला सहज उपलब्ध होणाऱ्या नैसर्गिक साधन-सामग्रीचा वापर आपल्या सण-उत्सवात, विधीत केलेला आहे.
3. ‘केपे’ परिसरातील ‘मळकर्णे’या गावात साजरी करणारी शेण्या उज्याची होळी म्हणजेच ‘शेण्या उजो’ हा प्रकार आहे.
4. ‘केपे’ परिसरातील अनेक जाती-जमातीचे ‘लोक’ आपल्या पारंपारिक व्यवसाय परंपरेने पुढच्या पिढीला सुपूर्त करताना दिसतात.
5. ‘केपे’ परिसरातील अनेक महत्त्वपूर्ण दैवतांच्या देवस्थानात अजूनही पूर्वीच्या देवदासी प्रथिने बंधलेल्या स्त्रिया दैवताचे कार्य करताना दिसतात, नव्यांची भर आताच्या परंपरेत पडत नाही.

6. 'केपे' परिसरातील महाले समाजातील 'गावकरप' ही पद्धत परंपरेने आता दिसत नाही.

**संदर्भ**

[1] सातोस्कर, बाळकृष्ण. 'गोमंतक: प्रकृती आणि संस्कृती'. शारदीय प्रकाशन पणजी गोवा, प्रथम आवृत्ती: खंड १: १९७९, पृ.१८२

[2] देसाई, रत्नाकर राघोबा. *'गोवा स्थलनामाची जडणघडण'*. सरिता रत्नाकर देसाई फोंडा,२०१५, पृ.५७

[3] फळ देसाई, पांडुरंग. *'गोमंतकाच्या संस्कृतीच्या पाऊलखुणा'*. वैभव फोंडेकर-गरग मित्र समाज प्रकाशन, प्रथम आवृत्ती २०१३, पृ.१३

[4] मणगुतकर, आशा. *'चंद्रवाडी'*. २४ वे गोमंतक मराठी साहित्य संमेलन, २००१

[5] https://en.m.wikipedia.org/wiki/Quepem_taluka

[6] सातोस्कर, बाळकृष्ण. *'गोमंतक: प्रकृती आणि संस्कृती'*. शारदीय प्रकाशन पणजी गोवा, प्रथम आवृत्ती: खंड १: १९७९, पृ.२४४

[7] नायक, दामोदर काशिनाथ. *'गोमंतकाचे अतरंग'*. राजहंस वितरण, पणजी, १९९५, पृ.३६

[8] सातोस्कर, बाळकृष्ण. *'गोमंतक: प्रकृती आणि संस्कृती'*. शारदीय प्रकाशन पणजी गोवा, प्रथम आवृत्ती: खंड १: १९७९, पृ.१८२

[9] सातोस्कर, बाळकृष्ण. *'गोमंतक: प्रकृती आणि संस्कृती'*. शारदीय प्रकाशन पणजी गोवा, प्रथम आवृत्ती: खंड १: १९७९, पृ.२०७

[10] सातोस्कर, बाळकृष्ण. *'गोमंतक: प्रकृती आणि संस्कृती'*. शारदीय प्रकाशन पणजी गोवा, प्रथम आवृत्ती: खंड १: १९७९, पृ.१८९

[11] सातोस्कर, बाळकृष्ण. *'गोमंतक: प्रकृती आणि संस्कृती'*. शारदीय प्रकाशन पणजी गोवा, प्रथम आवृत्ती: खंड १: १९७९, पृ.१८९

[12] सातोस्कर, बाळकृष्ण. *'गोमंतक: प्रकृती आणि संस्कृती'*. शारदीय प्रकाशन पणजी गोवा, प्रथम आवृत्ती: खंड १: १९७९, पृ.२३८

[13] सातोस्कर, बाळकृष्ण. '*गोमंतक: प्रकृती आणि संस्कृती*'. शारदीय प्रकाशन पणजी गोवा, प्रथम आवृत्ती: खंड १: १९७९, पृ.२३३

[14] सातोस्कर, बाळकृष्ण. '*गोमंतक: प्रकृती आणि संस्कृती*'. शारदीय प्रकाशन पणजी गोवा, प्रथम आवृत्ती: खंड १: १९७९, पृ.२४१

[15] पर्वतकर, अरुण. 'गोमंतक परिसर परिचय'. गोमंतक मराठी अकादमी गोवा, १९९६ पृ.१०५

[16] सातोस्कर, बाळकृष्ण. '*गोमंतक: प्रकृती आणि संस्कृती*'. शारदीय प्रकाशन पणजी गोवा, प्रथम आवृत्ती: खंड १: १९७९, पृ.२१५

[17] सातोस्कर, बाळकृष्ण. '*गोमंतक: प्रकृती आणि संस्कृती*'. शारदीय प्रकाशन पणजी गोवा, प्रथम आवृत्ती: खंड १: १९७९, पृ. २१५

[18] सातोस्कर ,बाळकृष्ण. '*गोमंतक: प्रकृती आणि संस्कृती*'. शारदीय प्रकाशन पणजी गोवा, प्रथम आवृत्ती: खंड १: १९७९, पृ.११

[19] फळ देसाई, पांडुरंग. '*गोमंतक संस्कृतीच्या पाऊलखुणा* ' .वैभव फोंडेकर-गरग मित्र समाज प्रकाशन, प्रथम आवृत्ती २०१३ पृ.१२३.

[20] फळ देसाई, पांडुरंग. '*गोमंतकीय लोकवाद्ये* '. मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथम आवृत्ती १९९२, पृ.१२

[21] फळ देसाई, पांडुरंग. '*गोमंतकाच्या संस्कृतीच्या पाऊलखुणा*'. वैभव फोंडेकर-गरग मित्र समाज प्रकाशन, प्रथम आवृत्ती २०१३, पृ. ८३

# प्रकरण ३

# केपे परिसरातील दैवते आणि लोकदैवते

**प्रस्ताविक ....................................................................................48**

**३.१ दैवत: संकल्पना ....................................................................................48**

३.१.१ अभिजन दैवते ....................................................................................49

३.१.२ उन्नयनित दैवत ....................................................................................50

**३.२ लोकदैवते म्हणजे काय? ....................................................................................50**

३.२.१ लोकदैवते: संकल्पना ....................................................................................51

३.२.२ लोकदैवतांचे स्वरूप ....................................................................................51

**३.३ केपे परिसरातील महत्त्वपूर्ण दैवते ....................................................................................52**

३.३.१ श्री चंद्रेश्वर भूतनाथ ....................................................................................53

वार्षिक उत्सव: ....................................................................................53

चैत्र महिना: ....................................................................................53

वैशाख: ....................................................................................54

श्रावण महिना ....................................................................................54

भाद्रपद महिना ....................................................................................54

अश्विन महिना ....................................................................................54

कार्तिक मास ....................................................................................55

मार्गशीर्ष महिन्यात ....................................................................................55

पौष महिन्यात ....................................................................................55

माघ महिन्यात....................................................................................55

फाल्गुन महिन्यात....................................................................................55

३.३.२ श्री सातेरी शांतदुर्गा (शेल्डे) ....................................................................................55

३.३.३ सिद्धदेव....................................................................................56

३.३.४ श्री शांतादुर्गा बाळ्ळीकरीण....................................................................................56

**३.४ केपे परिसरातील महत्त्वपूर्ण लोकदैवते ....................................................................................57**

३.४.१ श्री वाघ्रेश्वर महादेव....................................................................................58

३.४.२ श्री धानुचरण....................................................................................58

३.४.३ खान्सीदेवी ....................................................................................59

३.४.४ सतीदेवी ....................................................................................59

३.४.५ राखणदार....................................................................................59

३.४.६ श्री वेताळ देवस्थान काकोडा ....................................................................................61

३.४.७ जातीनिर्देशक म्हरांगण....................................................................................62

**३.५ समारोप ....................................................................................62**

**३.६ निष्कर्ष....................................................................................62**

**संदर्भसूची ....................................................................................63**

# प्रकरण ३

# केपे परिसरातील दैवते आणि लोकदैवते

**प्रस्ताविक**

गोमंतकातील केपे परिसरात विविध संस्कृतीने समृद्ध असलेले अनेक दैवताची मंदिरे आहेत. तसेच केपे परिसरात जास्त संख्या लोकदैवतांची पाहायला मिळते. केपे परिसरातील दैवते आणि लोकदैवता विषयी अनेक लोककथा प्रचलित आहेत. लोकजीवनामध्ये जी दिव्य शक्ती अदृश्य स्वरूपात सर्वत्र संचार करते आणि माणसांची श्रद्धा, भक्ती उत्कट झाल्यावर त्यांना दृश्यरूपाने दर्शन देते अशी 'दैवत' संकल्पना आहे. केपे परिसरातील लोकजीवनात प्रचलित असलेले अनेक दैवत पाहायला मिळतात. 'दैवत' या संकल्पनेपेक्षा 'लोकदैवत' ही संकल्पना थोडी वेगळी आहे. या तिसऱ्या प्रकरणातून दैवत संकल्पना, लोकदैवत म्हणजे काय? हे जाणून केपे परिसरातील महत्त्वपूर्ण दैवते आणि लोकदैवत यांचा अभ्यास होणे इथे अभिप्रेत आहे.

**३.१ दैवत: संकल्पना**

मानवी जीवनाच्या केंद्रस्थानी असलेला महत्त्वाचा घटक म्हणजे 'देव'. मानवी जीवनात श्रद्धेच्या ठिकाणी असलेली 'दैवत' ही सर्वात मोठी संकल्पना होय. एक वैशिष्ट्य स्वरूपाची मानवाच्या श्रद्धास्थळी असलेली शक्ती म्हणजे 'दैवत'. मानव जेव्हा जन्माला आला, तेव्हा आई-वडील घरातील माणसांच्या संस्कारामुळे त्याला या शक्तीची ओळख झाली. मानवाला जगण्याची प्रेरणा ही श्रद्धाच देते, त्यामुळे या संस्काराच्या मुळाशी मुख्य श्रद्धाच असते. "'देव' ही संकल्पना मुळात अदृश्य, अमूर्त रूपाने सर्वत्र संचार करत असते. एखादा भक्तांच्या भक्तीची नैसर्गिक रूपाने परीक्षा घेतली जाते. यातून देवावर असलेली उत्कट भक्तीने प्रसन्न होऊन देवदर्शनही देतो. ह्या दर्शनाला साक्षात्कार होणे असे म्हणतात."[1] लोकसमूहाच्या मनात खोलवर रुजलेली ही 'दैवत' संकल्पना आहे.

महादेवशास्त्री जोशी यांनी देव या संकल्पनेबद्दल भारतीय संस्कृती कोशात असे म्हटले आहे की "जिच्या ठिकाणी दिव्य तेज, अथवा सामर्थ्य असते ती देवता होय. जी दिव्य अशी शक्ती अदृश्य रूपाने सर्वात संचार करते.

भक्तांची श्रद्धा, शक्ती उत्कट झाल्यास जी दृश्यरूपानेही अभिव्यक्त होते, जी पूजा व बली यांचे ग्रहण करून, भक्तांच्या, उपासकांच्या मनोकामना पूर्ण करते, जी भक्तांच्या मार्गातील अडखळे दूर करून त्याचे जीवन निर्भय व निर्बंध करते, जी भक्तांच्या जवळ सदैव अदृश्य रूपाने उभी राहून त्याला सांभाळीत असते, जी पूजा बलिदान इत्यादी न केल्यास क्रूध्द होते व केल्याने प्रसन्न होते आणि जी सृष्टीतील पंचमहाभूते अनुकूल बनवते ती देवता होय".[2] 'दैवत' ही मानवी विचारांच्या व शक्तींच्या पलीकडे असलेली असाधारण शक्तीत समाविष्ट असलेली 'शक्ती' होय.

"देवाने माणसाला निर्माण केले, 'हे श्रद्धात्मक पातळीवरचे दैवत्यवादी धारणेतील विधान जसे सत्य आहे. तसेच युक्तीवाद अथवा शास्त्रीयतेनुसार देवाची निर्मिती माणसाने केली आहे; अथवा कर्तव्यदक्ष पराक्रमी असामान्य मानवी जन्मच दैवत्वापर्यंत पोहचले आहेत."[3] जसा मानवी मनाचा विकास होत गेला, त्याप्रमाणे मानवी मनाचे विचार बदलत गेले. मानवाकडून एखादी चूक झाली तर कुणीतरी आहे जो आपल्यावर लक्ष ठेवतो, जगात मोठी शक्ती आहे. हे माणसाला समजले. या शक्तीमुळेच आपले जीवन यशस्वी होते, हे जेव्हा माणसाला समजले तेव्हा त्यांची श्रद्धा, मनातील भावना, ईश्वराविषयी आदर वाढला. तसाच भय ही निर्माण झाला. आपण एखादी चूक केली तर आपल्याला शिक्षा करणारा कोणीतरी आहे, ह्या विचाराने मानव चांगल्या दिशेने वळला. या 'दैवत' संकल्पनेमुळे माणसाला कळले की जगातचा विश्वचक्र फिरवणारा हा श्रेष्ठ देवता काहीही बदल करू शकतो. या दैवतांचे फलप्राप्त करण्यास, रोग निवारण, आपले अस्तित्व जर टिकवायचे असेल तर ही 'दैवते' महत्त्वाचे आहे. या दैवतांचे काही प्रकार आहेत.

### ३.१.१ अभिजन दैवते

अभिजन दैवते "ही दैवते पूर्णपणे उच्चभ्रू वर्गाशी संबंधित आहेत आणि ज्यांची आराधना पद्धती ही पुरणोक्त स्वरूपाची आहे."[4] अशा दैवतांचा उल्लेख सदर संशोधनात अभिजन दैवते असा केलेला आहे. ज्या दैवतांचा उल्लेख पौराणिक कथेत केला जातो, त्यांना अभिजन दैवत म्हणतात. उदाहरणार्थ: महादेव, दत्तात्रेय, विष्णू, ब्रह्मदेव, लक्ष्मी, संतोषीमाता इत्यादी. आधुनिक काळात केपे परिसरात उन्नयनित दैवताना अभिजन दैवतांनच्या चौकटीत मिसळताना दिसतात. उदाहरणार्थ: *श्री चंद्रेश्वर भूतनाथ, श्री सातेरी शांतादुर्गा यासारखी लोकदैवते आताच्या काळात अभिजन दैवतांच्या वर्गात येताना दिसतात.*

### ३.१.२ उन्नयनित दैवत

केपे परिसरातील काही दैवते ही उन्नयनित या प्रकारातील आहे. उन्नयनित प्रकारची दैवते ही मुलत: लोकदैवतेच होती. ही दैवते म्हणजे लोकदैवते आणि अभिजन दैवते यांच्या मधली स्थिती आहेत, ही दैवते लोकदैवतांच्या स्थितीतून उन्नयनित होऊन अभिजन दैवताच्या वर्गात समावून घेणारी आहे. गावात या दैवतांची पूजा, आराधना, सण उत्सव, मान हे सर्व ब्राह्मण आणि गावकर ह्या लोकांना देवाच्या गाभाऱ्यापर्यंत पूजेसाठी जाण्याचा मान असतो. उदाहरणार्थ: केपे परिसरातील श्री शांतादुर्गा बाळीकरीण, श्री धानुचरण, सातेरी ( काकोडा) इ. उन्नयनित दैवतात येतात.

### ३.२ लोकदैवते म्हणजे काय?

'दैवत' या संकल्पनेतील 'लोकदैवते' हा एक प्रकार आहे. "जगातील प्रस्थापित अशा प्रमुख धर्माशी साक्षात संबंध नसलेली, पण वैशिष्ट्य लोकसमूहाने श्रद्धेने आपली मानलेली दैवते म्हणजे 'लोकदैवते'."[5] वेगवेगळया धर्मातील लोकसमूहाची वेगवेगळी दैवते असतात, या लोकसमूहाची वेगवेगळया कारणामुळे विविध लोकदैवत निर्माण झालेली असतात. प्रारंभकाळात जगात काही सांस्कृतिक अवशेषांच्या खुणा सापडतात. उदाहरणार्थ: *त्रिशूल, शिळा, पाषाणी दगड, इत्यादी.* यांची पूजा लोकसमूहात केली जाते, या लोकदेवतामध्ये आढळून येतात. या लोकदैवतांची पूजा, उपासना लोकसमूहात केली जाते. असे अनेक लोकदैवते केपे परिसरात आहे. उदाहरणार्थ: *वाघरेश्वर (सोलया), सतीदेवी (आंबावली), सिद्धदेव (सिद्धामाटी काकोडा), कुनेश्वर इत्यादी*

माणसाच्या निसर्गाशी होणाऱ्या संवाद संघर्षातून, या भूमीतून उदयास आलेली, लोकसंस्कृतीतील, लोकदैवतांची निर्मिती झालेली पाहायला मिळते. या लोकदैवतांना समाजात वैशिष्ट्य स्थान आहे. " एखादा पाषाणी मूर्ती तयार करणे हे झाले भौतिक परिवर्तन, तर त्या मूर्तीला पाहून आपल्या मनात देवाची कल्पना निर्माण होणे अन त्यातून त्याला भक्ती भावाने हात जोडणे हे झाले मानसिक परिवर्तन."[6] भौतिक आणि लोकांच्या भावनिक गरजेनुसार लोकदैवते आकाराला येतात. लोकसमूह आपला मूळ धर्म सांभाळून त्याच्या श्रद्धेने मनात आकारलेल्या लोकदैवतांचे व लोकधर्माचे पालन करतात. अनेक गावात झाडाला नुसतेच बावटे उभारलेले असते, त्यांच्याकडेला एखादा घुमटी असते. तो त्या गावाचा राखण करणारा राखणदार असतो. गावातील लोकांचा या राखणदारावर खूप विश्वास असतो. हा राखणदार आपल्या सीमेतील लोकांचे रक्षण करतो, त्याला मान देणे, त्याची पूजा केली जाते.

तसेच गावात एखादा वीर स्त्री-पुरुष या देवता म्हणजे पूर्वजांचे आत्मे होते अशी लोकधारा आहे. उदाहरणार्थ: *केपे परिसरातील सतीदेवी (अंबावली).* तसेच काही वीर प्राण्यांची ही पूजा करतात. उदाहरणार्थ: केपे *परिसरातील असलेले सूण्याखेडे (काकोडा), वाटूबोंघाडी ( शेल्डे).* केपे परिसरात लोकदैवतांची संख्या बरीच मोठी असून प्रस्तुत संशोधनातून या विषयाची महत्त्वपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण माहिती मिळणार आहे.

### ३.२.१ लोकदैवते: संकल्पना

1. "आदिमांची निसर्गपुजारूप प्रतीके म्हणजेच लोकदैवतांची रूपे" असे डॉ. शरद व्यवहारे म्हणतात.[7]
2. " कोणतंही दैवत हे त्याला माणसाच्या श्रद्धेचच मूर्तरूप असतं" असे डॉ. रा. चिं. ढेरे म्हणतात.[8]
3. "लोकदैवते म्हणजे लोकमनाची निर्मिती आहे" असे डॉ. अरुणा ढेरे यांनी म्हटले आहे.[9]
4. "लोकपरंपरेतील प्रारंभची दैव कल्पना अत्यंतिक प्रेम आणि अत्यंतिक भीती या भावनेतून उगम पावलेली दिसते" असे डॉ. गंगाधर मोरजे म्हणतात. [10]

लोकदैवता संबंधी समाजात एक वेगळी भावना असते. भारतीय विश्वकोशात लोकदैवताबद्दल विश्लेषण अधिक सूक्ष्मपणे मांडले आहे. "बहुदेवतावादी धर्माच्या अनुयायबद्दल म्हणावयाचे, तर दैवताकरण्याच्या मानसिक प्रक्रियेला अनुकूल अशी त्यांची मनोभूमी पिढ्यानपिढ्या स्वीकारलेल्या बहुदेवतावादी धर्माचारामुळे तयार झालेली असते त्यामुळे बहुदेवतावादी लोकसमूहामध्ये नवनवीन दैवत निर्माण होऊ शकतात."[11] मानवी पातळीवर दैवत स्वीकारण्याची भूमिका मानसिक प्रक्रिया असते. त्यामुळे आजच्या काळात विविध प्रकारची देव-दैवते पाहायला मिळतात.

### ३.२.२ लोकदैवतांचे स्वरूप

लोकदैवताविषयी लोकमानसात असलेली विधी, श्रद्धा, रुढी, परंपरा, लोकाचार गेल्या अनेक काळापासून संस्कृती संक्रमणातून 'दैवत' यासंबंधीत संकल्पना निर्माण झालेली दिसतात. या लोकदैवतांचे स्वरूप निसर्गदेवता, संरक्षक देवता, मानवी देवता, क्षेत्र देवता, प्राणी देवता, इत्यादी स्वरूपात असतात.

निसर्गात निरनिराळ्या प्रकारचे जीव आहेत, पशु, पक्षी, माणूस, फुल-वेली, नद्या, समुद्र, तारे, पाऊस, भूमी, पाषाण अशा विविध घटकांनी निसर्ग संपन्न आहे. निसर्ग हा अतिशय व्यापक स्वरूपाचा आहे. या निसर्गातील

सृष्टीचक्रामुळे मानवी मनात निसर्गाविषयी भीती तसेच अपार श्रद्धा आहे, यातून अनेक लोकदैवतांची निर्मिती लोकमानसाने केलेली आहे.

या निसर्गातील एक घटक म्हणजे 'वृक्ष'. प्राचीन काळापासून मानवाचा वृक्षांशी असलेला संबंध अतिशय आदर निर्माण झालेला दिसतो. वृक्षाला आकार आणि आयुष्य माणसाच्या तुलनेत अधिक असते. अनेक दैवतांचा स्थान या वृक्षा खाली असतो. वृक्षाला आपण देव मानतो. त्याची पूजा करतात. उदाहरणार्थ: *वटपौर्णिमा.* अनेक धार्मिक कार्यात वृक्षाचे प्रतीक मानून फुल, पान, फळे, फांदीची पूजा केली जाते. लोकसमाजाचा मानसिकेतून वृक्षाशी जसा दैवतांचा संबंध जोडला तसाच भूत- पिशाच यांचाही संबंध जोडलेला दिसतो.

माणूस जेव्हा समूहाने वस्तीत राहू लागला तेव्हा त्यांच्या मधल्या सामूहिक भावना निर्माण झाल्या, या भावनातून गावावर येणाऱ्या एखादा रोगापासून एक अलौकिक शक्ती आपले रक्षण करू शकते किंवा आपली इच्छा, आकांक्षा पूर्ण करणार, या शक्तीची लोकांना जाण झाली. या जाणिवेतून ग्रामदेवता हा गावाचा संरक्षण देवता होय. या ग्रामदेवतांना अनेक नावे, रूपे आहे. या गावातील ग्रामदेवामागे काहीतरी दंतकथा इतिहास असतो. जलदेवता, अग्नीदेवता, प्राणीदेवता इ. यांचा संबंधही लोकदैवतात येतो. केपे परिसरातील काही प्राण्यांना 'लोकदैवत' म्हणून प्राप्त झाले आहे. उदाहरणार्थ: *सूण्याखेडे, वाटूबोंघाडी, गौमाता.* यासारखी लहान घुमटी बांधलेली गावात आहे. देवाप्रमाणे गावातील लोक त्यांची ही पूजा करतात.

### **३.३ केपे परिसरातील महत्त्वपूर्ण दैवते**

केपे परिसरातील दैवतांचे विधी, सण-उत्सव करण्यासाठी या परिसरातील अनेक जातीचे 'लोक' एकत्रित येतात, या दैवतांशी असलेल्या श्रद्धेमुळे लोकसमूहात एकतेचा एक बळकट धागा निर्माण होतो. या परिसरातील महत्त्वपूर्ण दैवतामुळे समाज आपल्या संस्कृतीशी जोडून राहतो. केपे परिसरातील चंद्रेश्वर भूतनाथ, वज्रेश्वर, सिद्ध, दत्तात्रेय, सातेरी शांतादुर्गा आदी. या दैवतांचे विधी, पूजा, कर्मकांड आदीचा अभिजनलक्षी पद्धतीचा भाग बनलेले आहेत, असे असून केपे परिसरातील एकंदरीत 'संस्कृती' आणि 'लोकसंस्कृतीच्या' अंगाने सदर दैवतांचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

### ३.३.१ श्री चंद्रेश्वर भूतनाथ

केपे परिसरातील श्री 'चंद्रेश्वर' अथवा श्री 'चंद्रनाथ' हे गोमंतकाच्या आद्य दैवतापैकी एक फार प्राचीन देवस्थान आहे. या मंदिराचा इतिहास फार मोठा आहे. राजा देवराय गोमीन हा 'चंद्रेश्वराचा' म्हणजे 'महादेवाचा' उपासक होता. या गोमीन राजाने चौथ्या शतकात गोमंतकात आपले स्वतंत्र राज्य स्थापित केले. देवराजानंतर चंद्रवर्मा राजांनी चंद्रनाथ पर्वतावर श्री चंद्रेश्वराचे देऊळ बांधले. "चंद्रेश्वर देव व चंद्रनाथ पर्वत ही नावे स्वतंत्र भोजांच्या दुसऱ्या तक्ताधीश राजा चंद्रवर्मा यांनी दिलेली असले, तरी चंद्रवाडी हे नाव चंद्रपूर राजधानीचे संस्थापक देवराज गोमिन यांच्याकडून या प्रदेशाला प्राप्त झाले."[12] या विषयाची माहिती आशा मणगुतकरांनी संपादित केलेल्या 'चंद्रवाडी' या स्मरणिकेतून मिळाली.

श्री चंद्रनाथ पर्वताच्या परिसरात १०८ तीर्थ आहे, असे गावातील जाणकारांचे म्हणणे होते. या तीर्थांची उत्पत्तीकथा आणि महात्मा श्री स्कंदपुराणात वर्णन करून सांगितलेली आढळते. यापैकी काही तीर्थांची नावे कपिलतीर्थ, कमंडलुतीर्थ, गणेशतीर्थ, मुरलीधरतीर्थ, शुक्लतीर्थ, सिद्धधारातीर्थ, चंद्रोदयतीर्थ, सूर्योदयतीर्थ अशी आहे. दररोज चंद्रेश्वर भूतनाथाला पूजा, आरत्या व नैवेद्य दाखवतात. दर सोमवारी रात्री पूर्वनियोजित पणे पुराण वाचन व किर्तन करतात. देवस्थानात भाविकांकडून देवाला अभिषेक, फुलांचे ताट, तेलभिषेक, ज्योत करण्यात येते.

'चंद्रवाडी' महालाचे मुख्य गाव केपे तालुक्यातील 'आमोणे' होता. "१. पारोडा,२. कुस्मण, ३. अवेड, ४. शेळवण, ५. आमोणे, ६. केपे, ७. मळकर्णे, ८. असोळडे, ९. शिरवई, १०. होडर, ११. कुडचडे, १२. शेळडे, १३. तळवडे, १४. चीक- शेळवण, १५. मुळे, १६. झानोडे, १७. नागवे, १८. कोठंबी, १९. चाळफी, २०. आबावली, २१. भिणणे, २२. उंदर्न."[13] चंद्रेश्वर भूतनाथ हा दैवत बावीस गावाचा अधिपती आहे.

**वार्षिक उत्सव:**

**चैत्र महिना:**

- चैत्र शुद्ध प्रतिपदेच्या दिवशी पंचांग (फल) श्रवण
- श्री चंद्रेश्वराच्या मंदिरात रामनवमी उत्सव

- चैत्र पौर्णिमेचा वार्षिक जात्रोत्सव. या उत्सवाची सुरुवात चैत्र शुद्ध एकादशीला होऊन समाप्ती चैत्र वद्य प्रतिपदेला सकाळी करण्यात येते.

**वैशाख:**

- कोणत्याही एका सोमवारी पारोडेकर (बाजार-करांची) वसंत पूजा करतात.

**श्रावण महिना**

- पहिला सोमवार- नाडकर्णी महाजनाकडून
- दुसऱ्या सोमवार- पारोडेकराकडून
- तिसरा सोमवार- देवस्थानाकडून
- चौथा सोमवार- केपे बाजारकार मंडळीकडून
- पाचवा सोमवार आल्यास, केपे येथील सरकारी कचेरीतील कर्मचाऱ्याकडून साजरा केला जातो.

**भाद्रपद महिना**

- अनंत चतुर्थदाशी

  हा उत्सव चंद्रनाथ पर्वतावरील ‘तळयाकडे’ नावाच्या परिसरातील भट्टजींच्या घरात करण्यात येतो. त्यादिवशी पूजा, पुराण, कीर्तन, नैवेद्य, आरत्या व समराधन असते.

**अश्विन महिना**

- नवरात्रोत्सव

  अश्विनशुद्ध प्रतिपदेस श्री चंद्रेश्वराच्या मंदिरात घटस्थापना. त्या दिवसापासून नऊ दिवसापर्यंत कुमार जुवे येथील केरकर यांच्याकडून मकरोत्सव. या उत्सवात दररोज पुराण, कीर्तन, आरत्या, दीपाआराधना आणि ९ व्या रात्री श्री चंद्रेश्वर व श्री भूतनाथ यांना रंग पूजा. त्याच रात्री थळातून मिरवणूक, दोन श्रृंगारलेली तरंगी आणून ती घटाजवळ श्री चंद्रेश्वराच्या मंदिरात ठेवतात.

- दसरा

- हरीजागर आणि काकड-आरती

**कार्तिक मास**

- तुलसी विवाह, पौर्णिमात्सव

**मार्गशीर्ष महिन्यात**

- दत्त जयंती

**पौष महिन्यात**

- भुतांची जत्रा

  पोष वद्य अमावस्याच्या दिवशी रात्री चंद्रनाथ पर्वतावर पायथ्यापासून मुख्य मंदिरापर्यंत ठेवलेल्या ठिकाणी त्या त्या दैवतास सुमारे ४०-५० कोंबड्यांचा बळी देण्यात येतो. आणि रात्री चंद्रनाथ पर्वतावरील व पायथ्याशी सर्व देवालय संपूर्ण उघडी ठेवतात. या रात्री सर्व २२ गावातील देव आपल्या इतर दैवतासह श्री चंद्रेश्वर भूतनाथाच्या दर्शनासाठी चंद्रनाथ पर्वतावर येतात. आणि त्या रात्री भूतांची जत्रा आवडते असे मानले जाते.

**माघ महिन्यात :** शिवरात्र

**फाल्गुन महिन्यात:** शिग्मो

या वार्षिक उत्सवाची माहिती श्री क्षेत्र श्री चंद्रेश्वर भूतनाथ देवस्थान, पर्वत- चंद्रवाडी या पुस्तकात मिळाली. [14]

**३.३.२ श्री सातेरी शांतदुर्गा (शेल्डे)**

केपे परिसरातील प्रसिद्ध दैवतांमध्ये शेल्डे गावातील श्री सातेरी शांतादुर्गा देवी या देवस्थानाचा उल्लेख होतो. या गावात गावस देसाई लोकांची वस्ती जास्त आहे. श्री सातेरी शांतादुर्गा या देवस्थानाचे महाजनपद गावस देसाई कुटुंबातील लोकांकडे आहे. सातेरी शांतादुर्गा देवीच्या मंदिरात सातेरी आणि शांतादुर्गा या दोन्ही देवीच्या मूर्ती एकत्र आहेत, तसेच देवळाच्या बाहेर एक पिंपंळाचे वृक्ष आहे त्या वृक्षाखाली ब्रह्मबेताळ असतो. या देवीचा मोठा उत्सव म्हणजे बारा वर्षातून एकदा या देवीची जत्रा असते. या देवीच्या 'महाजात्रोत्सवास' प्रथमत देवताचा

शद्ध अश्विन शद्ध नवमी शके १९१३ गुरुवार दि.१७ ऑक्टोंबर, इ. स १९९१ या दिवशी श्री सातेरी शांतादुर्गा देवस्थान शेळडे येथे सर्व महाजनाने नवमीच्या उत्सव निर्मित चौकावर सर्व देवतांना गाऱ्हाणे घालून 'महाजात्रोत्सव' करण्यास कौल घेतला. या जत्रेत देवाला (सावत) चार पायाचा डुक्कर मान म्हणून देतात.

बारा दिवस गावातील काही लोक शिकारीला जाऊन हा डुक्कर आणतात. पहिल्या दिवशी जर डुक्कर मिळाला नाही तर तिथे एक गोळी झाडून (फार मारून) परततात. दुसऱ्या दिवशीही डुक्कर मिळाला नाही तर परत एक गोळी झाडून परततात, असे डुक्कर मिळेपर्यंत बारा दिवस भोवंडी करतात. डुक्कर जर बारा दिवसाआधी मिळाला तर राहिलेल्या दिवसाचे फार मारून गावात डुक्कर घेऊन येतात. गावात वाजत गाजत देवळाच्या पाच प्रदक्षिणा काढून डुक्कर देवळात आणतात. देवळाचा पुजारी डुक्कराची पूजा करतो. डुक्कराला शस्त्र लावण्याचा हक्क गावातील जल्मीला असतो. त्या डुक्कराचे मटण करतात. देवीला वाडी जल्मी दाखवतो. बारा दिवसाचा उत्सव झाल्यावर तेराव्या दिवशी पूर्ण गावात सुतक पाळला जातो.

### ३.३.३ सिद्धदेव

'काकोडा' या गावात 'माटीर' या सिद्ध देवाचे ठिकाण आहे. सिद्धदेव हा काकोडा भागातील उंच डोंगरावर राहतो. या डोंगराला माटीर (सिद्धमाटीर) असे म्हणतात. उंच डोंगरावर राहून सिद्धदेव गावावर लक्ष ठेवत असतो, असे गावातील लोक म्हणतात. सिद्ध देवाच्या मंदिरा बाहेर डाव्या बाजूला एक वाघाची घुमटी आहे. या घुमटी बाजूला एक पेड (वृक्ष) आहे. त्याच्याखाली चार-पाच त्रिशूल आहे. या देवाची पूजा गावातील गावकर, घाडी लोक करतात. या मंदिराचे महाजनपद काकोडा गावातील सावंत, देसाई या कुटुंबाकडे आहे. गावातील लोक वर्षातून एकदा देवाला नारळ फोडतात, काही लोक कोंबडा बाहेर असलेल्या वाघासाठी आणि वाईट शक्तीसाठी (खेत्री) मारला जातो. शिवरात्रीच्या दोन-तीन दिवसा अगोदर या देवाचा उत्सव असतो.

### ३.३.४ श्री शांतादुर्गा बाळ्ळीकरीण

केपे परिसरातील प्रसिद्ध देवस्थानापैकी श्री शांतादुर्गा बाळ्ळीकरीण देवस्थान हे एक आहे. आपण सध्या बाळ्ळी म्हणतो, तो गाव बाळ्ळी मठ, बाळ्ळी संस्थान किंवा बाळ्ळी महाल म्हणून ओळखला जातो. श्री शांतादुर्गा बाळ्ळीकरीण देवस्थानाचा इतिहास फार मोठा आहे. हे महादेवाचे रम्य स्थान आहे. बाळ्ळी महाल असे फार पूर्वीपासून ज्याला म्हटले जाते, ते महाल वास्तविक नार्वेहुन आलेल्या सप्तकोटेश्वराचे भक्त असलेल्या आठ

मालगड्यांनी वसविला. पूर्वी त्या गावात हब्बू ब्राह्मण राहायचे, कालांतराने पोर्तुगीज राजवटीत बाटाबाटीच्या वेळी त्या आपल्या सगळी सामान विहिरीत टाकून गाव सोडून गेले. या देवस्थानाच्या परिसरात विहीर आहे. श्री शांतादुर्गा देवस्थानाचे मूळ रायबागकार म्हणणारे वेळीप, कुपकार आणि खोरलकार असे तीन वांगड होते, त्यानंतर नार्वेहुन आलेले व्हडले वाडेकर, चाणीकार, अडणेकार आणि चार वांगड मिसळले. श्री शांतादुर्गा देवीचा उत्सव फाल्गुन वद्य षष्ठीपासून सुरू होतो. त्यात दिवजोत्सव, गडेउत्सव हे फार मोठे उत्सव. " गडे उत्सवाच्या वेळी एक उंच लाट तयार करतात या लाटेच्या मोठ्या लाकडाला सजविलेला गडा उताणा बोलतात व फिरवतात. मुलगा वयात येण्याच्या आधी उपाशी ठेवून सजवतात. त्याच्या पाठीच्या कण्याला दोन्ही बाजूच्या चामडीतून सुई टोचून धागा ओवतात. त्यास गडा डोचणे म्हणतात. म्हणजे तो गडा त्या काळी लढाईवर जाण्यास तयार झालेला (सवाई) गडी शिपाई असे."[15] हा गडा देवी सासरकांन्नला असतो आणि पहिला गडा शांतादुर्गा देवीला. फाल्गुन महिन्याच्या पंचमीला देवी माहेरी जाते म्हणजे वेळीपाच्या मठात, तिथे पाच दिवस नैवेद्य करतात आणि दशमीला परत येते. तसेच वसंतपूजा, श्रावण सोमवार, नवरात्र या मंदिरात साजरा केला जातो. या दैवताप्रमाणे कुडतरी महामाया, श्री दत्तात्रेय, सोमेश्वर, फातर्पोची शांतादुर्गा यासारखी अनेक महत्त्वपूर्ण दैवते केपे परिसरात आहे.

### ३.४ केपे परिसरातील महत्त्वपूर्ण लोकदैवते

केपे परिसरातील परंपरागत लोकजीवन जगणाऱ्या लोकसमाजाची ही लोकदैवते आहे. केपे परिसरात बहुतांश संख्या लोकदैवतांची आहे. केपे परिसरातील या वर्गीकरणातील दैवते निसर्गाशी आणि लोकसमाजाशी संबंधित आहेत. गुरव, घाडी, मडवळ, कुळमी ( गावकर आणि वेळीप), महार आणि इतर समाजातील लोक ह्या दैवतांची पूजा, कार्य करण्यास असतात. ही लोकदैवते ज्या लोकसमूहात आकाराला येतात, तिथे ती कालांतराने त्याच समूहापूर्ती प्रस्थापित आणि प्रतिष्ठित होतात. जे लोकदैवत समाजात पूजले जातात त्या दैवताबद्दल वाटणारी श्रद्धा, भक्तीची भावना वाढतच राहते, त्यांच्याविषयी वाटणारी श्रद्धा आणि आदर सहसा नष्ट होत नाही.

सदर दैवतविषयक लोककथांच्या वर्गीकरणातून केपे परिसरातील वाघ्रेश्वर (सोलया), धानुचरण (पाऊलवाडी), सूण्याखेडे (काकोडा), खान्सीदेवी (काकोडा), सतीदेवी (आबावली), कूनेश्वर, लिंगदेव, श्री ब्रह्मा आदी लोकदैवते केपे परिसरात आहे. ह्या लोकदैवताबद्दल जाणून घेणे आवश्यक आहे.

### ३.४.१ श्री वाघ्रेश्वर महादेव

केपे परिसरातील ‘सोलया’ या गावात ‘वाघ्रेश्वर’ हे दैवत आहे. ‘सोलया’ या गावाच्या आत एक मोकळया जागेवर हे मंदिर आहे. मंदिराच्या बाजूला केवळ दोन घरे आहे. मंदिराकडे जाताना रस्त्याच्या दोन्ही बाजूला काजू, माड आणि शेती आहेत, अशा निसर्गिक परिसरात श्री वाघ्रेश्वराचे मंदिर आहे. या दैवतांची पूजा रोज केली जाते. मंदिरात वाघाची मूर्ती आहे आणि त्याच्या बाजूला एक शिवलिंग आहे. वाघाची म्हणजे वाघ्रेश्वराची पूजा गावातील गावकर करतो आणि शिवलिंगाची पूजा ब्राह्मण करतो. देवापुढे गावातील गावकर हा रोज दिवा लावत असतो. गावातील लोकांना देवाची पूजा करण्यासाठी दर एक सोमवार वाटून दिलेला आहे. तसेच श्रावणी महिन्यात दर सोमवारी गावातील लोक एकत्र येऊन पूजा, आराधना करतात. भजन, किर्तन केले जाते. शिवरात्रीच्या दोन दिवसानंतर वाघ्रेश्वराची जत्रा असते. त्यादिवशी गावात मंदिरासमोर दोन दिवस नाटक सादर करतात, तसेच महाप्रसाद असतो. दिवाळीच्या पौर्णिमेला मंदिराच्या समोरील खांब्यावर ( पुरीसावर) कट्टयांची पणती पेटवतात. ‘वाघ्रेश्वर’ हा ‘सोलया’ या गावाचा ग्रामदेवता आहे. या देवाला वाघ्र्या असे पूर्वी लोक म्हणत. गावातील लोक वर्षातून एकदा देवाला ‘रोट’ (केळीच्या पानावर तांदळाच्या पिठात गुड घालून चुलीवर भाजलेली भाकर) घालतात.

### ३.४.२ श्री धानुचरण

‘धानुचरण’ हे उन्नयनित दैवत प्रकारातील लोकदैवत आहे. या दैवताची गावात दोन श्रद्धास्थळ आहेत. एक मूळ ‘घाडीवाडा’ गावात धानुघाडी देवाचे मंदिर आणि दुसरे घाडीवाडा या गावा पुढील गाव पाऊलामड्डी या गावात श्री धानुचरण हे छोटेसे मंदिर आहे. मैदानी जागेच्या कडेला तळयाच्या बाजूला हे मंदिर आहे. हे मंदिर हल्लीच दोन वर्षांपूर्वी बांधलेले आहे. ज्या ठिकाणी आता मंदिर आहे त्या ठिकाणी पूर्वी श्री धानुघाडी देवाचे पाऊलांचा ठसा एक पाषाणी दगडावर होता. तोच पाषाणी दगडावरील पाऊलांचे ठसे आता मंदिरात आहे. त्यांची पूजा केली जाते. धानुघाडी देवाला गाय प्रिय होत्या म्हणून त्यांच्या धानुचरण मंदिराच्या बाजूला गौमाता मंदिर आणि ब्रह्मण मंदिर म्हणजे ब्राह्मणास मान म्हणून छोटी दोन मंदिरे बनलेली आहे. एप्रिल महिन्यात या मंदिराचा वर्धापन दिन असतो. या मंदिराची पूजा ब्राह्मण म्हणजे भट्ट करतो.

### ३.४.३ खान्सीदेवी

'खान्सीदेवी' ही देवी 'काकोडा' या गावात आहे. काकोडा गावात 'जल्मी' देवाचे मंदिर आहे. या मंदिराच्या उजव्या बाजूला एक लहानसे मंदिर आहे. या देवीची मूर्ती पूर्वी शेळवण गावातून आणली आहे असे या गावातील पुजारीने सांगितले. खान्सीदेवीची मूर्ती एक वडाच्या झाडाखाली होती आता त्या ठिकाणी एक छोटे मंदिर बांधले आहे. ह्या देवीला आपली कोणतीही इच्छा सांगितली तर ती पूर्ण व्हायची इच्छा पूर्ण झाल्यावर देवीला सोन्याचे दागिने दिले जायचे. एप्रिल महिन्याच्या शेवटच्या दिवसात या देवीची विधी गावातील जल्मी देवळातील पुजारी करतो. या विधीत देवीला दागिन्याऐवजी सिंदूर, खण, काजळ, फणी, हे श्रृंगार असे वस्तू एका केळीच्या पानावर ठेवून पाण्यात सोडतात आणि देवीला दोन कोंबडा एक करून (सांगोड) मारला जातो. ह्या कोंबड्याचे रक्त भातात मिसळून रात्रीच्या वेळी गावच्या सीमेवर आणि गावात मारतात. ही विधी केल्याने गाव शांत होतो असे गावातील लोक म्हणतात. रोज देवीला वात पेटवतात.

### ३.४.४ सतीदेवी

'आंबावली' गावात रस्त्याच्या डाव्या बाजूला सतीदेवीचे मंदिर आहे. सतीदेवी म्हणजे एखादा वीर स्त्रीची आत्मा होय. आपल्या पवित्राचे साक्ष देण्यासाठी या देवीने आगेत उडी मारली. नंतर काही वर्षांनी त्या ठिकाणी एक वारूळ निर्माण झाले त्या वारुळातून एक पाषाणी मूर्ती उत्पन्न झाली ती म्हणजे सतीदेवी आणि तिचा पती. या पाषाणी दगडावर एक स्त्री म्हणजे सतीदेवी आणि एक पुरुष म्हणजे तिचा पती त्याच्या हातात शस्त्र आणि एक हाताचे चित्र आहे. या देवीची पूजा गावातील गावकर लोक करतात. रोज देवीला वात पेटवतात. या देवीचा दिवस म्हणजे बुधवार आणि (रविवार) आयतार होय.

असे अनेक लोकदैवते केपे परिसरात आहे. प्रत्येक गावाच्या सीमेवर गावातील लोकांचे रक्षण करणारा राखणदार उदाहरणार्थ: *केपे परिसरातील पुरुषम्हारू, कातर्शीम्हारू, गोडक्याधनी, कूनेश्वर इत्यादी.*

### ३.४.५ राखणदार

एखाद्या जागेवर दगड किंवा वडाच्या, पिंपळाच्या झाडाखाली हे राखणदार असतात. गोमंतकात (राखणो), देवचार या नावाने प्रसिद्ध असलेले लोकदैवते केपे परिसरातही आहे. राखणदार हे कधीही चारही बाजूने बंदिस्त राहत नाही. म्हणजे त्यांना देवी-देवतांचे मंदिर असतात तसे बंद ठेवले जात नाही, तर राखणदार हे मोकळ्या जागेवर

बहुतांश झाडाच्या खाली राहतात. हे राखणदार रात्री गावाच्या सिमेत फिरतात आणि गावाचे, गावांच्या लोकांचे रक्षण करतात. ह्या राखणदारा मागे काही वाईट शक्तीही असते. ह्या वाईट शक्तीला बाजूला ठेवून, त्यांना आपल्या बंदीत ठेवून ते गावातील सीमेची राखण करतात. राखणदाराच्या हातात एक मशाल आणि दुसऱ्या हातात मुधारी, खांद्यावर कांबळ आणि रंग काळा या स्वरूपाचे वर्णन गावातील लोक करतात. अनेकदा लोकांना त्यांचे साक्षात्कार होतात, याबाबतची माहिती संकलन करत असताना केपे परिसरातील लोकांकडून मिळाली. केपे परिसरातील राखणदाराविषयी माहिती तसेच त्यांच्या लोककथाविषयी जाणून घेतले.

केपे परिसरातील 'कुडचडे' या भागातील राखणदार 'पुरुषम्हारू'. ज्या ठिकाणी आता पुरुषम्हारू देवांचे मंदिर आहे त्या ठिकाणी पूर्वीपासून कोणतीही मूर्ती किंवा पाषाणी स्वरूपाचे दगड नव्हते, तर त्या ठिकाणी एक रूमडाचे झाड आणि त्या झाडाखाली चुन्हीचे झाड होते. देवाची मूर्ती देऊळ बांधल्यावर गावातील लोकांनी स्थापित केली. या परिसरात काहीतरी अद्भुत शक्ती आहे. असे एका व्यक्तीच्या लक्षात आले, कोणतरी आपल्या गावाची राखण करतो, त्यामुळे त्या वयस्कर माणसाने, त्या रूमडाच्या झाडाखाली रोज देवाला फुल घालून वात पेटव असे, पूजा करत असे. पूर्वी लोकांना शब्द उच्चारण्यास नीट जमत नसेल त्यामुळे महान पुरुष या नावाचे ते पुरुषम्हारू म्हणत, पुढे याच नावाने या दैवताला संबोधले गेले. या देवतांचे कार्य करण्यास पाच जातीचे वांगड म्हणजे चौगुले, गावकर, जल्मी, वाडेकर आणि गुरव आहे. गावातील 'लोक' देवाला वर्षातून एकदा 'रोट' घालतात.

तसेच 'कातर्शीम्हारू' हा राखणदार 'काकूमड्डी काकोडा' या परिसरातील आहे. गावातील लोक म्हणतात की कातर्शीम्हारू हा पुरुषम्हारूचा अवतार आहे. कातशीम्हारू या दैवताचे ठिकाण ओसाड पडलेल्या शेताच्या मध्यभागी आहे. या ठिकाणी पिंपळाचे झाड आहेत, या झाडाला तीन (फाके फुटलेल्या) फांदी एकत्र जुळून आहे. ह्या जागेवर दत्ताचा वास आहे, म्हणून दत्तजयंती दिवशी या देवाचा उत्सव साजरा केला जातो. 'बाळळी मठ' या गावात 'श्री ब्रह्माचे' स्थान आहे. या जागेवर दोन ब्राह्मणाचे मुलगे ज्यांना मुंजी बंधनाच्या वेळी पेडावर घेऊन गेले, पण त्यांचा मामा त्यांना परत घरी आणण्यासाठी आला नाही. त्यामुळे ते मुले त्या पेडावर राहिले. त्यांनी त्या गावातील लोकांची रक्षा करणार म्हणून प्रसादात सांगितले. ह्या राखणदाराला नवरात्रीच्या दिवसात दोन ब्राह्मण मुलांना त्या पेडावर बसून जेवण वाढतात, तसेच बुधवार आणि शनिवारी हा दिवस  ह्या राखणदाराचा आहे. या

दैवताला मान म्हणून पंचखाद्य, बुधवार आणि शनिवारी गावातील प्रत्येक घरातील लोक नारळ फोडतात. या राखणदाराला सांगितलेली आपली इच्छा पूर्ण झाली तर त्याला गोभ्यांची पूजा घालतात.

या राखणदाराप्रमाणे इतर राखणदार कूनेश्वर, गोडक्याधनी, वेताळ इत्यादी राखणदार केपे परिसरात आहे. 'चंद्रवाडी' हे केपे परिसरातील पूर्व नाव असून, हे चंद्रवाडी महाल सप्तकोकणातील पंचमहाल जंबावलीत समाविष्ट होते. कालांतराने या भागाची विभागणी करण्यात आली. त्यामुळे चंद्रवाडीत येणारे "मूळगुढीकटा, आमाणे, शेळडे, कुस्मण, अवेडे, कोठांबो, शेळपण, असोळडे, पारोडे, मुळे तळवडे, होडार, कुडचडे, मळकर्णे, मळकपण, शिर्वे, आंबावली, चिकशेळवण, चाळफी घुडा व देवमुळ." ह्या एकूण २२ गावांचा अधिपती म्हणजे चंद्रेश्वर भूतनाथ दैवत होय. हे गाव सांभाळण्याचे कार्य चंद्रेश्वर भूतनाथ करत, त्यांच्याखाली पुरुषम्हारू, कातर्शीम्हारू यासारखे राखणदार त्यांचे गण होय.

### ३.४.६ श्री वेताळ देवस्थान काकोडा

'काकोडा' गावाचा ग्रामदेवता आणि राखणदार म्हणून श्री वेताळ देवाकडे पाहिले जाते. या मंदिरात श्री वेताळ देवाची आणि सातेरी देवीची मूर्ती आहे. वेताळ आणि सातेरीची पूजा मंदिरातील पुजारी गुरव या जातीचे लोक करतात. दसऱ्याच्या दिवशी गुरवा वर वेताळ देवाचा अवसरही येतो. या मंदिराचा सर्वात मोठा उत्सव म्हणजे दसरा. या दसऱ्याच्या बद्दल एक लोककथा गावात प्रचलित आहे. वेताळ देवाला गावात आणल्यावर, त्याला स्थापित करण्याच्या वेळी वेताळदेव उभा होत नसे. त्यामुळे गावातील लोकांनी महार जातीच्या लोकांना गावात बोलवले. या महार जातीच्या एका माणसाने एक लहान मुलाला मंदिरामागे असलेल्या विहिरीसारख्या जागेवर पुरवून वेताळ देवाला मंदिरात उभे केले. ती जागा महारांगण म्हणून ओळखली जाते. मंदिराच्या पुढे असलेले पाषाणी एक लिंग, वेताळदेवाने या लिंगाखाली एक खेत्रीला बंदी केले आहे. मंदिराच्या परिसरात खूप जुना पाषाणी दगडावर लिहिलेला एक शिलालेख आहे. देवाला रोज वात पेटवली जाते. वेताळ देवाच्या मूर्तीची लांबी चार-पाच फूट असतील. रविवारी मंदिरात प्रसाद लावतात. या दैवताच्या लोककथा विषयी चौथ्या प्रकरणात आपण अधिक माहिती जाणून घेणार आहोत.

**३.४.७ जातीनिर्देशक म्हरांगण**

'कुडचडे' गावातील 'काकोडा' भागात या दैवतांचे स्थळ आहे. ह्या म्हरांगणात रूप, प्रतिमा, मूर्ती अशी काही नाही. चिऱ्याने बांधलेली एक विहीरी स्वरूपाची जागा आहे. विहिर म्हणायला त्यात पाणीही नाही. या ठिकाणी लोकांना जाण्यास बंदी आहे. एकंदरीत या स्थळाची रचना या गावातील वेताळ देवाशी संबंधित आहे. केवळ महार जातीच्या लोकांना या जागेवर जाण्यास मिळते या गावातील महार लोक त्याला पुजतात. महार जातीत मुलींच्या लग्नावेळी एकदाच घरातून त्या मुलीने त्या म्हरांगणात जाऊन वात पेटवायची अशी विधी आहे. या म्हरांगण संबंधित एक लोककथा गावात प्रचलित आहेत, त्याबद्दल पुढील चौथ्या प्रकरणात सविस्तर कथेविषयी माहिती मिळणार आहे.

केपे परिसरातील प्रत्येक गावात लोकदैवतांचे वास्तव्य आहेत, दर एका ठिकाणी आढळणाऱ्या घुमटी अथवा पाषाणी दगड देव मानून त्यांचा उल्लेख करणे ही अशक्य आहे. एवढी या लोकदैवतांची संख्या आहे. या सर्व लोकदैवता विषयी अनेक लोककथा गावात प्रचलित आहे. ह्या लोकदैवतांना गावातील 'लोक' त्यांचा वार्षिक मान काढला जातो. या दैवताशिवाय भूत, खेत्री, म्हारु अशी लोकदैवते ही या परिसरात आढळतात. त्यांना वर्षातून एखादा गावातील लोक 'वाडी', एखादा 'फुलपाकळी', 'रोट' घालतात. हे लोकदैवते लोकसमाजाशी संबंधित असतात.

**३.५ समारोप**

केपे परिसरातील दैवते आणि लोकदैवते यासंदर्भात विचार करताना 'मानव' आणि 'दैवत' यांच्यामधील अनेक संबंधातील घटकांचा उलगडा होत जातो. आजच्या काळात दैवतांची मूर्ती, मंदिर, भक्त, पूजा, विधि आणि उपासनेचे प्रकार या सर्व गोष्टीना आधुनिकतेचे रूप मिळालेले पाहायला मिळते. या दैवताविषयी भक्तांच्या भक्तीचा धागा आजही चिवट स्वरूपात टिकून आहे. कालांतराने लोकदैवतांची संख्या वाढताना दिसते. या प्रकरणातून केपे परिसरातील दैवते आणि लोकदैवते संकल्पना समजून या परिसरातील महत्त्वपूर्ण दैवते आणि लोकदैवताविषयी माहिती मिळण्यास मदत होईल.

**३.६ निष्कर्ष**

1. केपे परिसरातील आढळणारी बहुतांश लोकदैवते ही येथील लोकांची निर्मिती आहे.

2. लोकदैवतांची निर्मिती समाजाच्या मानसिक श्रद्धेच्या पातळीवर आणि कल्पनेच्या आधारे झालेली दिसते.
3. केपे परिसरातील अनेक देवतांची पूजा झाडे, पशुपक्षी, पाषाण व माणूस या सर्वांच्या कल्पनेतून दैवतशक्ती निर्माण केलेली दिसते.
4. केपे परिसरातील अनेक पुरातन काळातील मुर्त्या इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरतात.
5. दैवतांना आकार, मूर्ती, हे सर्व मानवी पातळीवरच्या आहेत, तसेच या दैवतांची पूजा, विधि, उपासना पद्धती या सर्वची निर्मिती मानवी श्रद्धेमुळे झालेली दिसते.
6. लोकदैवतांची निर्मिती एखादा अमुक (महार, गावकर) जातीवरून निर्माण झालेले दिसते.
7. या दैवताविषयी समाजाच्या मनात भावना, श्रद्धा, सुरक्षिता असते, तसेच भीती ही असते.
8. केपे परिसरातील काही राखणदार डोंगरावर, नदीच्या कठावर, गावाच्या बाहेर, एखादा झाडाखाली असलेले पाहायला मिळतात.
9. केपे परिसरातील दैवतासंबंधित असलेली विधी परंपरेने पुढे नेत येथील 'लोक' आपली 'लोकसंस्कृती' प्रदीर्घकाळ टिकून ठेवण्याचा प्रयत्न करतात.
10. मानवी कल्पनेद्वारे दैवत संकल्पनांना त्यांचे भौतिक रूप प्राप्त होते.

**संदर्भ**

---

[1]अय्या, हेमंत. '*गोमंतकातील काणकोण, तालुक्यातील लोकसाहित्य चिकित्सक अभ्यास*'. २०२३ पृ.३०१

[2] जोशी, महादेवशास्त्री. *भारतीय संस्कृती कोश*. पृ.४३१.

[3] अय्या, हेमंत. '*गोमंतकातील काणकोण, तालुक्यातील लोकसाहित्य चिकित्सक अभ्यास*'. २०२३ पृ.३०१

[4] अय्या, हेमंत. '*गोमंतकातील काणकोण, तालुक्यातील लोकसाहित्य चिकित्सक अभ्यास*'. २०२३ पृ.३०७

[5] मराठी विश्वकोश. '*लोकदैवते*'. Google paly app

[6] भोसले, द.ता. '*लोकसंस्कृती: स्वरूप आणि विशेष*'. पदगंधा प्रकाशन पुणे, पृ.१०.

[7] व्यवहारे, शरद. '*लोकसंस्कृतीचा अंतप्रवाह*'. प्रतिमा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती जून १९९९, पृ. ११.

[8] ढेरे,रा. चि. '*आनंदनायकी*'. पंद्मगाधा:-२०११, पृ.६९.

[9] ढेरे, अरुणा. '*आठवणीतील अंगण*'. पंद्मगाधा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती ऑगस्ट १९९९.

[10] मोरजे, गंगाधर. '*लोकसाहित्याचे बदलते संदर्भ; बदलती रूपे*'. पंद्मगाधा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती १९९७, पृ.७७.

[11] अय्या हेमंत, '*गोमंतकातील काणकोण, तालुक्यातील लोकसाहित्य चिकित्सक अभ्यास*' २०२३, पृ.३०७

[12] मणगुतकर, आशा. ' *चंद्रवाडी*'. २४ वे गोमंतक मराठी साहित्य संमेलन २००१, केपे गोवा.

[13] *श्री क्षेत्र श्री चंद्रेश्वर भूतनाथ देवस्थान*. पर्वत- चंद्रवाडी पृ. ५

[14] *श्री क्षेत्र श्री चंद्रेश्वर भूतनाथ देवस्थान*. पर्वत- चंद्रवाडी पृ.५,६,७

[15] *श्री शांतादुर्गा बाळ्ळीकरीण संस्थांतर्गत, श्री कुनेश्वर देवस्थानाचा अर्चाशुध्दी वास्तुयाग सोहळा*. २००२, पृ.२३

# प्रकरण ४

# केपे परिसरातील लोकदैवतकथांचा अभ्यास

**प्रस्ताविक** ....................................................................................................67

**४.१ केपे परिसरातील लोकदैवतकथा**......................................................................67

४.१.१ श्री वाघ्रेश्वर महादेव प्रसन्न ....................................................................68

४.१.२ श्री वाघ्रेश्वर महादेव प्रसन्न ....................................................................69

४.१.३ श्री देव धानुचरण..........................................................................................70

४.१.४ सूण्याखेडे.....................................................................................................72

४.१.५ श्री मल्लिकार्जुन (मळकर्णे) .......................................................................73

४.१.६ श्री सातेरी शांतादुर्गा ( शेल्डे) ..................................................................74

४.१.७ श्री सातेरी (काकोडा)...................................................................................75

४.१.८ श्री चंद्रेश्वर भूतनाथ ...................................................................................76

४.१.९ वेताळ देव (काकोडा) ...................................................................................77

४.१.१० श्री बेताळ देव (काकोडा) ..........................................................................78

४.१.११ श्री सिद्धदेव .................................................................................................79

४.१.१२ वाटूबोंघाडी..................................................................................................80

४.१.१३ महारांगणपुरव बेताळ................................................................................81

४.१.१४ लिंगदेव ....................................................................................82

४.१.१५ कातर्शीम्हारू ..............................................................................83

४.१.१७ खान्सीदेवी (काकोडा)......................................................................84

४.१.१८ श्री चंद्रेश्वर भूतनाथ आणि पुरुषम्हारु .........................................................85

४.१.१९ श्री ब्रह्मा ....................................................................................86

४.१.२० सतीदेवी (आंबावली) .......................................................................87

४.१.२१ श्री भूतकाका प्रसन्न.........................................................................88

४.१.२२ पुरुषम्हारु ...................................................................................89

४.१.२३ पुरुषम्हारु ...................................................................................89

४.१.२५ वज्रेश्वर आणि कुनेश्वर.......................................................................91

४.१.२६ फळ शिलाहार शांतादुर्गा....................................................................92

४.१.२७ सासरकान सातेरी ...........................................................................93

४.१.२८ दत्तमंदिर (केपे) ..............................................................................94

४.१.२९ श्री नागनाथ (मळकर्णे) ......................................................................95

**४.२ समारोप**..........................................................................................96

**४.३ निष्कर्ष**..........................................................................................96

**नामसूची:**...........................................................................................97

# प्रकरण ४

# केपे परिसरातील लोकदैवतकथांचा अभ्यास

**प्रस्ताविक**

लोकवाङ्मयातील एक महत्त्वाचा प्रकार म्हणजे लोककथा. लोककथांची परंपरा फार प्राचीन आहे. एखाद्या मानवाने कोणाकाळी या लोककथा जन्माला घातलेल्या असल्या, तरी ह्या लोककथा एका व्यक्तीपूरत्या सीमित न राहता त्यांची समूह निर्मिती होते. केपे परिसरातील लोकसंस्कृतीला एक वेगळेपण प्राप्त झाले आहे, यात या परिसरातील दैवतांचा फार मोठा वाटा आहे.

केपे परिसरात अनेक दैवते आहेत, या दैवताविषयी गावात अनेक लोककथा प्रचलित आहे. या लोककथांचा कर्ता कोणाला माहित नाही, परंतु या कथा कालांतराने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होताना दिसतात, त्यामुळे दैवतावर असलेली या परिसरातील लोकांची भावना, अपार श्रद्धा या लोककथातून दिसते. सदर प्रकरणाद्वारे केपे परिसरातील लोकदैवतकथांचा अभ्यास इथे होणार आहे.

**४.१ केपे परिसरातील लोकदैवतकथा**

भारतात लोकप्रिय असलेली आणि प्राचीन काळापासून चालत आलेली लोककथांची परंपरा फार मोठी आहे. लोककथांचे अनेक प्रकार आहेत, त्यातील दैवत लोककथा हा प्रकार मानवी जीवनाच्या श्रद्धास्थळी असलेली महत्वाची कल्पना होय. दैवत या संकल्पनेमुळे वेगवेगळ्या समाजातील जाती-धर्माचे लोक एकत्रित येतात.

केपे परिसरात जास्त संख्या लोकदैवतांची असल्याने, या प्रकरणात लोकदैवता विषयीच्या कथा जास्त आहे. मानव आपले जीवन सुखकारक बनवण्यासाठी या दैवतांना शरण जातो, आणि ही लोकदैवतेही माणसावर आपली कृपादृष्टी दाखवितात. या अपार श्रद्धेतून लोकदैवतांची संख्या समाज जीवनात वाढत आहे.

सदर प्रकरणातून केपे परिसरातील दैवतलोककथा पाहून त्यांचे विश्लेषण केले जाणार. या प्रकरणातील सर्व लोककथा दैवत कथेला समांतर अश्याच आहेत. या संकलन कार्यादरम्यान २९ लोकदैवत कथा संकलित करणे शक्य झाले. या लोककथांचा अभ्यास या प्रकरणाद्वारे केला जाणार आहे.

**४.१.१ श्री वाघ्रेश्वर महादेव प्रसन्न**

**श्री वाघ्रेश्वर महादेव प्रसन्न**

पयली या भागान एक वाघ भोवतालो. एकदा वाघ आनी ताची बायल वाघीण भोवताली. वाघाक उदक पिवपाक लागून लागी आशिल्ल्या तळयाकडे गेलो. त्या तळयाक 'वाघ्रचीझर' अशे म्हणतात. वाघ उदक पिवपाक लागलो. ताका दिसले की आपली बायल आपल्या फाटी असा, आपल्या वांगडा येता आसतली. पुण जेन्ना वाघाक कळ्ळे की आपली बायल आपल्या वांगडा ना म्हण, तेन्ना वाघ तिका सोदीत परत आयील्या वाटेन गेलो. पायलेर वाघीण डोग्रार आशिल्ल्या सिद्धदेवाक पयत आशिल्ली. हाचो वाघाक राग आयलो आनी ताणे वाघिणीक आपल्या पासुन पयस दवरले.

(वाघेश्वरा देवळा भायर उजव्या वाटेन एक ल्हानशी वाघिणीची मूर्ती आसा. आनी ती या कथेत सागिल्याप्रमाणे वाघान वाघीणेक आपल्या पासून पयस दवरले म्हण ही मूर्ती भी वाघेश्वर देवळा भायर आसा.)

'सोलया' या गावात वाघ्रेश्वराचे मंदिर आहे. या देवाला पूर्वी 'वाघ्र्या' असे म्हणत. या मंदिरात वाघासारखी दिसणारी एक मूर्ती आहेत, आणि त्याच्या बाजूला महादेवाचे शिवलिंग आहे. या मंदिरात दोन देवाची पूजा करतात. एक वाघ्रेश्वराची आणि एक लिंगाची. वाघ्रेश्वर हे महादेवाचे रूप आहे, असे गावातील लोक म्हणतात.

या कथेत सांगितल्याप्रमाणे वाघ्रेश्वराच्या मंदिरा बाहेर उजव्या बाजूला एक वाघिणीची मूर्ती आहे. कथेत सांगितल्याप्रमाणे वाघिणीला वाघ्र्याने आपल्यापासून दूर केले. आपल्या बाजूला स्थान दिला नाही, म्हणून

वाघिणीचीमूर्ती मंदिराच्या बाहेर आहे. ही मूर्ती गावात असलेली या कथे संदर्भात पुरावा आहे. या दोन्ही मुर्त्या कोणी आणून स्थापित केलेल्या नाही, तर या मुर्त्या पूर्वीपासून या गावात आहेत.

वाघ्रेश्वर भक्तांच्या हाक्केला पावतो, तसेच या देवाला कोणत्याही जनावराची बळी मान म्हणून दिली जात नाही. या मंदिरातील वाघ्रेश्वराची पूजा गावातील गावकर करतो आणि लिंगाची पूजा ब्राह्मण म्हणजे ‘भट्ट’ करतो. मंदिराच्या उजव्या बाजूला अनेक छोटी पाषाणी लिंग आहेत, त्यात एक पाईकदेवाची घोड्यावर बसलेली मूर्ती आहे. ही मूर्ती देवाचे काम करताना कामगारांना मिळाली होती. शिवरात्रीच्या दोन दिवसानंतर वाघ्रेश्वराची जत्रा असते. तसेच दिवाळीच्या पौर्णिमेला मंदिरासमोरील खांब्यावर (पूरीस) काटांची पणती पेटवतात.

**४.१.२ श्री वाघ्रेश्वर महादेव प्रसन्न**

एकदा गावाक पैशाची चोरी झाली. म्हण गावाच्या लोकांनी देवाकडे गाऱ्हाणे घातले ( प्रसाद लायलो) आनी देवळाक आयले सगळे गावा लोकांक देवा प्रसाद खावपाक दिलो. सगळे लोकं प्रसाद खाताना त्या चोरान बी देवा प्रसाद खालो.

चार दिसानंतर तो चोर वाघा बाशेन बोवाळ मारपक लागलो. वाघा बाशेन चलपाक लागलो. म्हण गावा लोकांनी ताजा कमरक राझू बानलो आनी तेका देवळाक हाडलो. आनी गावकरानी तेका चोरीचे पेटूल खाय आसा ते विचारले, तेन्नी सांगले. त्या चोरान सांगलेल्या जाग्यार वासून पयल्यार थंय लोकांक पेटूल म्हेळे.

‘वाघ्रेश्वर’ देवाच्या उपरोक्त मांडलेल्या या दुसऱ्या कथेचे पुरावे नाहीत, परंतु गावातील लोक ही कथा सत्य आहे असे म्हणतात. वाघ्रेश्वर देव भक्तांच्या हाक्केला पावतो. या ‘सोलया’ गावातील लोक (कोपर) दर महिन्यात पैसे काढून सांभाळून आणि ते व्याजावर  इतरांना दिले जात. या लोकांचे पैशांचे पेटूलाची चोरी झाली, त्यामुळे गावातील लोकांनी वाघ्रेश्वर देवाला गाऱ्हाणे घातले.

कथेत सांगितल्याप्रमाणे वाघ्रेश्वर देवाने त्या चोराला शिक्षा दिली आणि लोकांसमोर आणले. वाघ्रेश्वर देव ह्या ‘सोलया’ गावचा ग्रामदेवता आहे. गावातील लोक या देवाला खूप मानतात. या देवाला आपली इच्छा सांगितली तर ती पूर्ण होतेच, अशी लोकांची श्रद्धा आहे.

### ४.१.३ श्री देव धानुचरण

**श्री देव धानुचरण**

काकोडा गावक श्री बेताळचे देवूळ आसा. बेताळा देवूळा मूखार श्री महादेवाचे देवूळ आसा. तशेच ककोडा गावा लागी घाडीवाडा गाव आसा, हे गावाक धानुघाडी देवाचे देवूळ आसा. पयलीच्या काळात बेताळा आनी धानुघाडी देव मित्र आशिल्ले. धानुघाडी देवाकडे चड संपत्ती नाशिल्ली. एक गाव आनी गोरवा (गाय आणि म्हैस) आशिल्ली. बेताळा हो खुब श्रीमंत आशिल्लो. बेताळाकडे खुब गाव आशिल्ले. धानुघाडी आनी बेताळा खेळताना बेताळा धानुघाडीची फकणा उडयतलो.

एक दीस अशेच खेळताना बेताळ शेणाच्या गायरेत पडलो. आनी  भितर वसपाक लागलो. बेताळान आपल्या मदतीक लागून धानुघाडीक आपयले. धानुघाडीन सांगले की हाव तुका मदत करतलो, पुण तूवे म्हाका हाव मागता ते दिवपाक पडतले. बेताळान दिता म्हणले. धानुघाडीन सांगले हाव तुका काडून तुज्या सीमेतल्यान जितलो पयस धावतलो ती जागा माका दिवपाक पडतली. अशे म्हणून धानुघाडी देव बेताळा मदत केली आणि धावपाक लागलो. हे आयकुन मुखार आशिल्या महादेवाचेर संकट आयले. आता धानुघाडी माझ्या मुखारसून धावलो जाल्यार हाव बी तेका वतलो, म्हण महादेवान आपल्या मुखार वाटेर एक लिंग उबे केलें. तो जागो आता लिंगवाडी म्हूण वळकता.

लिंग उभे केल्या कारणान धानुघाडी देव दुसऱ्या दिशेनं धावलो, आनी घाडीवाडा लागी पावतगिर जाम झाल्या करणाना एका फातराचेर उभो रावलो. थय धानुघाडी देवाची पावला लागून उरली. तितलो जागो बेताळान धानुघाडीक दिलो. या पावलाचे थय एक ल्हान देवूळ आसा. गावातली लोक या पावलाची पुजा करतात. या जाग्याक ‘पावलमड्डी’ म्हणतात.

‘पावलमड्डी’ या गावात श्री धानुचरण मंदिर आहे. हे लोकदैवत आहे. या कथेचे पुरावे गावात सापडतात. उदाहरणार्थ:- धानुघाडी देवाच्या पायांचे ठसे पाषाणी दगडावर आहे. या धानुचरणामुळे या गावाला ‘पावलमड्डी’ हे नाव प्राप्त झाले. ह्या देवाच्या पावलाची पूजा केली जाते. धानुचरण या लहानशा मंदिरा बाजूला ‘गौमाता मंदिर’ आणि ‘ब्रह्मा मंदिर’ अशी दोन छोटी मंदिरे आहे.

या मंदिराचे महाजन काकोडा गावातील देसाई, सावंत लोक आहे. या धानुचरणाची पूजा गावातील ब्राह्मण करतो. या कथेत धानुघाडी वेताळाला मदत करून ज्या वाटेने पळतो, त्याच वाटेने आजही दसऱ्याच्या दिवशी वेताळ देव आपल्या मित्राच्या घरी एक रात्री राहायला जातो (मंदिराच्या पुजारीवर अवसर येतो), आणि दुसऱ्या दिवशी धानुघाडी देव वेताळ देवाला सोडण्यासाठी त्याच वाटेने जातो.

दसऱ्याच्या दिवशी या गावातीललोक तसेच दुरुन इतर भागातील लोक हा दसरा पाहण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित असतात. तसेच धानुचरणाचे वर्धापन दिन म्हणजे (एप्रिल महिन्यात) चैत्र महिन्याला प्रथम दिवस गुढीपाडव्याच्या दिवशी साजरा करतात.

वेताळ हा शिवशंकराचा गण आहे, या गणाची पूजा गावातील गुरव करतो. बेताळ आणि धानुघाडी देवाच्या सर्व कथा एकमेकाशी जोडलेल्या पाहायला मिळतातं. ज्या जागी धानुघाडी देवाच्या पावलांचे ठसे आहे. ती जागा पुर्वी अनेक लोकांनी विकत घेतली होती, परंतु त्या जागेवर कोणालाही घर बांधायला मिळाले नाही. त्यामुळे नंतर गावातील लोकांनी त्या पावलांचे मंदिर तिथे बांधले.

दसऱ्याच्या दिवशी बेताळ आणि धानुघाडी देव काकोडाला जात असताना लिंगवाडी इथे लिंगदेव त्यांना आपल्या मंदिरात प्रवेश करण्यास अडवतो. मंदिराच्या बाहेरच त्यांचा स्वागत करून त्यांना परत पाठवतात. ही परंपरा आजही गावात चालू आहे. दसऱ्याच्या दिवशी या दोन्ही मित्रांची भेट होते.

### ४.१.४ सूण्याखेडे

खुब पयली परबाचे आनी मुळ्याचे पटनाशील्ले. परब हे मुळ्यागेर जोव भी नशिल्ले. परबचे एक सुणे आशिल्ले तेका परब खुब बरे करताले. एक दिस मुळ्यागेर जवण आशिल्ले, सगळो लोकं जोवपाक गेलो. ते सुण्ये बी मुळ्यागेर जवणाक गेले. जोवून सूण्ये परत घरा आयले. घरा येतगिर तेजो मालक ताका तापोक लागलो. आमी उल्यना तेमगेर तू  जोवून आयले अक्कल असा तुका म्हण. थंय फात्राचेर नाक मार आनी मर म्हणले. सुण्यान आपल्या मालकानं सागलेल्याप्रमाणे तशे वसून एक फात्रचेर नाक आपटून आपटून मेले. मालकाला आपली चुक कळी. ते सुण्य परबाच्या उल्याक तेंका पावपाक लागले. म्हण तेजी एक ल्हन घुमठी बांधला. परब तशेच गावाच्या लोकांक बी पावपाक लागले. गावाचे लोक तेका वर्सा एक ‘रोट’ घालता. तशे दसऱ्याक या सुण्याखेड्याचेर बेतकाडी मारले शिवाय तरंग फुडें वसना. गावानं किते बरे कार्य असले जाल्यार सुण्याखेड्याक गावाचे लोकं मान दिता.

‘काकोडा’ गावात ‘गुन्यार’ इथे हे सूण्याखेडे आहे. एखादा वीर प्राण्याची आत्मा असलेली ह्या कथेचे स्वरूप आहे. त्या कथेत ‘कुत्रा’ ह्या प्राणीला दैवताचे स्थान दिलेले दिसते. गावातील लोकांची या दैवतावर श्रद्धा आहे. सूण्याखेड्याला रोज वात पेटवतात. गावातील एखादा राखणदारासारखा या सूण्याखेड्याकडे पाहिले जाते. मुळात हा ‘सावंताचा’ आणि ‘परब’ या जातीचा राखणदार. पण गावातील सर्व लोक त्याला मानतात, त्याला ‘रोट’ घालतात. दसऱ्याच्या दिवशी त्याला वेताळ, धानुघाडी मंदिराचे पुजारी अवसराच्या वेळी आपल्याकडील बेताची बडी या खेड्यावर मारल्याशिवाय पुढे जात नाही.

गावात काहीही शुभ कार्य असेल तर त्याला मान दिला जातो. ‘खेडे’ हे मृत्यूनंतर बांधले जाते माणसांचेही बांधतात, परंतु त्यांना समाजात दैवताचे मान मिळत नाही. पण या सूण्यालां गावातील लोकांनी हा मान दिलेला आहे. वेताळ दैवताचा एक ‘गण’ जो गाव राखतो, म्हणून या सूण्याखेडयाकडे पाहिले जाते.

### ४.१.५ श्री मल्लिकार्जुन (मळकर्णे)

‘मळकर्णे’ गावचे लोक पयली शेत करताले. गावचो मुख्य दैवत जल्मी. जल्मी भी पयली शेत करताले. शेतान काम करता तेंन्ना जमल्याक शेत कस्ता तेंन्ना ताजे नांगर एक फातराक लागलो. तो कडून पयलेर थय एक जलम्याक लिंग मेळले. ते लिंग (मल्लिकार्जुन देवा) जलम्यान या गावानं स्थापित केले.

‘मळकर्णे’ गावाचा मूळ दैवत ‘जल्मी’ आहे. पूर्वी लोक शेती करत हाचा मुख्य व्यवसाय असे. तसाच जल्मीही शेती करत. जम्लीला शेतात काम करत असताना त्याच्या नांगराला एक दगड लागले. ते दगड काढून पाहिल्यावर, ते लिंग होते. जल्मीने ते लिंग गावात स्थापित केली.

या गावात ‘जम्ली’ हे मुळ ‘कुळ’ असल्याने गावात महत्त्वाचे दैवत म्हणजे हे जलमी देवस्थान होय. कोणत्याही शुभ कार्याची सुरुवात किंवा एखादा सण उत्सवाची विधीची सुरुवात या मंदिरापासून केली जाते. या जल्मी देवामुळे गावात इतर देवस्थानाची झालेली आहे. तसेच नागनाथ या दैवताच्या कथेतही जल्मी दैवतामुळे या दैवताची स्थापना झालेली दिसते.

जलम्याने स्थापित केलेल्या या मंदिराला ‘श्री मल्लिकार्जुन देवस्थान’, ‘मळकर्णे’ म्हणून प्रसिद्ध आहे. या मंदिरात कालोत्सव, श्रावणी सोमवार, शेण्या उजो इत्यादी सण साजरा करतात. या गावाचे मूळ देवस्थान म्हणजे जल्मी. जल्मी मंदिराकडून गावातील सर्व विधी उत्सवाची सुरुवात होते.

### ४.१.६ श्री सातेरी शांतादुर्गा ( शेल्डे)

‘शेल्डे’ या गांवाक श्री सातेरी आनी शांतादुर्गा देवीचे देवूळ आसा. या गावात १२ वर्सानी एकदा देवीची जात्रा जाता. या फटल्यान एक कथा आसा. पयली (पोर्तूगिजाच्या सुरवाती काळाक एक घटना घडलेली) हो काळ म्हाबळू .गा. देसाई यादव यांचो. शेळपे गावाचो चिमण सावंत शेल्डेच्या भेत्रो गावसच्या चोडवा वांगडा लग्न ठरलेले. पुण हे चली अपंग आशिल्ले करणांन हे लग्न मोडले. आनी राजाचे लग्न कोठंबी गावाच्या निळू प्रभू देसाई हेच्या चले वांगड करपाचे ठरले. राजाचे लग्न मोठे थाठाण झाले. नवरो आनी वकल कोठंबीच्या तळयाबांधर फुडें कोकोडा तळयाबांद रस्त्यानं नागवे ते शेळपे वसपाक वरात गेली. वऱ्हाड शेल्डेच्या तळयाबांधरार पावताच शेल्डेच्या लोकांनी नवऱ्याक आनी वकलेलक तलवार, कोयथो या शस्त्रानी ३६५ लोका मारले. आनी ‘शेळपाच्या चिमण सावता चा रे चा’. अशे म्हणले.

शेल्डच्या लोकांनी आपल्या गावाच्या चले वांगडा लग्न ना करता प्रभुदेसाईच्या चलेकडे लग्न केले, म्हण गावचे लोकान मारले, म्हूण राजा आनी तेजी बायल लोकांक त्रास दीवपाक लागली. म्हणून लोकांनी गावच्या देविक प्रसाद लायलो. देवीनं सांगले की तुम्ही नववर वधुक मारले त्यांका हवं शांत करता पुण गावाच्या लोकांनी माजो उत्सव करपाक पडतलो. त्या उत्सवाक देवीक १२ दिसात एक ‘सावत’ मारून दिवपाक पडतले ते सावत चार पायचो डुक्करच आसपाक जाय. त्या शिवाय दुसरो खंचो मान देवी स्विकारपाना.

(जात्रे पयली गावातले लोक बारा दीस ‘भोवंडी’ वता. पयल्या दिस जर डुक्कर मेळूना जाल्यार थय एक फार मारून परतवप. दुसरें दिस बी मेळूना जालेर आनी एक फार मारप आनी परतवप. अशे डुक्कर मेळपर्यंत बारा दिस भोवांडी करप. बार दिसा पायली डुक्कर मेवलो जालेर उरीले फार मारप आनी परतवप.)

श्री सातेरी शांतादुर्गा देवीच्या या कथेत सांगितल्याप्रमाणे गावातील काही लोक म्हणतात की, भेत्रो गावासची मुलगी अपंग नव्हती राजाने लग्न मोडल्यामुळे त्या मुलीने आत्महत्या केली. त्याचा सूड घेण्यासाठी शेल्डेच्या लोकांनी राजा चिमण सावत आणि त्याच्या वधूला तलवारीने मारले. या शत्रुत्वामुळे ३६५ लोकांची

बळी घेतली, त्या लोकांची आत्मा गावातील लोकांना त्रास करू लागली म्हणून, श्री सातेरी शांतदुर्गादेवीने त्यांना शांत केले (आपल्या बंदीत ठेवले). त्यामुळे देवीला सांगितल्याप्रमाणे ४ पायाचा डुक्कर मान दिला जातो. १२ वर्षांनी एकदा देवीची जत्रा असते. ही जत्रा सुरू होण्या १२ दिवसा आदि. गावातील लोक 'भोवंडी'ला जातात.

पहिल्या दिवशी जर डुक्कर मिळाला नाही तर एक (फार मारून) गोळी झाडून परततात. डुक्कर मिळेपर्यंत असेच दर दिवशी एक फार मारला जातो. उदाहरणार्थ:- डुक्कर जर ७ व्या दिवशी मिळाला तर राहिलेल्या दिवसांचे फार मारून डुक्कर घेऊन लोक गावात परततात. डुकराची मिरवणूक काढली जाते. मंदिराचे पाच प्रदक्षिणा काढून, डुक्कर मंदिरात आणतात. त्या डुकराला शस्त्र लावण्याचा मान गावातली जल्मीला असतो. त्या डुक्कराचे मटण करून देवीला 'वाडी' दाखवतात, आणि त्यानंतर गावातील लोक खातात. हे विधी अजूनही देवीच्या उत्सवाच्या दिवशी करतात.

### ४.१.७ श्री सातेरी (काकोडा)

सातेरी एक राती भोवपाक वता. ती महारवाड्यार पावता, आनी थंय ती बसता. बसता तेंन्ना तिका चंद्रेश्वर पयता, आनी आपल्या वांगडा व्हरपाक येता. पुण बेताळ तिका चंद्रेश्वरा वांगडा दाडना. सातेरी तुज्या वांगडा गेल्यार माझी कामा कोण करतलो. म्हण बेताळ सातेरीक परत देवळाक घेऊन येता, पुण सातेरी महारावाड्यार जेन्ना बसलेली आसता तेंन्ना तिचे किदे तरी खूण थंय उरता. म्हण महारवाड्यार भी सातेरीचे देऊळ आसा.

'काकोडा' गावात वेताळा देवाचे मंदिर आहे. या मंदिरात वेताळा आणि सातेरी देवीची मूर्ती आहे. एका रात्री सातेरी देवी गावात फिरायला गेली होती, तेव्हा ती महारवाड्यावर एका जागी जाऊन बसली. तिच्या जागेवर बसली होती त्या जागेवर काहीतरी तिची खूण राहिले. चंद्रेश्वर भूतनाथ सातेरीला पाहून तिला घेण्यासाठी येतो. हे कळल्यावर वेताळ सातेरीला चंद्रेश्वरासोबत पाठवत नाही. वेताळाकडे काही शक्ती नसते, वेताळाची कामे सातेरी देवी करते. सातेरी देवीकडे सात पाकळी असतात, या पाकळीमुळे वेताळ देवाचे देवस्पण चालते. जर सातेरी

चंद्रेश्वराबरोबर गेली तर माझे कार्य कोण करणार म्हणून वेताळ तिला परत मंदिरात घेऊन येतो, परंतु सातेरी महारवाड्यावर बसली होती, त्याठिकाणी तिचे स्थान राहिले. पाषाणी स्वरूपाची मूर्ती उत्पन्न झाली, त्यामुळे काकोडा गावात दोन सातेरी देवीची मूर्ती आहे. वेताळाच्या मंदिरात असलेली मूळ सातेरी हीच महारवाड्यावर असलेली सातेरी आहे.

### ४.१.८ श्री चंद्रेश्वर भूतनाथ

श्री चंद्रेश्वर भूतनाथ देवस्थानचे पूजारी श्री गुरुनाथ सदा सौंदेकर राजाक तीर्थ प्रसाद धाडतलो. एकदा राजाक धाडलेल्या प्रसादक लांब केस मेळ्ळो. राजान आपल्या सरदारक सांगून गुरुदेव म्हणल्यार गुरवाक निरोप धाडलो. की “ देवाक लांब केस असा ?” गुरवान हाय म्हणले. सरदारांन गुरवाचे उत्तर तशे राजाक सांगले .

राजाक राग आयलो. आनी सरदाराकडून गुरवाका दुसरो निरोप धाडलो की “ आठ दिसा भितर जर तू देवाक केस आसा ते धाखोना जालेर तुका सुलीयेर चडयतलो”. हे आयकतगिर गुरवान राजा मेळून खुब समजवपाचे प्रयत्न केले. पुणं राजानं तेंचे एकही आयकुना. गुरव परत पर्वतार येवून जेवणखाण सोडून रात दिस देवाची पूजा करपाक लागलो. सातव्या दिस चंद्रेश्वराक गुरवाची दया आयली. देवानं गुरवा सप्नक येऊन ‘तु भिवू नाका! देवळाच्या मुख्य दरात एका फाटी एक सात परदे लय आनी उगी देवर्यात बसुन राव’. देवानं सांगलेप्रमाणे गुरवान तशें केले. आठव्य दिस सौंदेकर राजा देवळाक आयलो. देवूळा दारा बनलेले परदे पलोन राजाक आनी राग आयलो. तेन्नी आपली तलवारीन एका परदो फाडताच, दूसरो पर्दो आयलो, अशे राजानं साती परदे फाडले . सातवो परदो फाडताच राजा दोळ्यामुकार काळोख आयल्या बसेन झाले. राजानं दोळे उगडोन पयल्या र राजा मुखार अक्राळ विक्राळ जटाधारी भूतनाथ दिसलो. हे पोलोन राजाक आपली चूक कळी. राजानं देवाक पाय पडलो. आनी माफी मागली.

श्री चंद्रेश्वर भूतनाथ या दैवताची ही कथा, दैवतांची महिमा सांगणारी कथा आहे. या कथेतून मंदिराचे पुजारी गुरुदेवाची दैवतावर असलेली श्रद्धा दिसते. तसेच देव कधीही आपल्या भक्तांना निराश करत नाही, तर सदैव आपल्या भक्तांची मदत करतो, त्यांना सांभाळतो, भक्तांची परीक्षा घेतो, आणि भक्तांची उत्कट भक्ती पाहून भक्तांना साक्षात्कार ही देतो. श्री भूतनाथाचे केस लांब आहे.

गावातील लोक असेही म्हणतात की, चंद्रेश्वर भूतनाथाच्या मंदिरात जाणाऱ्या सर्व पायऱ्या चढल्यावर, वरती प्रवेश करताना एक मोठी पाषाणी पायरी आहे. त्यावर एखादा मुलींनी आपले केस घासले तर त्या मुलीचे केस भूतनाथ सारखे लांब होतात. उपरोक्त सांगितलेली कथाविषयी चंद्रेश्वर भूतनाथ देवस्थानाच्या अनेक संपादित पुस्तकात या कथेचा उल्लेख आलेला आहे. या कथातून चंद्रेश्वर भूतनाथ दैवताची महिमा चे वर्णन केले आहे.

**४.१.९ वेताळ देव (काकोडा)**

'काकोडा' गावच्या एका जाणटेल्याक सपनाक देव आयल्लो, आनी सांगले की हांव वासरीच्या डोंग्रार आसा. हे कळतगीर गावचे सगळे लोक बेताळाक सोडपाक गेले. सावंत, वाणी, देसाई सगळे गेले. गेल्यार थय खणता खणता बेताळ मेळ्ळो. पूण लोकानी ताका इलो वर कडलो आणि उरीलो फल्या खणया म्हण घरा आयले. दुसरे दिस परत गेले जाल्यार वर काडीलो तो बेताळ परत भितर गेला. लोकांनी परत खणले आणि घरा आयले. तिसरे दिसा भी बेताळ परत भितर गेलो. अशे खुब दिस जाले. लोकं खणता आणि बेताळ परत भितर वाता. अशेच एक दिस परत बेताळाक हाडपाक गेल्यार वाटेर लोकाक धानुघाडी मेळ्ळो. धानुघाडीन विचारले तुम्ही सदा खय वता. लोकांनी सगळे सांगले. धानुघाडी म्हणपाक लागलो हाव भी येता आज तुमचा वांगडा. लोक म्हणपाक लागले आमचान काडू जाऊन, तु आणि किदे करतलो. सगळे डोग्रार गेले. लोकांनी बेताळाक खाडके इतलो वर काडलेलो. बेताळ परत सखल वसचे पयले धानुघाडीन बेगीन आपल्या करंगळीच्या बोटान बेताळच्या खाडके बोट लावून बेताळाक वर काडलों.

'काकोडा' गावात वेताळ देवाचे मंदिर आहे. या गावात वेताळ देवाची मूर्ती वासरीच्या डोंगरावरुन (गोवळयावाडी) गावात आणली होती. गावाच्या एका वयस्कर माणसाला स्वप्नात येऊन देवाने साक्षात्कार दिला. त्या माणसाने गावातील सावंत, देसाई, वाणी इत्यादी लोकांना घेऊन वेताळ देवाला आणायला वासरीच्या डोंगरावर गेला. डोंगरावर खणता-खणता वेताळाची मूर्ती दिसली, आता उशीर झाला म्हणून गावातील लोकनी उद्या येऊन मूर्ती काढूया म्हणून गावात परतले. दुसऱ्या दिवशी येऊन पाहिले तर, मूर्ती परत आत गेली होती. कित्येक दिवस असेच झाले. एक दिवस धानुघाडी त्या लोकांबरोबर मूर्ती काढायला गेला.

लोकांनी वेताळ देवाची अर्धी मूर्ती खाणल्यावर लगेच धानुघाडी देवाने वेताळाच्या खाडकीला आपल्या करंगळीच्या बोट लावून वर काढले. गावातील लोकांनी वेताळ देवाची मूर्ती गावात प्रथम स्थापित केली आणि नंतर घाडीवाडा गावात धानुघाडी देवाची मूर्ती स्थापित केली. वेताळ देवाची मूर्ती साधारणता चार-पाच फूट आहेत, देवाच्या हातात तलवार आहे. धानुघाडी देवाच्या मंदिरात लिंगाची पूजा करतात. वेताळ देवाला स्त्रियांनी दसऱ्याच्या दिवशीच पहावे इतर दिवशी त्यांनी बघू नये असे गावातील लोक म्हणतात.

**४.१.१० श्री बेताळ देव (काकोडा)**

खुब पयली दसऱ्या दिसा बेताळचो आनी धानुघाडीचो भार देवळाच्या पुजाऱ्याचेर येतलो. तेंन्ना भार नेटार एक अपघात घडलो. घाडीवाडा गावच्या घाड्याचो चलो मेल्लो. तो खेत्री जावन काकोडा गावानं त्रास करपाक लागलो. काकोडच्या लोकांनी बेताळ देवाकडे मदत मागली. बेताळ देवानं त्या खेत्राक विचारले तू किदयाक गावानं त्रास करता. तेंन्ना खेत्रीन सांगले की हाव हांगा मेल्लो आनी हांग उरलो माका माझ्या गावान परत वरूना. बेताळ देवान ताका वाचन दिलो तुका हाव माझ्याकडे, म्हणल्यार देवळाच्या प्रांगणाक एक लिंग पोंदा दवरतलो, आनी दसऱ्याक तुझे गावचे लोक  तुका वरपाक आयले की हाव तुका तुझ्या गावानं वरतलो आणि एक रात रावून परत दुसरे दीस काकोड्या हाडतलो. आनी लिंग पोंदा दवरतलो.

‘काकोडा’ गावात वेताळ मंदिरासमोर एक पाषाणी दगडाचे लिंग आहे. या उपरोक्त मांडलेल्या कथेमागे एक कारण आहे. खूप वर्षांपूर्वी दसऱ्याच्या दिवशी घाडीवाडा गावातील एक घाड्याचा मुलगा दसरा पाहायला काकोडा गावात आला होता. त्याकाळी अवसराच्या वेळी एक अपघात घडला, त्या मुलाचा मृत्यू झाला. काकोडा गावात मेल्याने तो त्या गावातील लोकांना त्रास देऊ लागला. म्हणून गावातील लोकांनी वेताळ देवाला प्रसाद लावला, त्या मुलाने प्रसादात सांगितले की मी या गावात मेलो होतो. मला माझ्या गावातील लोकांनी माझ्या गावात नेल नाहीत, मला माझ्या गावात जायचे आहे. त्यामुळे वेताळ देवाने त्याला आपल्या बंदीत त्या लिंगाखाली ठेवले.

कारण तो खेत्री होता, परंतु देवाने त्याला वचन दिला की मी तुला वर्षातून एकदा दसऱ्याच्या दिवशी तुझ्या गावात घेऊन जाणार, एक रात्र गावात राहून पुन्हा तुला माझ्यासोबत इथे आणून या लिंगाखाली बंद करणार.

या कथेप्रमाणे दसऱ्याच्या दिवशी वेताळ देवाच्या मंदिराचा पुजारीवर अवसर येतो, आणि अवसराच्या भानात (भाराच्या नेटार) पुजारी 'घाडी आयले रे' म्हणतो, घाड्यांच्या लोकांनी 'हाय आयले' असे म्हणल्यावर पुजारी आपल्या हाताच्या लहान बोटान ते लिंग उभारून उलटे करतो, आणि त्या खेत्रीला त्याच्या गावात घेऊन जातो. ही परंपरा अजूनही दसऱ्याच्या दिवशी गावात चालू आहे.

### **४.१.११ श्री सिद्धदेव**

> 'सिद्धदेव' डोग्रारवर रावता. सिद्धदेव आणि वाघ्रेश्वर देवा मधी पटनाशिल्ले. वाघ्र्यान सिद्धदेवाक सांगले की तुका जे गाव लागता तेजी एक सायड आपुण पायता ( राखता). आनी दुसरी सायड तु राख. सिद्धदेव कशो आयकना जाल्लो. हाव इतलो वड. हंगा पयली सून आसा आनी तु माका सांगपी कोण. म्हण सिद्धदेवानं वाघ्र्याक वर सून सखल उडयलो. वाघ्रेश्वर मागीर सखल सोलये या गावानं रावलो, आणि सिद्धदेव वर रावून सगळ्याक राखपाक लागलो.

'कुडचडे' गावातील काकोडा 'माटीर' या उंच डोंगरावर 'सिद्ध' देवाचे मंदिर आहे. या डोंगराला 'सिद्धामाटी' म्हणतात. सिद्धदेव उंच डोंगरावर बसून सर्वांवर गावात लक्ष ठेवतो. या मंदिराच्या डाव्या बाजूला बाहेर वाघाची मूर्ती आहे. आणि बाहेर एका झाडाखाली ४-५ त्रिशूल आहे. ह्या देवाची पूजा गावातील गावकर, घाडी लोक करतात. शिवरात्रीच्या २-३ दिवसा अगोदर या देवाचा उत्सव असतो.

उपरोक्त मांडलेल्या कथेत सांगितल्याप्रमाणे वाघ्रेश्वर आणि सिद्ध देवाची वैरी होती. सिद्ध देवाने वाघ्रेश्वराला आपला गाव सांभाळायला दिला नाहीत, आणि त्याला डोंगराखाली फेकले. सिद्धदेव वर डोंगरावर राहतो आणि त्या डोंगरा खालच्या सोलय गावात वाघ्रेश्वराचे मंदिर आहे.

सिद्धदेवाच्या उत्सवावेळी वाघ्रेश्वराला त्याचा उत्सव साजरा करण्याचा आवाज येऊ नये आणि वाघ्रेश्वराच्या उत्सवाचा दिवस सिद्धदेवाला कळू नये. तसेच एकाच दिवशी सिद्ध आणि वाघ्रेश्वरच्या मंदिरात जाऊ नये असे गावातील लोक म्हणतात. सिद्धदेवाला वर्षातून एकदा गावातली लोक नारळ फोडतात, तसेच बाहेर असलेल्या वाघाच्या मुर्ती जवळ कोबंडा मारतात.

### ४.१.१२ वाटूबोंघाडी

'केपे' गावचे गावकराचे दोन भाव अशिल्ले. ते दोगाय शेल्ड्या वाटराक शिकार करपाक लगोन गेले. तेंच्या वांगडा तांचे एक सुणे आशिल्ले. ताका घेऊन ते दोगाय शिकरेक गेले. वायताना आरमा वेल्ली. एकलो भाव एका वाटेन गेलो आनी एकटो दुसऱ्या वाटेन गेलो. एकट्या भावक आवाज आयलो. थंय जनावर असचे म्हण तो थंय गेलो. आनी तेंणे गुळीं चलयली. तेंन्ना ताका बोवाळ मारलो आवाज आयलो. तो बेगीन बेगीन धावून थंय गेलो. जाल्यार तेणी आपल्या भावाक गूळी मारली. ते पयतगीर ताका आपल्यान अशे किदे केले. म्हण पंचाताप जालो. आनी ताणे आपल्यान स्वताक गूळी मारली. आनी आपुणही थंयत मेल्लो. तांचे सुणे ते सगळे पयता. आनी आपल्या मालका घरा येता.

तेंचो बायलो घराच्या भायर काम करता थंय वसोन ताका आपल्या बशेन सांगता. तेंची बायल हे गेले ते येऊन आनी तू हांगा कीदयाक येऊन बोवाळ मारता. अशे म्हण तेका रागान म्हणटा, की तुजो मालक गेला थंयच वासोन मोर गो.. ते सुणे धावून आपल्या मालक मेल्या जगयार येता आनी आपुण आपली तकली थंय आशिल्या एका फातराक मारून मरता. शिकार करपाक गेले आजून येऊन आनी सुणे भी येऊन म्हण बोवाळ जाता. गावचे लोकं सोदपाक वता. सोदित सोदित ते मेल्या जाग्यार पावता. तेन्ना सांकुन त्या जाग्यार तेंचे देवूळ बानले. दोगाय भावाचे एक आनी सायडीन ते सुणेचे एक देवूळ बनला.

'वाटूबोंघाडी' या कथेत सूण्याखेड्या प्रमाणे, एक वीर प्राण्याची आत्मा आणि दोन वीर पुरुषांची आत्माला दैवत्व प्राप्त झालेले दिसते. या कथेतील सांगितलेल्या दोन्ही भाऊच्या मंदिरा बाजूला त्यांच्या सुण्याचे मंदिर ही आहे. हे दोन्ही भाऊ गावातील लोकांना राखतात.

गावातील लोक असे म्हणतात की, रात्रीच्या वेळी हे दोन्ही भाऊ  हातात बंदूक घेऊन आणि त्यांच्यासोबती त्यांचे सुण्येही गावात फिरते. ह्या वाटूबोंघाडीला रोज गावातील गावकर वात पेटवतो. गावातील लोक त्याला वर्षातून एकदा 'रोट' घालतात. गावातील लोक राखणदार म्हणून त्याच्याकडे पाहतात. लोकांनी आपल्या कल्पनेतून निर्माण केलेल्या लोकदैवतात याचा समावेश होतो.

### ४.१.१३ महारांगणपुरव बेताळ

जेंन्ना बेताळची स्थापना गावान केली तेंन्ना बेताळ उबो जायना जालो. गावाच्या लोकांनी सगळे जाती लोक गावान आपयले. तरी बेताळ उबो जायना. म्हणतगिर लोकांनी चितलें. आता बेताळ कसो म्हण उबो जातलो काय? पयल्यार सगळे जाती लोकं गावान हाडले पुण म्हार(महार) जातीच्या लोकांक हाडूनाशिल्लो. मागीर लोकांनी एक महाराक आपयलो. त्या महारान देवळा फाटी एक बाय बाशेन फोण अशिल्लो त्या 'फोण' फुलांनी सजयल्लो आनी त्या फोणात एक केळयागड दवरलो. देवळा सायडीन रावपी एक ल्हान भूर्ग्यक खावपाक दिता म्हण भुलोन आपयलो, आनी ते फोणात देवयलो. तो भुरगो केळी खात उरलो. वरसून माती घातली आनी ताका पुरयलो. त्या भुर्ग्या बळी बेताळक दिली. आनी मागीर बेताळ उबो जालो.

वेताळ देवाची मूर्ती जेव्हा गावात आणली तेव्हा त्याला स्थापित करण्याच्या वेळी वेताळदेव कसाच उभा राहिना, त्यावेळी गावातील लोकांनी सर्व जातीच्या लोकांना बोलावले, पण महार जातीच्या लोकांना बोलवले नाही. ज्यांना बोलावले होते, त्यांच्याकडूनही देव उभा होत नाही म्हटल्यावर महार या जातीला गावात आणले. त्या महाराने मंदिरामागे एक विहिरी सारखी जागा होती ती जागा फुलाने सजवली, त्यात एक केळीचा गडाय ठेवला.

मंदिरा बाजूच्या घरातील एक लहान मुलाला फसवून आणले, आणि त्या मुलाला विहिरी खाली उतरविले. तो मुलगा केळी खात राहिला, त्या मुलावरून माती घालून त्याला पुरविले. त्या मुलाची बळी दिल्यावर वेताळदेव उभा राहिला. त्या जागेला महारांगण म्हणतात. त्या महारांगणाला महार जातीचे लोक आपला देव मानतात. महार

जातीच्या मुलीनी लग्नाच्या दिवशी घरातून एकच दिवशी महरांगणात वात पेटवायची असते. गावातील लोकांना त्या ठिकाणी जाण्यास बंदी आहे.

**४.१.१४ लिंगदेव**

> जल्मी, समुलवाडी, आनी लिंगवाडी हे तीन भाव. जल्मी हो पयली काकोडा गावानं आयलो. मागिर लिंगदेवाक जल्मीन उजगाव सून माडाच्या चुट्टी काडून धवी विराची शेंद्री करता ते शेंद्रेत घालुन, त्या शेंद्रेची तीन गडी केली आनी लीपोन खाक्यान घालून हाडलेले. म्हण शेपल्या माडा शेंद्रेचेर गावान कोण निदना आणि गावानं ही शिंद्री कोण वापरना. जर त्या शेंद्रेचेर कोण निदलो जाल्यार त्या व्यक्तीचे पाय वयर आणि तकली सखल जाता.

जल्मी, समूलवाडी आणि लिंगवाडी हे तीन भाऊ होते. त्यांच्यामध्ये पटत नसेल. जल्मी हा पूर्वीपासून गावात होता. लिंगदेवाला तिस्क उजगाव या गावातून जल्मीने शेपल्या माडा शेंद्रेत घालून (माडाच्या चुट्टी काढून तयार केलेली शेंद्री), ती खाक्यात धरून काकोडा या गावात आणले होते.

या गावात या शेंद्रेवर कोणही झोपत नाहीत, जर गावात शेपल्या माडा शेंद्रेवर कोणी झोपला तर त्याचे पाय वर आणि डोके खाली होते.

### ४.१.१५ कातर्शीम्हारू

कातर्शीम्हारू हो पुरुषम्हारू बाशेन तेंजोच एक अवतार असो. पयली सून कुडचडे पुरुषम्हारू राखतालो. तो रातीन भोवतालो. भोवताना तो काकुमडड्डी या शेतामधी बसतालो. आनी मागीर सीमा राखपाक वातालो. एक जाणटेल्यान थंय ताका पयले दुसरे दिसासून या वाटारान देव दिसपा लागलो. हातानं मुतारी आनी कांबळ घेऊन भोवतालो. गावान देव भोवता म्हण लोकांनी प्रसाद घेतलो. आनी प्रसादाचेर सांगले. हो वाटर राखणदेव राखता. तशे त्या जाग्यार दत्ताचो बी वास (स्थान) आसा. या जाग्यार पिंपळाचे झाडाक ३ फाके फुटलेले आसा. आनी ते ३ खांदे म्हणल्यार दत्ता. या झाडाकडे राखणदार बसता. लोकांनी येऊन पयल्यार असे झाड खरे थंय आशिल्ले. आनी सायदिन एक मोठो फातोर उबो आशिल्लो तेंन्नासून लोकांक कळे की राखणदार हांगा आसा. काकोडा – शेल्डे या सीमेर भोवता.

चंद्रेश्वर भूतनाथाचा एक गण म्हणजे पुरुषम्हारु. या पुरुषम्हारुचा अवतार म्हणजे कातर्शीम्हारू. पुरुषम्हारु हा राखणदार कुडचडे गाव राखणारा. तो फिरत असताना का ठिकाणी बसला. दुसऱ्या दिवसापासून गावातील लोकांना या जागेवर राखणेदार फिरताना दिसू लागला. हातात मुतारी, आणि काळा रंग असे या राखणदाराचे स्वरूप होते.

गावातील लोकांनी चंद्रेश्वराला प्रसाद लावला. प्रसादावर देवाने सांगितले की, त्या जागेवर दत्ताचा वास आहे. पिंपळाच्या झाडाला तीन फाके फुटलेले आहे. या झाडा समोर एक मोठा पाषाणी दगड आहेत, त्या दगडावर कातर्शीम्हारू राखणदार राहतो. ककोडा- शेल्डे या गावात हा राखणदार फिरतात. या राखणराचा उत्सव दत्त जयंती दिवशी साजरा करतात. या ऐवजी गावातील लोक वर्षातून एक ‘रोट’ देवाला घालतात.

४.१.१६ खान्सीदेवी (काकोडा)

| |
|---|
| पयली हो गाव सगळो बुडलेलो. तेंन्ना गांवच्या लोकांनी वऱ्हा शेळवणसून या देवीक हाडपाचे ठरायले. पुण देवीन सांगले की हाव येतली तुमच्या गावान आणि तुमचो गांव वाचयतली. पुण गावच्या लोकांनी म्हाका प्रसन्न करपाक लागून १२ वर्स सखल आशिल्ले. एक जोडपे वडल्या सुदर्शनाच्या भशेन पलंगाचेर न्हिदयले व्हड्याचेर सांगोडो करुन त्या जोडप्याक पलंगा सकट उदकान सोडपाचे. गांवच्या लोकांनी अशे केले आनी देवीक गावान हाडले. ही देवी एक झाडासकल रावली. |

**४.१.१७ खान्सीदेवी (काकोडा)**

| |
|---|
| खान्सीदेवीकडे खूब भांगर आसताले. कानाची कर्ण, बाजूबंद, गळसरी सगळे आशिल्ले. आनी लोक देवीसागून घेतली आपले कसले काम जाले जाल्यार देवीक कसली भांगराची वस्त दिताले म्हण. एक जाणटेल्यान तिका आपले काम सांगले आनी भांगर दिवपाचे वेळार सगळे भांगार दिले. पुण एक गळसरी आपल्याकडे दवरली. देविक राग आयलो आनी तिजो भांगरान भरलेलो करंडो तिणे पाय मारून सगळया उडयलो. तेंन्नासून ते जाणटेल्या घराण्याक भांगर उरना . आयले जाल्यार बी वाता. |

खान्सीदेवी देवीच्या दोन कथा मांडलेल्या आहे. क्रमांक १६ आणि १७. या कथेत सांगितल्याप्रमाणे खूप वर्षांपूर्वी ‘काकोडा’ हा गाव बुडलेला होता. त्यावेळी गावातील लोकांनी शेळवण गावातून खान्सीदेवीला ‘काकोडा’ या गावात आणले व देवीची सेवा केली. देवीला मन म्हणून १२ वर्षाखालचे लहान लग्न झालेले जोडपे, एका सुदर्शन चक्रासारख्या पलंगावर जोपलेले असताना त्यांना पाण्यात सोडले. हे केल्यावर देवी गावात येऊन राहिली आणि गावावर आलेले संकट दूर झाले.

खान्सीदेवी देवीची मूर्ती एका झाडाखाली होती. त्या मूर्तीचे रक्षण करण्यासाठी एक सापही त्या जागेवर असायचा आणि अजूनही दिसतो. या देवीला सोन्याच्या दागिन्यांचा मान दिला जायचा. पूर्वी गावातील लोक

देवीला आपली इच्छा सांगत,  ती इच्छा पूर्ण झाल्यावर तिला सोन्याचे दागिने दिले जायचे. असेच एका वयस्कर माणसाने देवीला सांगितले होते की आपले अमुक काम झाल्यावर तो देवीला सोन्याने बनलेला करंडा देणार. त्या माणसाचे सांगितलेले काम झाल्यावर, त्याने देवीला सोन्याने भरलेला करंडा दिला, पण देताना एक गळसरी आपल्याकडे ठेवली. देवीला त्याचा राग आला. देवीने सोन्याने भरलेला करंडा बाहेर फेकला. त्या दिवसापासून त्या माणसाच्या घरात सोन्याचे दागिने राहत नाही. आता देवीला सोन्याच्या दागिन्याऐवजी खण, फणी, सिंदूर, काजळ हे श्रृंगार अशा वस्तू सात सुपल्यात ठेवून, ते सुपल्या केळीच्या पानावर ठेवून पाण्यात सोडतात. परंपरेने चालत आलेली ही विधी गावातील लोक एप्रिल महिन्याच्या शेवटच्या दिवसात करतात.

### ४.१.१८ श्री चंद्रेश्वर भूतनाथ आणि पुरुषम्हारु

दूधसागरान सगळे देवचारक आपल्या बर्थडे आपयले. चंद्रेश्वर भूतनाथ म्हणपाक लागलो की हेचे बर्थडे आमी वसपाचे. सगळे देवचार बर्थडेक वसपाक भायर सरले. चंद्रेश्वर भूतनाथान पुरुषम्हारूक सांगले आमी मागीर या. हांका सगळे देवचारक वसू पयली. सगळे देवचार बर्थडेक पावले. हे दोगाय येवून म्हण, दूधसागर वाट पोवपाक लागलो. पुण हे येवकच ना. सगळे जेवण काबार जावपाक पावले, तरी हे येना. आयल्ले ते देवचार वसपाक पायली दूधसागरान आडवो फातर लायलो आनी आयिल्ले सगळे देवचारक आपल्याकडे बंद करून दवरले. सगळे देवचार दूधसागराकडेन उरले. जर चंद्रेश्वर भूतनाथ आनी पुरुषम्हारू बी गेल्ले जाल्यार दूधसागर हांका बी बंद करताशिल्लो.

श्री चंद्रेश्वर भूतनाथ आणि पुरुषम्हारुची ही कथा मनोरंजनपर अशी आहे. या कथेत तीन राखणदार आलेले आहेत. दूधसागराचा राखणदार हा आपल्या वाढदिवसाच्या दिवशी सर्व राखणदारांना भोजनासाठी आपल्याकडे बोलावतो. सगळे राखणदार वाढदिवसाला जायला लागले. परंतु चंद्रेश्वराने पुरुषम्हारुला थांबवले आणि सांगितले की या सर्व दैवतांना आधी जाऊन येऊ, आम्ही नंतर जाऊया. सर्व राखणदार वाढदिवसाला पोहोचले. दूधसागर चंद्रेश्वर भूतनाथ आणि पुरुषम्हारुची वाट पाहत होता. हे अजून आले नाहीत आणि जेवण संपत आले, आता जेवण

संपल्यावर सर्व आलेले राखणदार परत जाणार म्हणून दूधसागराने मोठा दगड लावून परत जाण्याची वाट बंद केली. सर्व राखणदारांना आपल्या बंदीत ठेवून त्यांच्यावर तो उभा राहिला. सर्व राखणदार आपल्या बंदीत असल्यामुळे दूधसागर सर्वात श्रेष्ठ बनला. जर चंद्रेश्वर आणि पुरुषम्हारु ही त्यांच्याकडे गेले असते तर दूधसागराने त्यांना ही बंदी केले असते.

**४.१.१९ श्री ब्रह्मा**

साडे ३०० वर्सापूर्वी नाडकर्णी म्हण हांगा रावताले. आनी त्या टायमावर ब्राह्मणाली मुंज म्हण जाताली, आता लेगीत जाता. मुंजीबंधना वेळा गावांना आशिल्या, पेडार मामान भाच्याक थंय वरून चल्ली दितलो म्हण वचन दिवपाक पडतालो. तशे नाडकर्णीच्या दोन भुर्ग्याची मुंज आशिल्ले. सगळे विधी जातगिर, भुर्ग्याक पेडर वरपा वेळा मामा येवूना. मामा किदे काम आयले म्हण लेट जालो. ते भुर्ग्याक वरून पेडर दवरले, आणि मामा वाट पावपाक लागले. मामा येवकचना म्हणतगिर आयले लोक घरा गेल्ले, ते भुर्गे थंय मामा वाट पयत पेडार रावले. खुब वेळ जालो म्हण लोक आनी घराचे लोक भुरग्याक हाडपक गेले. पेडार गेल्यार दोनी भुर्गे ना जाले, म्हण लोका बोवाळ जालो. देवाकडे प्रसाद लायतगिर प्रसादाचेर तेंमी सांगले की आमी हांगा आसा गावाच्या लोका आमी राखतले. आमका या पेडार दोन ब्राह्मण भुरगे जोवोपाक पडतले.

‘बाळ्ळी मठ’ या गावात नाडकर्णी म्हणून राहत होते. त्यांच्या मुलांची मुंज होती. मुंजीबंधनाच्या वेळी मुलांना गावातील पेडावर घेऊन जायचे आणि नंतर त्यांच्या मामाने त्याला तिथे येऊन लग्नासाठी मुलगी देणार असा वचन दिला जायचा. या मुलांच्या मुंजीबंधना वेळी या मुलांनाही पेडावर घेऊन गेले, पण त्यांचा मामा आलाच नाही. ते दोन्ही मुलं त्या पेडावरून हरवले. घरातील लोकांनी त्यांना खूप शोधले, पण ते मिळाले नाहीत. देवाला प्रसाद लावल्यावर, प्रसादात देवाने सांगितले की आम्ही या पेडावर राहणार आणि गावाची राखण करणार. त्यांना मान म्हणून नवरात्राच्या दिवसात दोन ब्राह्मण मुलांना या पेडावर आणून भोजन वाढायचे. या राखण्याला ‘श्री ब्रह्मा’

म्हणतात. गावातील लोक दर बुधवारी आणि शनिवारी त्याला नारळ फोडतात. गावातील लोक या दैवताला सांगितलेले काम झाले तर त्याला पाच नारळाची पंचखाद्य आणि गोभ्यांची पूजा घालतात.

**४.१.२० सतीदेवी (आंबावली)**

सतीदेवी ही तवडकरांची दुव. तिका आंबावली गावान लग्न करून दिलेले. तिजो घोव मातशो मस्ती आशिल्लो. एक दिस गावच्या चार मनश्या वांगडा तो शिकारे गेलो. शिकारे गेल्याकडे तेका थंय मारून उडयलो. तिच्या नवऱ्या वांगडा तेंचे सुणे गेल्ले. हे सगळे पयतगीर ते सुणे घरा सतीदेवीक सांगपा येताले. पुण ते घरा पावचे पयली वाटेर मेल्ले. ही सतीदेवी आपल्या बागेन आबोल्या फुला कडताली.

गावान अपघात जालो. म्हणतगिर गावचो लोक उल्लो लागले. ते सतीदेवी कानार पडले. पुण कोण तिका सारखे सांगाना. हो गेलो आजून येवूना. पयली घोव नाशिल्या बायलेकडे वाईट नजरेने पयताले. आपले घोव येन्ना आनी कोण माका काय सांग बी ना म्हण, एक खण आशिल्ली थंय लाकडा एकटेन केली आनी उजो पेटयलो. आनी त्या उज्यान उडी घेतली. मागीर थोडे वर्सन थंय रयण आयली त्या रयण सून एक पाषाणी मुर्ती उत्पन्न झाली. त्या मूर्तीचेर सतीदेवी आणि तीजो घोव आशिल्लो.

'आंबावली' गावात सतीदेवीचे मंदिर आहे. ही सतीदेवी तवडकरांची मुलंगी होती. तिला 'आंबावली' गावात लग्न करून दिले होते. तिचा नवरा मस्ती होता. तो शिकारीला गेल्यावेळी त्याला त्यांच्यासोबत गेलेल्या साथीदारांनी मारले. आपला नवरा येत नाही. गावात कोणालाही विचारले तर ते ही काही सांगत नाहीत. पूर्वी नवरा नसलेल्या स्त्रियांना वाईट नजरेने पाहिले जायचे. आपल्यावर अशी वेळ येऊ नये म्हणून सतीदेवीने जवळ असलेल्या खाणीवर लाकडे जमवून आग लावली आणि त्यात तिने उडी मारली.

काही वर्षांनी त्या जागेवर वारूळ आले आणि वारुळातून एक पाषाणी मूर्ती उत्पन्न झाली. त्या मंदिरात स्त्रीचे म्हणजे सतीदेवी, एक पुरुष म्हणजे तिचा नवरा आणि एक हाताचे चित्र पाषाणी दगडावर आहे. या देवीला आबोलीची फुले आवडतात. गावातील गावकर देवीची पूजा करतो. रविवार हा या देवीचा दिवस आहे.

**४.१.२१ श्री भूतकाका प्रसन्न**

पयली लोक चलत वताले चलत येताले. लोकांकडे गाडी नाशिल्ली. रस्ते, लाईट भी नाशिल्ली. लोक जेंन्ना फातर्पे जात्रेक वताले तेंन्ना या वाटेर भूता आसताली. ती लोकांक पळोन हासताली. तेंन्ना लोक तेंका मागीर थंय खावपा दवरताले. पयली लोकांकडे पैसे बी चड नाशिल्ले. ताका लागून कोणाच्यान खावपा बी दवरपाक जायनाशिल्ले ते लोक झाडा ताळो भी तोडून दवरताले. ऊसके ताळो भी. मागीर लोक तांका भूतभूत करुन भूतकाका म्हणपाक लागली. किद्याक ते भूत लोकांक काय करनाशिल्ले, फक्त हासताले. मागिर लोक जात्रेक वता तेंन्ना हे भूतकाका मान म्हण किदे खावपा दवरपाक लागली. तांका वात बी लावपाक लागली.

पूर्वीच्या काळी रस्त्यावर लाईट नव्हती. लोकांकडे गाड्या ही नव्हत्या. लोकांना कुठेही जायचे झाले तर ते चालत जायचे आणि चालत यायचे. फातर्पेच्या रस्त्यावरुन जाताना एक जागा आहे. त्या जागेवर या भूतकाकाचे ठिकाण आहे.

पूर्वी लोकांकडे पैसे जास्त नसायचे, पूर्वी लोक त्यांना 'ऊसके पाना' ठेवत होती. आता त्यांना खाजे, लाडू ठेवतात. त्यावेळी या जागेवर जे भूत असायचे ते येण्या-जाणाऱ्या लोकांना हसत होते. या भूतकाकाला रोज वात पेटवतात. तसेच 'रोट' घालतात.

### ४.१.२२ पुरुषम्हारु

पयली एक जाणटेल्या भास जालो. की या वाटरान किदे तरी देवाशक्ती असा म्हण. तो जाणटेलो आता असा ते पुरुषम्हारू देवळाकडे थंय पयली काय नाशिल्ले. त्या जाग्यार हो जाणटेलो गोविंददेव फुला बी दवरून पूजा करतालो. तो पूजा करता त्या जाग्यार सावरीचे झाड आनी चून्ही झाड आशिल्ले. या झाडामुळा देव रावतालो अशे लोक म्हणतात. चून्ही झाडाकडे भुत- प्रेत असता तांका आपले फाटी दवरून देव गावालोकांची रक्षा करतालो.

### ४.१.२३ पुरुषम्हारु

पयली लोकांक देव दिसतालो. पुण आताच्या काळा देव चड दिसनाशिल्लो. पुण गेल्या काही वर्सान एकलों या गावानं ढांगी म्हण घर कडून आशिल्लो. तो राती उदक पिवपाक लागून उटलेलो. उदक पिता तेंन्ना तांका आपल्या घराच्या जनेलातल्यान एक वाढली काळी सावली दिसली. कोण काय म्हण पवपाक गेल्यार, त्या सावले हातीन मशाल आणि एक हातीन बडी आशिल्ली. सकाळी उटून देवूळाक गेलो. देवूळा आशिल्या लोकांक सांगले कि अशे अशे काल माझ्यावांगडा जाले. माका देव दिसलो. आपली किदे चूक भी जाल्या असत म्हण चूक मागपाक देवूळाक हाव आयला. लोकांनी सांगले तू प्रसाद गे आनी पय. प्रसादाचेर कळे की देव तांका दुसरे गावानं वसनाका म्हण सांगतालो. ते मनशान दुसरेकडे घर काडलेले आसता, तो जागो पाडेलो आसता. म्हण देव तांका वसनाका म्हण सांगतालो. तेजी राखण करतलो.

### ४.१.२४ पुरूषम्हारु

जेंन्ना पुरुषम्हारू देवळाचे बांधकाम सुरू केल्ले तेंन्ना गावाच्या लोकाकडे चढ पैसे नाशिल्ले. पुण लोकांनी देवळाचे काम करपाचे ठरायले. दोन महिने जाले देवळाचे कायच काम जायना जाले. आडमेळ येवपाक लागली. म्हण गावच्या लोकांनी चंद्रेश्वर पर्वतार वसून प्रसाद घेतलो. प्रसादाचेर सांगले की त्या जाग्याच्या पयली राखणदारक मान देवूना. राखणदारक मान म्हणल्यावर पुरुषम्हारू देवूळ नदीच्या काठाचेर आसा, नदीच्या दुसऱ्या सायडिक कुड्डू आजो हो राखणदार आसा. त्या देवाक बी मान दीवपाक जाय. तशे म्हणतगिर लोकांनी देवळाच्या सायडीन एक नाल कुड्डूआज्याक मान दवरलो, आणि देवूळ बंदपाक सुरू केले.

देवूळ बंदपाक पैसे नाशिल्ले, पुण लोक आपण जाऊन मदत करपाक योवपा लागले. देवाची मूर्ती करपाक, फातोर मेळना झालो. आपण जाऊन एक मूर्तिकार फुडें येवून मूर्ती करून देता म्हण सांगले. मूर्ती तयार झाली, देवळाच्या मूर्ती प्रतिष्ठापनेदिस मूर्ती उबारपाक भरपूर लोक लागले. १५-२० लोकांच्यान सुद्धा मूर्ती उबारपक जायना झाली. देवळाच्या दारा मूर्ती पावतोगीर, दोन भुरग्यानी ती मूर्ती उबारली आणि वरून स्थापन केली. जी मूर्ती १५-२० लोक उभारपक शकनाशिल्ले ती मूर्ती दोन भुरग्यानी उभारली. हो देवाचं चमत्कारच.

पुरुषम्हारु या दैवताच्या तीन कथा सांगितल्या आहे. कथा क्रमांक २३ आणि २४ या कथेत पुरुषम्हारु दैवताची महिमा सांगणारी कथा आहे. या कथांतून गावातील लोकांना पुरुषम्हारु या दैवताचे साक्षात्कार कसे झाले, पुरुषम्हारु आपल्या गावातील लोकांचे कसे रक्षण करतो हे सांगितलेले आहे. गावात ढांगी नावाच्या माणसाला गाव सोडून जाऊ नये, त्याचे रक्षण करण्यासाठी मी गावात आहे. हे पहिल्या कथेतून सांगितले आहे. तसेच मंदिर बांधताना पैसे नसले तरी दैवतावर असलेली लोकांची श्रद्धा या भावनेतून मंदिर बांधण्यास लोकांनी केलेली मदत, १५-२० लोकांकडून न उचलणारी देवाची मूर्ती दोन मुलांनी मंदिराच्या आत नेली; ही सर्व देवाची महिमा या कथातून मांडलेली आहे.

पुरुषम्हारु मंदिराच्या बाहेर येताना कुड्या आजोबाच्या घुमटीवर भक्तांची नजर पडते. पुरुषम्हारुदैवताला गावातील लोक 'रोट' घालतात. तांदळाच्या पिठाची भाकरी देवासाठी असते, त्यावर घालणारा (सोरो) मद

दैवताच्या मागे असणाऱ्या भूत प्रेत, खेत्री यांच्यासाठी असतो. पुरुषम्हारु दैवताला बुधवार आणि रविवार (आयतार) नारळ फोडतात. एका हातात मुतारी, दुसऱ्या हातात मशाल, पायात वाळे आणि काळा रंग असे ह्या दैवताचे वर्णन गावातील लोक करतात.

### ४.१.२५ वज्रेश्वर आणि कुनेश्वर

वज्रेश्वर देवाचो शिवरात्री दिसा वर्धापन आसता. शिवरात्री पयली देवळाक सप्राथन वाढतात. शिवरात्री दिसा हांगा अभिषेक आसता. देवळा फाटल्यान आशिल्या तळेचेर १३ नवीन लग्न झालेल्या नवदांपत्य आसता तांका गाठवळ म्हण बांधतात. आणि वडाचे पाच फेरे मारता. ह्याचे उद्दिष्ट म्हणल्याल, पयली काळा आख्यायिके अशे असा की १३ व्होर मारलेले (कत्तल केले). आता जशी लग्ना जातात तशी पयली जायनाशिल्ली. गावान जर १३ लग्ना असा, १५ असा, २२ असा, जाल्यार वांगडा लग्न करताली. तसे त्या वर्सा बी तेरा लग्न जाली. घरा परत येता त्यांना तांका मारलेले. त्यांचो श्राप पडपाक नाका म्हण, १३ नवदंपत्य शिवरात्री दिस गाठवळ बांधून, वडा पाच फेरे घेवून तांका त्यांचो मान देतात. कुनेश्वरा देवळा ह्या राखणदारा बरोबर नववरवधू, वाजंत्री अशी जेंका मारलेले त्यांची बी पाषाणी मुर्ती असा.

बाळ्ळी गावात वज्रेश्वर आणि कुनेश्वराचे मंदिर आहे. या मंदिरात शिवरात्रीच्या दिवशी अभिषेक असतो. वज्रेश्वराच्या मंदिरामागे असलेल्या तळयावर १३ नवीन लग्न झालेले नवदांपत्यांचे गाठवळ बांधतात, आणि वडाच्या झाडाचे पाच फेरे घेतात. याचे उद्दिष्ट म्हणजे पूर्वीच्या काळात १३ व्होराना या जागेवर मारले होते (कत्तल केले). त्यांचा शाप गावावर पडू नये म्हणून शिवरात्रीच्या दिवशी १३ नवदंपत्याना ही विधी करायला लावतात.

या मंदिराच्या बाजूला असलेला कुनेश्वर राखणदार वज्रेश्वर मंदिराच्या मागच्या तळयातील तीर्थाचे राखण करतो, कारण चंद्रेश्वर भूतनाथ ते तीर्थ घेण्याचा प्रयत्न करत असतो. कुनेश्वराच्या मंदिरात १३ व्होराची पाषाणी दगडावर चित्र असलेल्या मुर्त्या आहे. या कुनेश्वर दैवताला गावातील लोक 'रोट' घालतात.

### ४.१.२६ फळ शिलाहार शांतादुर्गा

'बाळ्ळी' या गावाक पयली लोक रावताले, ते सगळे पयली सातेरी शांतादुर्गा देवी देवस्थान असा थंय सेटल आशिल्ले. ४०० वर्सपयली गावान रोगराई ( देवी) आयल्ली. त्या टायमावर असे रोगराई बी येवप म्हणल्यार, सगलो गाव काबार जातालो. म्हण या गावचे लोक सगळे गाव सोडून वेगवेगळयाकडे गेले. ज्या जाग्याचेर नदी लागी असा थंय हे लोक सेटल जाले. तशा काही लोक बाळ्ळी मठ म्हणतात ह्या जाग्यार रावले.

ह्या जागेचेर येताना सगळी जातीचे लोक या वाटारा येल्ले. लोकांक भिरा दिसली, की आम्ही आयली पण आमची रक्षाकरपी देवी आमच्च्यावांगडा ना. देवी थंयच उरली. म्हण थोडे लोक देवीकडे गेले. देवीन सांगले. आपले नावन एक श्रीफळ तुमी वरा आणि तांजी पूजा करा. आपुण तुमका राखतली. देविन सांगितल्याप्रमाणे लोकांनी देवळासून हाडील्या श्रीफळाची पूजा केली. बारा जातीचे लोक या गावात आशिल्ले, म्हणतगिर या श्रीफळाची पूजा बारावी जातीचे लोक करतात.

'बाळ्ळी' गावातील लोक रोगराईमुळे पूर्ण गाव सोडून गेले होते. नंतर हे लोक नदी जवळील 'बाळ्ळी मठ' या गावात राहिले. परंतु देवीला आपल्यासोबत आणले नाही, त्यामुळे गावातील लोकांवर देवीची कृपा सदैव असावी यासाठी गावातील लोक श्री शांतादुर्गा देवीकडे गेले आणि तिला आपल्या सोबत येण्यास सांगितले.

देवीने आपल्या चरणात अर्पण केलेला एक श्रीफळ घेऊन जा आणि त्याची पूजा करा असे सांगितले. देवीने सांगितल्याप्रमाणे गावातील लोक ते श्रीफळ घेऊन 'बाळ्ळी मठ' ह्या गावात आले आणि देवीची पूजा करू लागलो. या कथेतून असे समजते की माणूस कुठेही गेला तरी त्याची भक्ती, श्रद्धा जात नाही, आणि दैवतही त्यांची साथ सोडत नाही. या देवीचा मोठा उत्सव म्हणजे गड्यांची जत्रा होय.

### ४.१.२७ सासरकान सातेरी

'बाळ्ळी' गावाचे शांतादुर्गा देवीचे महाजन पयली खड्डे गावान जात्रेक वताले. पयली लोकांची परिस्थिती प्रमाण जेवण खाण घालप शक्य नाशिल्ले. म्हण खड्डे गावाच्या लोकांनी ह्या जात्रे गेल्या महाजनाक देवी जात्रा आज नी फाल्या, म्हण सांगले. म्हणतगिर जात्रेत गेल्ले लोक नाल घेऊन परत येवपाक लागले. हे लोक वतगिर, तेंच्या फाटी खड्डे गावची लोकांनी देवीची जत्रा केली. हे जेंन्ना महाजनांक कळे तेंन्ना तेमी खड्डे गावासून देवीची मूर्ती उभारून हाडली. देवीची बसकी थंयच उरली. मूर्तीच घेऊन येवपाक लागले, येता तेंन्ना लोकांनी व्हेले नाल पावूला पावूल फोडत देविक हाडपा लागले. नाल काबार जातगिर रानातली फळा हाडली. देवी देवळा पावचे पयली, देवीन सकल स्थान घेतलो. देवी मूर्ती कशीच उठना झाली. असे म्हणतगिर लोकांनी देवीक सांगले, वर्सां एकदा देविक फाटले आणि फुडले दितले. किदे फाटले आणि फुडले ते सांगूना.

त्या नेटार देवी उठली. देवा वर्तगीर देवीन आपल्या रगत मागले. देवी हाडिल्या एकही मनिस फुडें येवूना. वेळपान आपलो अंगठो कापलो आणि देवी बसकेर रगत दिले, आनी देवीची स्थापना केली. जात्रेक गडे लावून पयले २ गडे शांतादुर्गा देवीचे आणि दोन ल्हान गडे सातेरी देवी म्हणजे सासरकान्न देवीक. ह्या ल्हान भुरग्याच्या पोटा आणि फाटी सुई तोपून दागो काडता. हो दागो देवी अर्पण करता. ही या भुर्ग्याची मुंज आसता.

सासरकान देवीला खड्डे गावातून शांतादुर्गा देवीच्या महाजनाने आणले होते. सासरकान देवी म्हणजे सातेरी. या देवीला खड्डे गावातून बाळ्ळी गावात आणत असताना, पावलो पावली श्रीफळ फोडत देवीला आणले जायचे, नारळ संपल्यावर रानातील फळे आणू लागले. बाळ्ळी गावात पोहचताना, अर्ध रस्त्यावर देवीने बसका घेतली. त्या जागेवरून देवी उठत नाही म्हणून लोकांनी देवीला ‘फुडले आणि फाटले’ देणार असे सांगितले. हे ऐकून देवी उठली. मंदिरात पोहचल्यावर मंदिरात देवीला स्थापित करण्याच्यावेळी देवीने रक्त मागले, त्यावेळी देवीला आणणारा एकही व्यक्ती पुढे आला नाही. वेळीप जातीच्या एका व्यक्तीने आपल्या हाताचा अंगठा कापून देवीच्या बस्केवर रक्त दिले. रक्त दिल्यावर देवीने आपली स्थान घेतली. या देवीला ‘फुडले आणि फाटले’ देणार म्हणजे

मुलगा वयात येण्याच्या आधी, त्याच्या कण्याच्या दोन्ही बाजूच्या चामडीतून सुई टोचून धागा ओवतात. याला गडा 'डोचणे' म्हणतात. या गडे उत्सवाला मोठा गडा हा श्री शांतादुर्गा देवीला, आणि लहान गडा सासरकान देवीला मान असतो.

### ४.१.२८ दत्तमंदिर (केपे)

१९६२ साला गोव्याचेर अष्टग्रही म्हण योग आशिल्लो ( वाईट योग). तेंन्ना गावचे मुखेल ४-५ जाण गांगापूर वताले. थंय वसून सेवा करताले. अष्टग्रही योग आयले कारणानं त्या वर्स ते वसुक पावूना, म्हण हे ४-५ जाण आमोणे वामन जोशी भट्टाकडे गेले. भट्टजीन सांगले गांगापूर जात्रोत्सव ही तीथ दरून गुरुचरित्रसप्ताह वाचया. केपे चंद्रेश्वर हॉलान गुरुचरित्रसप्ताह वाचपाक सुरु केलो. थंय हो सप्ताह दहा वर्ष चल्लो. मागीर चंद्रेश्वर भूतनाथ कमिटी या सप्ताहचेर ऑब्जेक्शन हाडलो. म्हणतगिर गावचे लोक एकटेन जावून डॉक्टर दयानंद बांदोडकर यांच्याकडे गेले. तांका सांगून मंदिर बांधपाक जागो सोडपाक लागले. थोड्या लोकांनी शेतान देऊळ बांधया सांगले, पुण आता आशिल्या दत्त मंदिरा जाग्यार पयली मायनिंग आशिली हो जागो मंगेश शेटकरकडेसून विकत घेतली आणि देवूळ बानले. दत्त मंदिराच शीलान्यास भाऊसाहेबच्या हातात बसयलेलो.

'केपे' परिसरातील कुशावती नदीच्या कठावर 'दत्त मंदिर' आहे. या दत्त मंदिराची स्थापना गावातील लोकांनी केली. पूर्वी गावातील काही लोक 'गांगापूरला' जायचे. तिथे जाऊन देवाची सेवा करीत, गुरुचरित्र वाचत असत. १९६२ साली गोव्यावर 'अष्टग्रही' योग (वाईट योग) असल्याने ह्या लोकांना गांगापूरला जायला मिळाले नाही. त्यामुळे गावातील लोकांनी वामन जोशी भट्टाना विचारून देवाची पूजा चंद्रेश्वर हॉलमध्ये करायचे ठरवले. काही वर्षांनंतर चंद्रेश्वर देवस्थानाच्या कमिटीतील लोकांनी असा कार्यक्रम (गुरुचरित्रसप्ताह) इथे करू नये असे म्हटल्यावर, गावातील लोक दयानंद बांदोडकराकडे गेले. भाऊसाहेबांनी मंदिर बांधण्यास लोकांना मदत केली. मंगेश शेटकर यांची कुशावती नदीच्या बाजूला असलेली जागा विकत घेतली. (या जागेवर पूर्वी मायनिंग काढत होते.) दत्त मंदिराच्या 'शिलान्यासची' स्थापना भाऊसाहेबांच्या हाताने केली. विठ्ठल नाईक, रामचंद्र शेटकर, वामन

गवणे, रखमाजी मंगेश शेटकर या काही गावातील लोकांनी देऊळ बांधण्यास मदत केली. या दत्त मंदिराच्या बाजूला हनुमानाचे मंदिर आहे. या मंदिरासमोर पूर्वी ‘काऱ्याचे’ म्हणून झाड होते. ते झाड काढून त्या ठिकाणी औदुंबर लावला आहे.

### ४.१.२९ श्री नागनाथ (मळकर्णे)

> ‘मळकर्णे’ गावान कानडी लोक कामधांदो करपाक आयले. त्या लोकांनी सगळो गाव आपल्या हातीक घेतलो. त्यावेळा जलम्या लोकांनी ‘शेण्या उजो’ साजरा करपाक सुरू केलो. थोडेवर्सानी या जल्मी लोकांचो वंश काबार जालो. त्या वंशाची एकच बायल उरलेली आनी तिका भूर्गो जावपाक आशिल्लो. ती बायल बरी नाशिल्ली म्हण आपल्या भावागेर वताली. वता तेंन्ना तिका वाटेर भुर्गो जाता. ती त्या भुर्ग्यक झाडासखल दवरले. आनी आपल्या भावाक त्या भुर्ग्याक वरपाक आपयता.
>
> खूब वर्सानी भूर्गो वड जातगिर ‘शेण्या उजो’ पावपाक ‘मळकर्णे’गावानं येता. त्या वर्सा गावच्या लोकाकडे सुन विधीची माडी उबारना म्हणतगिर एक्लो म्हणत कोण जम्लीचो वंशाचो असा हांगा जाल्यार यो आनी कर ही विधी. अशे म्हणतगिर ह्या चल्याचेर भार येता आनी भार नेटार ती माडी उबारून विधी पुर्ण करता. आनी लागी आशिल्या तलवारीने सगळे कानडी लोकांक मारता.

‘मळकर्णे’ गावात साजरा करणारा ‘शेण्या उजो’ हा सण पूर्वी ‘मालजल्मी’ यांनी सुरू केला होता. ‘मळकर्णे’ या गावात त्यांचे मूळ कुळ आहे. ते आज ‘जम्ली’ देवस्थान म्हणून ओळखले जाते. तर हे ‘मालजल्मी’ नार्वे या गावात होते. नार्वेतुन या कथेची सुरुवात होते. पूर्वी कानडी लोक या गावात कामधंदा करण्यासाठी आले होते. त्या लोकांनी संपूर्ण गावात आपल्या (कबजात) हातात घेतला. कानडी लोकांनी जम्ली वंशाचा नाश केला. ह्या जम्ली वंशाची एकाच स्त्री गावात होती तिला मुल होणार होतं. जेव्हा ती मळकर्णे गावातून नागेशी गावात आपल्या भावाकडे जात होती, तेव्हा वाटेवर कणकीच्या झाडाखाली तिला मूल झाला. ती आजारी असल्याने तिने आपल्या भावाला निरोप पाठवला की माझा मुलगा आता तू सांभाळावं. त्या स्त्रीचा भाऊ त्या मुलाला नेण्यासाठी

त्या कणकीच्या झाडाखाली आला. तिथे आल्यावर त्याच्या भावाने पाहिले की त्या लहान मुलाच रक्षण एक नाग करत होता. तिच्या भावाने त्या मुलाला आपल्या सोबत घरी नेलं. तो मुलगा मोठा झाल्यावर त्याला त्याच्या मित्राकडून ह्या 'शेण्या उजो'सणाबद्दल कळलं.

तो आपल्या मामाला न सांगता 'मळकर्णे' गावात सण पाहायला आला. त्यावर्षी गावात जी विधी करण्याची माडी होती ती त्या गावातील एकही लोक उभारू शकला नाही. त्यावेळी एका माणसाने म्हटलं की जर जल्मी वंशाचा कोणीही इकडे उपस्थित आहे तर त्यांनी येऊन ही विधी करावी. हे ऐकल्यावर त्या मुलावर अवसर आला आणि तो त्या अवसराच्या भानात ती माडी उभारून त्यांनी ती विधी पूर्ण केली. समोर असलेली तलवार घेऊन सर्व कानडी लोकांना मारून टाकले. आणि एका जागेवर फेकले. त्या मुलापासून त्यांच्या वंशाची जी परंपरा आणि विधी या 'शेण्या उजो' मुळे चालत राहिली.

## ४.२ समारोप

केपे परिसरातील लोकदैवत कथांचा अभ्यास करत असताना लोकसमाज आणि येथील दैवतांच्या निगडित असलेल्या अनेक गोष्टींचा उलगडा होत गेला. या दैवतविषयक लोककथातून दैवतांची महिमा, दैवतांच्या स्थापने विषयी कथा आलेल्या आहे. काही कथाकडे गावातील लोक मनोरंजन म्हणून ही पाहताना दिसतात. या दैवतकथातील जास्त अशा कथा दैवतांच्या स्थापनेविषयीच्या आहे. या कथातून दैवतांची विधी, सण-उत्सव, वार यांची माहिती मिळते. काही कथांच्या स्वरूपत साम्यता आढळते, परंतु त्या कथात गावातील नाव, दैवतांचे नाव, विधीत बद्दल दिसतो. या लोकदैवत कथांचा संकलन करण्यास अनेक व्यक्तींची आणि काही देवस्थानाच्या संपादकी पुस्तकांची मदत लाभलेली आहे.

## ४.३ निष्कर्ष

1. केपे परिसरातील लोकसमाज आपल्या रूढी, परंपरा आणि दैवत यांच्याशी बद्ध आहे.
2. मनापासून देवीची भक्ती केली तर ती देवी लोकांना पावते, परंतु देवीला हवा असलेला मान जर मिळाला नाही तर त्या देवीचा कोप होतो असेही या कथातून दिसून येते.

3. दैवतांना मान देण्यासाठी गावातील लोक जनावरांची बळी, नरबळी देतात. असे या कथातून दिसते.
4. केपे परिसरातील बहुतांश गावात राखणदाराला 'रोट' घालून मान दिला जातो.
5. या लोकदैवत कथांतून समजते की लोकसमाजात दैवतांवर असलेला विश्वास 'प्रसाद लावणे' या प्रकारावरून दिसून येतो.
6. या लोककथा 'लोकभाषेतून' सांगतात, त्यामुळे लोकसाहित्याची भाषा ही 'लोकभाषा'असते.
7. केपे परिसरातील समग्र लोककथांच्या अभ्यासाद्वारे समजते की येथील समाजात दैवतांचे दर्शन मूर्त किंवा अमूर्त स्वरूपात घडते.
8. केपे परिसरातील लोकदैवत कथा मधील महत्वपूर्ण भाग म्हणजे येथील 'लोकसंस्कृती' होय.
9. या दैवतकथातून दैवतांची महिमा सांगणारी आणि स्थापना विषयीच्या कथा पाहायला मिळतात
10. केपे परिसरातील लोककथांचे अनेक प्रकार पाहायला मिळतात, पण या सर्वात दैवत लोककथा ही येथील समाजात मोठ्या प्रमाणात प्रचलित असलेली दिसते.

**नामसूची:**

1. *'श्री वाघ्रेश्वर महादेव प्रसन्न'*, **संतोश गावकर** ( लोककलाकार) सोलय, कुडचडे केपे गोवा, वय ६२ वर्षे.
2. *'श्री धानुचरण'*, **प्रांजली शिरोडकर** (गृहिणी) माध्येगाळ, ककोडा, केपे गोवा, वय ४८ वर्षे.
3. ' *सूण्याखेडे', 'श्री वेताळ देव'*, **सुरेश विठोबा सावंत देसाई** (लोककलाकार) गुन्यार, ककोडा, केपे गोवा, वय ७७ वर्षे.
4. *'श्री मल्लिकार्जुन मंदिर'*, **शंभू गावकर** (लोककलाकार) मळकर्णे, केपे गोवा, वय ७० वर्षे.
5. *'श्री सातेरी शांतादुर्गा'*, **महादेव गावस देसाई** (लोककलाकार) शेल्डे, केपे गोवा, वय ५६ वर्षे. आणि **योगिता रायकर** (शिक्षिका) कोठंबी केपे गोवा, वय ४० वर्षे.
6. *'श्री सातेरी देवी', 'श्री लिंगदेव', 'श्री खान्सीदेवी'*, **विश्वनाथ प्रभूदेसाई, मुळी** (पुजारी / लोककलाकार) काकोडा, केपे गोवा, वय ५६ वर्षे.
7. *'श्री चंद्रेश्वर भूतनाथ'*, **महादेव गावस देसाई** (लोककलाकार) शेल्डे, केपे गोवा, वय ५६ वर्षे.

8. *‘श्री वेताळ देव’,* **रामचंद्र घाडी** ( ‘घाडीपण’ करणारा घाडी (पुजारी) लोककलाकार) घाडीवाडा केपे गोवा, वय ६९ वर्षे.
9. *‘श्री सिद्ध देवा’, ‘श्री चंद्रेश्वर आणि पुरुषम्हारु’,* **कांता घाडी** ( लोककलाकार) घाडीवाडा, केपे गोवा, वय ५२ वर्षे.
10. ‘*वाटूबोंघाडी’*, **कृतिका गुरुनाथ नाईक** ( विद्यार्थी) व्हरा केपे गोवा, वय२४ वर्षे.
11. *‘म्हारांगणपुरव वेताळ’,* **फाल्गुन परवार** (लोककलाकार) महारवाडा, ककोडा केपे गोवा, वय ५७ वर्षे.
12. *‘कातशींम्हारु’,* **केशव आदेल** (लोककलाकार) माड, बाणसाय केपे गोवा, वय ५५ वर्षे.
13. ‘*श्री ब्रह्मा’,* **विठ्ठलदास मोरतु कामत** (पुजारी) बाळ्ळी मठ, केपे गोवा, वय ७३ वर्षे.
14. *‘श्री सती देवी’,* **शंभू गावकर**, (लोककलाकार) आंबावली, केपे गोवा, वय ७८ वर्षे.
15. ‘*श्री भूतकाका’*, **विनय खोलकार,** (लोककलाकार) बाळ्ळी, मठ, केपे गोवा, वय ५४ वर्षे.
16. ‘*श्री पुरुषम्हारु’,* **विश्वमित्र वस्ता**, (लोककलाकार) कुडचडे, केपे गोवा, वय ६९ वर्षे.
17. ‘*श्री वज्रेशवर आणि कुनेश्वर’, ‘ सासरकांन’, ‘ श्री फळ शिलाहार शांतादुर्गा’,* **मनोज बर्वे,** (पुजारी) बाळ्ळी, केपे गोवा, वय ७३ वर्षे.
18. ‘*श्री दत्त मंदिर’,* **प्रदीप वामन जोशी** (पुजारी) केपे गोवा, वय ५६ वर्षे.
19. ‘*श्री नागनाथ’,* **विकास रायकर,** मळकर्णे, केपे गोवा, वय ४९ वर्षे.
20. **आशा प्रशांत खोलकर,** बाळ्ळी, केपे गोवा, वय ४९ वर्षे.
21. **लवू घाडी,** घाडीवाडा, केपे गोवा, वय ६९ वर्षे.

# प्रकरण ५

# निष्कर्ष

या प्रबंधिकेतील निष्कर्षांची मांडणी सदर पाचव्या 'निष्कर्ष'च्या प्रकरणाद्वारे केलेली आहे. लोकसाहित्याचा अभ्यास करताना लोकसाहित्य, लोकवाङ्मय आणि लोककथा याविषयी समजून घेणे महत्त्वाचे आहे. लोकसाहित्यातून लोकजीवनाचे लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. 'केपे' हा गोमंतकातील दक्षिणेकडचा एक तालुका आहे. या परिसरात काही वैशिष्ट्य जाती-जमातीचे 'लोक' आढळतात. या परिसरातील लोकसमाजाचे जीवन निसर्गाने आणि संस्कृती अशा अनेक वैशिष्ट्याने नटलेली असून या प्रबंधिकेत पहिल्या चार प्रकरणाद्वारे लोकसाहित्य, लोकवाङ्मय आणि लोककथा विषयी जाणून, केपे परिसरातील 'लोक', या परिसरातील लोकांचा व्यवसाय, भौगोलिक रचना, येथील दैवताविषयी असलेल्या लोककथा, आणि या लोकदैवत कथांचा अभ्यास झालेला आहे. प्रस्तुत निष्कर्षांच्या प्रकरणाद्वारे सदर विषयातून हाती लागलेल्या निष्कर्षांची मांडणी केलेली आहे. ती पुढील प्रमाणे.

### ५.१ निष्कर्ष

1. लोकजीवनातून लोकवाङ्मय निर्माण होते आणि ते लोकजीवनाला प्रेरणा देते.
2. लोककथा ही एक मानवसमूहापर्यंत किंवा एका भाषिक प्रदेशापूरती मर्यादित नसते तर, त्यांचे प्रवाहीपणा अबंधित असते.
3. पारंपरिक आचार-विचार लोकसाहित्यातून प्रकट होत असल्याने, परंपरा जपणे, टिकवणे व ती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे हे कार्य लोकवाङ्मय आणि पर्यायाने लोकसाहित्याद्वारे घडते.
4. लोकसाहित्य हा लोकजीवनाचा आणि लोकसंस्कृतीचा आरसा असतो.
5. लोकांचे हावभाव, मानवी स्वभाव, मानवी संवेदनांच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास लोकसाहित्यातून होताना दिसतो.

6. लोककथा ही मौखिक परंपरेने चालत आलेली असून ती लोकजीवनाशी निगडित असते.
7. स्थळ, भाषा, काळ, प्रदेश, निसर्ग अशा विविध टप्प्यांतून लोककथांचा प्रवास वर्षानुवर्षे अखंडितपणे चालत जातो.
8. लोकवाङ्मयात गीतरूप, संवादरूप आणि कथारूपातून अनेक प्रकारांचा समावेश होतो.
9. कालांतराने लोकसाहित्यात बद्दल होत राहतो, त्यामुळे 'लोकसाहित्य हे परिवर्तनशील असते' हे विधान बरोबर आहे.
10. मानवसमूहाच्या सभोवताली परंपरेने निर्माण केलेली संस्कृती हीच लोकसंस्कृती लोकसाहित्याच्या केंद्रस्थानी असते.
11. लोकांनी आपल्याला सहज उपलब्ध होणाऱ्या नैसर्गिक साधन-सामग्रीचा वापर आपल्या सण-उत्सवात, विधीत केलेला आहे.
12. 'केपे' परिसरातील अनेक जाती-जमातीचे लोक आपला पारंपरीक व्यवसाय, परंपरेने पुढच्या पिढीला सुपूर्त करताना दिसतात.
13. 'केपे' परिसरातील अनेक महत्त्वपूर्ण दैवतांच्या देवस्थानात अजूनही पूर्वीच्या देवदासी प्रथेने बंधलेली स्त्रिया दैवतांचे कार्य करताना दिसतात, नव्यांची भर आजच्या परंपरेत पडत नाही.
14. लोकदैवतांची निर्मिती समाजाच्या मानसिक श्रद्धेच्या पातळीवर आणि कल्पनेच्या आधारे झालेली दिसते.
15. 'केपे' परिसरातील अनेक दैवतांची पूजा झाडे, पशुपक्षी, पाषाण व माणूस या सर्वांच्या कल्पनेमुळे दैवतशक्ती निर्माण केलेली दिसते.
16. 'केपे' परिसरातील अनेक पुरातन काळातील मूर्त्या इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरतात.
17. मानवी कल्पनेद्वारे दैवत संकल्पनांना त्यांचे भौतिक रूप आणि स्वरूप प्राप्त होते.
18. लोकसमाजातील लोकदैवताविषयी असलेल्या श्रद्धेतून या लोकदैवतांची संख्या समाजात वाढलेली दिसते.
19. 'केपे' परिसरातील राखणदाराचे स्थान डोंगरावर, नदीच्या काठावर, गावाच्या बाहेर, एखादा झाडाखाली असलेले पाहायला मिळतात.
20. लोकदैवतांची निर्मिती एखादा अमुक (महार, गावकर) जातीवरूनही झालेले दिसतात.

21. या दैवताविषयी समाजाच्या मनात भावना, श्रद्धा, सुरक्षिता असते तसेच भितीही असते.
22. ‘केपे’ परिसरातील आढळणारी बहुतांश लोकदैवते ही येथील लोकांची निर्मिती आहे.
23. ‘केपे’ परिसरातील लोकसमाज आपल्या रूढी, परंपरा आणि दैवत यांच्याशी बद्ध आहे.
24. समाजातील ‘लोक’ आपल्या संस्कृती, परंपरीक जीवनात, दैवतांना जास्त महत्व देताना या लोककथातून दिसते.
25. ‘केपे’ परिसरातील दैवतविषयक लोककथांच्या अभ्यासातून लोकदैवतांची ‘उन्नयन प्रक्रिया’ समोर येते.
26. या लोककथा ‘लोकभाषेतून’ सांगतात, त्यामुळे लोकसाहित्याची भाषा ही ‘लोकभाषा’ असते.
27. ‘केपे’ परिसरातील समग्र लोककथांच्या अभ्यासाद्वारे समजते की येथील समाजात दैवतांचे दर्शन मूर्त किंवा अमूर्त स्वरूपात घडते.
28. ‘केपे’ परिसरातील लोकदैवतांचा अविभाज्य अंग म्हणजे येथील ‘लोकसंस्कृती’ होय.
29. दैवतांना आकार, मूर्ती हे सर्व मानवी पातळीवरच्या आहेत, तसेच या दैवतांची पूजा, विधी, उपासना पद्धती या सर्वांची निर्मिती मानवी श्रद्धेमुळे झालेली दिसते.
30. ‘केपे’ परिसरात लोकजीवनातील लोकदैवताविषयी असलेल्या विधी, सण, उत्सव, परंपरा यासर्वातून या परिसरातील ‘लोक’ आपल्या संस्कृतीशी जवळ असलेले दिसते.
31. ‘केपे’ परिसरातील बहुतांश लोकदैवतांचे कार्य, विधी गावकर, वेळीप, गुरव, घाडी, देवळी समाजातील ‘लोक’ करताना दिसतात.
32. ‘न्हावी’ समाजातील ‘गावकरप’ ही पद्धत पूर्वी व्यवसायाच्या दृष्टीने महत्त्वाची होती, पण आता ती लुप्त होताना दिसते.
33. ‘ केपे’ परिसरातील ‘मळकर्णे’ या गावात साजरी करणारी उजाची होळी म्हणजे ‘शेण्या उजो’ हा प्रकार आहे.
34. ‘केपे’ परिसरातील बहुतांश गावात राखणदाराला ‘रोट’ घालून मान दिला जातो.
35. लोकदैवत या कथातून ‘लोकांचा’ दैवतावर असलेला विश्वास हा ‘प्रसाद लावणे’ या प्रकारावरून दिसून येतो.

36. सासरकान्न, वेताळ या दैवतांच्या कथातून समजते की गावातील उच्च समाजातील ‘लोक’ देवी-दैवतांना स्थापित करण्याच्या वेळी बळी, रक्त याचा मान देण्यासाठी महार, वेळीप, गावकर या जातीतील लोकांना पुढे करतात.
37. ‘केपे’ परिसरातील बहुतांशी दैवतांच्या मंदिरासमोर ‘पुरीस’ म्हणजे ‘खांबा’ असतो.
38. ‘केपे’ परिसरातील काही दैवतांचा आजच्या काळात अभिजन दैवताचे स्वरूप मिळताना दिसते.
39. दैवतांना मान देण्यासाठी गावातील ‘लोक’ जनावरांची बळी, नरबळी देतात. असे या कथांतून दिसते.
40. ‘केपे’ परिसरातील ‘लोक’ दैवतासंबंधित असलेल्या विधी, सण- उत्सव परंपरेने पुढे नेत, लोकसंस्कृती प्रदीर्घकाळ टिकून ठेवण्याचा प्रयत्न करतात.
41. सुण्याखेडे, वाटूबोंघाडी या कथेत पाळीव ‘कुत्रा’ म्हणजे प्राणीला दैवताचे स्थान मिळालेले आहेत, मृत्यूनंतर त्यांच्या ‘खेड्यांची’ पूजा गावातील लोक करताना दिसतात.
42. मनापासून देवीची भक्ती केली तर ती देवी लोकांना पावते, परंतु देवीला हवा असलेला मान जर मिळाला नाही तर त्या देवीचा कोप होतो. असे खान्सीदेवीच्या कथेतून दिसून येते.
43. चंद्रेश्वर भूतनाथ, पुरुषम्हारू, वेताळ यांच्या लोककथातून या दैवतांची महिमा सांगितलेली आहे.
44. ‘केपे’ परिसरातील उपरोक्त मांडलेल्या बहुतांश लोककथा दैवतांच्या स्थापना विषयीच्या आहे.
45. ‘केपे’ परिसरात लोककथांचे अनेक प्रकार पाहिला मिळतात, पण त्यातील दैवत लोककथा ही समाजात मोठ्या प्रमाणात प्रचलित असलेली दिसते.

# परिशिष्ट

**परिशिष्ट १ .......................................................................................106**

गोव्याचा प्रशासकीय नकाशा.......................................................................106

**परिशिष्ट २ .......................................................................................107**

केपे परिसराचा सांस्कृतिक नकाशा.............................................................107

**परिशिष्ट ३ .......................................................................................108**

**छायाचित्रे**.......................................................................................108

3.१ वाघ्रेश्वर मंदिराबाहेरील वाघिणीची मूर्ति.................................................108

३.२ वाघ्रेश्वराची मूर्ति...............................................................................108

३.३ धानुचरण, गौमाता, ब्रम्हा (पावलामड्डी).................................................109

३.४ धानुघाडी (घाडीवाडा) .........................................................................109

३.५ सुण्याखेडे (गुन्यार, काकोडा) ...............................................................110

३.६ मलिकार्जुन (मळकर्णे)..........................................................................110

३.७ मलिकार्जुन, मळकर्णे मंदिरात असलेली लिंग...........................................110

३.८ मलिकार्जुन, मळकर्णे देवळाबाहेरील पेडखाली असलेली लिंग.......................111

३.१० सिद्ध देव..........................................................................................112

३.११ सिद्ध देवाच्या मंदिराबाहेरील त्रिशूल.....................................................112

३.१२ कातर्शीम्हारू ....................................................................................113

३.१३ कातर्शीम्हारूची बसकी .......................................................................113

३.१४ श्री सातेरी शांतादुर्गा प्रसन्न, शेल्डे.........................................................114

३.१५ बारा वर्षाच्या जत्रेला देवीला दिला जाणारा मान (सावत)...........................114

३.१६ सावरीची मेड देवालयाच्या प्रांगणात....115

३.१७ शेल्डे गावातील दिवजोत्सव....115

३.१८ श्री चंद्रेरेश्वर भुतनाथ प्रसन्न....116

३.१९ चंद्रेश्वर मंदिरातील अभिषेकाचे लिंग....116

३.२० श्री चंद्रेश्वर भूतनाथ देवाचा महारथ....116

३.२१ श्री चंद्रेश्वर भूतनाथ देवाची लालखी....117

३.२२ श्री चंद्रेश्वर भूतनाथ देवाची पालखी....117

३.२३ जल्मीदेव (काकोडा)....118

३.२४ खान्सीदेवी (काकोडा)....118

३.२५ श्री सातेरी, महारवाडा काकोडा....119

३.२६ श्री बेताळ देव, काकोडा....119

३.२७ श्री वेताळ मंदिराच्या बाहेरील....120

(लिंगाखाली खेत्री  बंदी असतो)....120

३.२९ श्री बेताळ देवाची तरंगावरील मूर्ती....121

३.३०  काकोडेचा दसरा....121

३.३१ पुरुषम्हार, कुडचडे....122

३.३२ श्री कुड्डो आजो प्रसन्न, कुडचडे....122

३.३३ श्री पुरुषम्हारू देवाची ‘रोट’ घालण्याची जागा....122

३.३४ श्री भूतकाका प्रसन्न, फातर्पा....123

३.३९ सती देवी, अंबावली....123

३.४० श्री कुनेश्वर, बाळ्ळी....124

३.४१ श्री वज्रेश्वर, बाळ्ळी....124

३.४२ श्री शांतदुर्गा बाळ्ळीकरीण, बाळ्ळी......125

३.४३ बाळ्ळी मठ......125

३.४४ श्री ब्राम्हा, बाळ्ळी मठ ......126

३.४६ दसऱ्याला कौल देताना (काकोडा)......127

३.४७ तरंगाची पूजा ......127

३.४८ वाघ्रेश्वर मंदिराबाहेर असलेला खांबा (पुरीस) ......128

३.४९  पुरुषम्हरू देवाची पालखी ......128

**३.२ केपे परिसरातील पुरातन काळातील संस्कृतिक खुणा ......129**

३.२.१ वज्रेश्वर मंदिराबाहेरील पुरातन काळातील मुर्त्या ......129

३.२.२ शेल्डे जत्रेचा इतिहासाचा शिलालेख......129

३.२.३ बेताळ मंदिराबाहेर असलेला शिलालेख ,काकोडा ......130

३.२.५ प्रसाद लावायचा खांबा (मळकर्णे) ......131

३.२.६ वाघ्रेश्वर मंदिराबाहेरील असेलेली पुरातन......131

काळातील पाषांणी लिंग ......131

३.२.७ गोडक्याधनी, महारवाडा काकोडा......132

**३.३ केपे परिसरातील काही महत्त्वपूर्ण दैवतावर लिखित आरत्या चौरंग आणि रमट. ......132**

३.३.१ ‘श्री शांतादुर्गा चामुंडेश्वरी कुडतरी महामाया’ देवीची आरती ......132

३.३.२ ‘श्री शांतादुर्गा बाळ्ळीकरीण देवीची चौरंग, रमट आणि आरत्या’ ......133

३.३.३ ‘श्री चंद्रेश्वर भूतनाथ दैवताची आरती’ ......136

३.३.४ ‘श्री पुरुषम्हारू राखणदाराची आरती, अभंग’......137

**परिशिष्ट ४ ......139**

प्रबंधिकेतील कठीण शब्द ......139

## परिशिष्ट १

## गोव्याचा प्रशासकीय नकाशा





**सौजन्य:-**

https://en.m.wikipedia.org/wiki/File:Quepem_taluka_in_South_Goa_district.png

# परिशिष्ट २

## केपे परिसराचा सांस्कृतिक नकाशा




सौजन्य: [http://www.eindiatourism.com/goa-india-maps/quepem-goa-indiamaps.html](http://www.eindiatourism.com/goa-india-maps/quepem-goa-indiamaps.html)

# परिशिष्ट ३

# छायाचित्रे



3.१ वाघ्रेश्वर मंदिराबाहेरील वाघिणीची मूर्ति



३.२ वाघ्रेश्वराची मूर्ति




**३.३ धानुचरण, गौमाता, ब्रम्हा (पावलामड्डी)**



**३.४ धानुघाडी (घाडीवाडा)**



३.५ सुण्याखेडे (गुन्यार, काकोडा)




३.६ मलिकार्जुन (मळकर्णे)



३.७ मलिकार्जुन, मळकर्णे  मंदिरात असलेली लिंग



**३.८ मलिकार्जुन, मळकर्णे देवळाबाहेरील पेडखाली असलेली लिंग**



**३.९ मळकर्णे गावातील शेण्या उजो**



३.१० सिद्ध देव



३.११ सिद्ध देवाच्या मंदिराबाहेरील त्रिशूल



३.१२ कातर्शीम्हारू



३.१३ कातर्शीम्हारूची बसकी




**३.१४ श्री सातेरी शांतादुर्गा प्रसन्न, शेल्डे**



**३.१५ बारा वर्षाच्या जत्रेला देवीला दिला जाणारा मान (सावत)**



३.१६ सावरीची मेड देवालयाच्या प्रांगणात




३.१७ शेल्डे गावातील दिवजोत्सव



३.१८ श्री चंद्रेरेश्वर भुतनाथ प्रसन्न




३.१९ चंद्रेश्वर मंदिरातील अभिषेकाचे लिंग



३.२० श्री चंद्रेश्वर भूतनाथ देवाचा महारथ



**३.२१ श्री चंद्रेश्वर भूतनाथ देवाची लालखी**



**३.२२ श्री चंद्रेश्वर भूतनाथ देवाची पालखी**



**३.२३ जल्मीदेव (काकोडा)**



**३.२४ खान्सीदेवी (काकोडा)**



**३.२५ श्री सातेरी, महारवाडा काकोडा**



**३.२६ श्री बेताळ देव, काकोडा**



**३.२७ श्री वेताळ मंदिराच्या बाहेरील**

**(लिंगाखाली खेत्री  बंदी असतो)**




**३.२८ श्री बेताळ व धानुघाडी**



३.२९ श्री बेताळ देवाची तरंगावरील मूर्ती



३.३०  काकोडेचा दसरा




३.३१ पुरुषम्हार, कुडचडे




३.३२ श्री कुड्डो आजो प्रसन्न, कुडचडे




३.३३ श्री पुरुषम्हारू देवाची ‘रोट’ घालण्याची जागा




**३.३४ श्री भूतकाका प्रसन्न, फातर्पा**



**३.३९ सती देवी, अंबावली**



३.४० श्री कुनेश्वर, बाळळी



३.४१ श्री वज्रेश्वर, बाळळी



**३.४२ श्री शांतदुर्गा बाळ्ळीकरीण, बाळ्ळी**



**३.४३ बाळ्ळी मठ**



**३.४४ श्री ब्राम्हा, बाळळी मठ**



**३.४५ आपट्याचे झाड**

**( या झाडाला गावातील लोक पैशांचे झाड असे म्हणतात)**



**३.४६ दसऱ्याला कौल देताना (काकोडा)**



**३.४७ तरंगाची पूजा**



३.४८ वाघ्रेश्वर मंदिराबाहेर असलेला खांबा (पुरीस)



३.४९ पुरुषम्हरू देवाची पालखी

## ३.२ केपे परिसरातील पुरातन काळातील संस्कृतिक खुणा



### ३.२.१ वज्रेश्वर मंदिराबाहेरील पुरातन काळातील मुर्त्या



### ३.२.२ शेल्डे जत्रेचा इतिहासाचा शिलालेख



३.२.३ बेताळ मंदिराबाहेर असलेला शिलालेख ,काकोडा



३.२.४ धानुघाडी मंदिरातील पाषाण



**३.२.५ प्रसाद लावायचा खांबा (मळकर्णे)**



**३.२.६ वाघ्रेश्वर मंदिराबाहेरील असेलेली पुरातन**


**काळातील पाषांणी लिंग**



### ३.२.७ गोडक्याधनी, महारवाडा काकोडा

## ३.३ केपे परिसरातील काही महत्त्वपूर्ण दैवतावर लिखित आरत्या चौरंग आणि रमट.

### ३.३.१ 'श्री शांतादुर्गा चामुंडेश्वरी कुडतरी महामाया' देवीची आरती



।। श्री - शांतादुर्गा चामुंडेश्वरीची आरती ।।

जय शांतादुर्गे जय चामुंडेश्वरी ।।
आरती ओवाळुं हे जगदीश्वरी ।।धृ।।

शुभवदना, शुचिवसना, करूणामयि माते ।
कनकालंकार-कुसुमांगा-भुषिते ।
शांतादुर्गे विमले भवसागर तारीं ।
हरीं क्लेशा घे मम अपराधा पदरीं ।। १।। जय.

व्याघ्र वाहन तुझे हातीं आयुधें ।
उठसी माते जाशी रिपुहरण्या क्रोधें ।
धांवसि भक्तां हांके संकटि संसारीं ।
ऐसी तूं चामुंडा सकलांसी तारी ।। २।। जय.

त्रिभुवनपालक दोन्ही रूपें शक्तिचीं ।
सुस्वर मांनव गाती महती भक्तिची ।
तव गुण गाता थकली वाणी युक्तिची ।
शरण आलों दावी वाट मुक्तिची ।। ३।।

जय शांतादुर्गे जय चांमुडेश्वरी ।।
आरती ओंवाळू हे जगदीश्वरी ।।

सौजन्यः- 'श्री संस्थान शांतादुर्गा चामुंडेश्वरी कुडतरी महामाया', स्मरणिका २०१९

## ३.३.२ 'श्री शांतादुर्गा बाळ्ळीकरीण देवीची चौरंग, रमट आणि आरत्या'

### अशी थोरवी शांताई बाळ्ळीकरिणीची.

रामनाथ प्रभु देसाई
कोटंबी - केपे - गोवा

चौरंग : -

(असे) प्राचीन काळी बाळ्ळी महाली,
शिलाहार फळांचा एक वंश रे बा
राजसत्ता चालवी मुं ॥

दक्षिण काशी हो गोवापुरी प्रांती ,
ख्याती त्याची त्रिभुवनी गाचे बा,
सूर्यवंशी राजघराणे मुं ॥

कुनेश्वर - वज्रेश्वर मूळ दैवत ,
आणिलेला सप्तकोटीश बा रावजी
तिसवाडी नार्वेचा मु ॥

युगयुगे वसलेली वेळिपवनी सातेरी,
तीही फळांच्या राजमहाली बा रावजी
होऊनी बसली शांताई मुं ॥

या महामाईची काय गावी थोरवी,
दूरदूरचे भक्त चरणी येती बा रावजी
नवस तिज फेडिती मुं ॥

बाळ्ळीकरिणीची जागृती (सासाय) मोठी,
स्वप्न - दृष्टांत घडवी बा रावजी
महिषासुरमर्दिनी मुं ॥

एक लिंगी शिवाचे निजी उपासक,
जीमूत वाहनाचा मूळ पिंड रे बा
पुजतसे शांताईस मुं ॥

अंबरीष दशरथ कुळी आलेले ,
अग्निवंशी फळ शिलार गा देवानो
कोणी म्हणीती त्यांज फळ्ळ मुं ॥

पवरव, परमार आणिक पल्लव,
इतिहासात कित्येक नावे बा रावजी
उपासक शिव दुर्गेचे मुं ॥

दूर दूर वेळिपवनी वसलेली शांतेरी,
परि दरबारी महालकरी बा रावजी
जाती वार्षिक उत्सवास मुं ॥

असे एके वर्षी हो काय घडे वर्तमान,
जत्रा उरकली वेळिप कुळंबीनी गा देवीची
मागमूस फळांस ना मुं ॥

महालकरी हो आले विवंचनेत,
पुन्हा पुन्हा विनवणी करी देवीस बा
शरण तिजला येती मुं ॥

ऐका हो देवीनो, विनवितो तुम्हांस,
चला जाऊ राजदरबारी बा रावजी
सदाकाळ दर्शन देण्यास मुं ॥

भोळ्या शंकराची भोळी कुलस्वामिनी,
झाली भेणाहून मवाळ वा देवांनो
झाली तत्पर हाकेला मुं ॥

होऊनिया उदार बसली पालखीत,
निघाली आपल्या राजदरबारी गा देवांनो
सण्ण फळ्ळांच्या क्षेत्री मुं ॥

चालता बोलता झाली देवी भारी,
असह्य तिचा भार, उचलत नाही बा,
पडले फळ विवंचनेत मुं ॥

हर हर घालिती, देवीस विनविती,
बन गे देवी फुलासम कोमल बा
घाटेपावला देतो अमृत फळ मुं ॥

घाटे पावला कणकणी दिली अमृत फळे,
ती गेली संपून वा रावजी
देवी राहिली वाटेवर मुं ॥

वाटेवरी पिकलेली कान्या / गाळी फळे,
ती घाटे पावला कणकणी वा रावजी,
अर्पण केली देवीस मुं ॥

खाली उचलती, पुन्हा विनविती,
मुमुर्खीच देवी हसे बा रावजी,
पाहे फळांची परीक्षा मुं॥

ऐक गे देवी अखेरची विनंती,
पोटीचे पाठीचे एक देतो रावजी
तुजला वर्षापोटी मुं ॥

वैशाख मासी हो शु. पंचमी तिथी,
शांताई विराजली बाळ्ळी दरबारी बा
आली सण्ण फळ्ळा महाली मुं ॥

आश्विन मासी हो नवरात्री दिनी,
माई बसली घटात वा रावजी
एकेक रूप कशी धरी मुं ॥

आश्विन मासी दशमी तिथी,
महामाया चाले सीमोलंघनास गा देवानो
ताम्रपट श्रवण करण्यास मुं ॥

बाळ्ळी महालाचे अष्ट मतकरी,
ताम्रपत्र्याचे श्रवण करी बा रावजी,
धन्य रुद्रराज फळ्ळ मुं ॥

कार्तिक मासी वद्य द्वादशी तिथीस,
कालोत्सव कसा साजरा वा रावजी
वेळिपवन लोटून निघे मुं ॥

माघ महिना हो आली शिवरात्री,
कुनेश्वर - वज्रेश्वर स्पतकोटीश बा
बेल उदक त्यावर मुं ॥

फाल्गुन मासी शुद्ध एकादशी (नवमी)
मांड खेळती शिमग्याचा वा रावजी
नमन घालिती अवचित मुं ॥

बाळ्ळी महालाचे शिमगे खेळ येती,
देवीचे गुणगान करी वा रावजी
पुनवेस खेळ संपविती मुं ॥

फाल्गुन मास, शिशिर ऋतु आला,
देवीचा जत्रोत्सव सुरू गा देवानो
तत्पूर्वी माहेरा/कुळारा गेलेली मुं ॥

फाल्गुन मास, वद्य षष्टी तिथी
जत्रेचा नेम कसा धरी वा रावजी
एकमताने सांगणे घाली मूं ॥

सप्तमी तिथीस दीवजांची भोवर
वाळ्ळियपूरच्या सुवासिनी गा देवीनो
सौभाग्य मागती देवीलागी मूं ॥

अष्टमी रात्रीस तिसरे नाटक,
रोज रात्री देवी बसे सेजावरी वा रावजी
मंडपी राहील जन समुदाय मूं ॥

नवमी तिथीचा झाला सूर्योदय,
गड्यांची लाट आणि शिडियोत्सव वा
जनलोक कसा शोभे मूं ॥

सुवदळे सोडताना घेतलेले वचन,
पोटचे, पाठीचे वर्षा पोटी रावजी
नवस कसा फेडिती मूं ॥

दशमी तिथीस गुलाल उधळण,
वर्षाचा नेम तुझा झाला देवीनो
शिडियोत्सव झाला मूं ॥

नममस्तक होऊनी क्षमा याचना करी,
गळेक्षम्य मागणी देवीनो
चूक, भूल माफ कर मूं ॥

रमट : १) शांतादुर्गे दवी तुझे लांब लाब केस । माणिक मोत्यांनी भरू या शेंस ॥
२) इवली इवली सांगशी सांबाराची. तांतूक बसल्या शांताई भांगराची ॥
३) या वाटेने कोण देवी गेल्या रे । तिच्या खांद्यावर रेशमाचा शेला मूं ॥
४) शांताई देवी तुझी निर्मळ जागा । कुनेश्वर - वज्रेश्वर समोर उभा ॥
५) दुपारचा प्रहर झाला धूल्ल तापला । बाळ्ळीकान्न वाहेर सरल्या, मांडार पावल्या ॥

# शांतादुर्गे माझे आई ...

देवेंद्र प्रभू देसा
शेल्डे केपे गोवा

शांतादुर्गे माझे आई, मजला ठाव द्यावा पाई ॥ १ ॥
बाळ्ळीकरिणी माझे जननी, करितो मनन ध्यानी-मनी ॥ २ ॥
अथांग सागर हा कर्मांचा, कर देवी उद्धार सकलांचा ॥ ३ ॥
वज्रेश्वर कसा तव साथीदार, कुनेश्वर हा तर राखणदार ॥ ४ ॥
रामनाथ, अन् मल्लिकार्जुन, सप्तकोटीश्वर सनिध्यात बसून ॥ ५ ॥
धरत्तार, रवळनाथ इतर जन, करिती आमुचे देवी रक्षण ॥ ६ ॥
सद्बुद्धी, सद्वासना मागतो आई, अशीच कृपादृष्टी ठेवी ॥ ७ ॥

# सांगा अशी आहे कोण ?

*कुमारी अभिलाषा उ. प्रभू देसाई .*
टाकी - केपे - गावा .



प्रश्न माझा तुम्हा सगळ्यांना ।
विचार करा नि उत्तर सांगा ।
द्वितीय बहीण खंडरायाची ।
बीरणी आई आम्हां सगळ्यांची ।
खल दुष्टांपासूनी भय तारिसी ।
दुराचारांचा नायनाट करी ।
मुख तिजे सदा हसतमुख ।
मायेची ती मूर्ती करूण ।
लाल रंग तिला आवडी ।
पाहून इंद्रदेव ही प्रणाम करी ।
तलवार, सुदर्शन नि त्रिशूल धारूनी ।
चिरडीत असते पद शिर असुरी ।
बरोबर ओळखले उत्तर तुम्ही ।
जिने केले असुरांचे मर्दन ।
दर्शन घेता, लाभे परमसुख ।
**बाळ्ळीकरीण शांतादुर्गा** तिचे नाव ।

पटवूनी द्या ओळख दुसऱ्यांना ।
सांगा अशी ती आहे कोण ? ॥१॥
कुल स्वामिनी शिवशंकराची ।
सांगा अशी ती आहे कोण ? ॥२॥
दुःख संकटांतूनी सोडवी ती ।
सांगा अशी आहे ती कोण ॥३॥
तेज तिजे अगदी प्रखर ।
सांगा अशी आहे ती कोण ॥४॥
सिंहावर असे तिची स्वारी ।
सांगा अशी आहे कोण ॥५॥
राक्षसी मुंडी दुसऱ्या हाती शोभूनि ।
सांगा अशी आहे ती कोण ॥६॥
आहे बाळ्ळी महालाची अधिष्टाती ।
तिचे करिता आम्ही कीर्तन ॥७॥ .
मिळे मन शांति, पाहता मुख ।
करू या तिजला शतकोटी प्रणाम ॥८॥

❐ ❐ ❐


# देवी शांतादुर्गे.

**सौ. योजना संदीप देसाई**

जय अंबे शांतादुर्गे वंदिते मी तव चरणी
लाटावरूनी बांधूनी गरगर फिरती सभोवती
दर्शन देई तव भक्तांना पुढे स्तब्ध शंकर वज्रेश्वर
रक्षण करितो हा कुनेश्वर ॥१॥
दसरा सण हा मोठा नाही उल्हासाला तोटा
देवी चाले बाळ्ळी मठात निसर्गरम्य बाळ्ळी गावात
ओढा वाहे भरभरून गुलाबाचा रंग उधळी चहूकडून ॥२॥
शिवरात्रीचा महान गाथा पिंपळवृक्षावरून तळी पडती
दुधाच्या धारा शिवरात्रीचा सण हा मोठा
नववधुवर घाली प्रदक्षिणा ॥३॥
वद्य पंचमी सण हा मोठा देवी चालली आपल्या माहेरी
मिरवणूक चाले, सनई चौघडा वाजे,
वाजे ढोल -ताशे सोबतीला
बाळ्ळीकरीण भेट देई घरवईना ॥४॥
देवी शांतादुर्गे, अथांग महिमा हा तुझा
नमन तुला करिते मी अथांग कृपादृष्टी
अशीच राहू दे आम्हांवरी ॥५॥

**सौजन्य:- प्रभू देसाई, रामनाथ. ‘बाळ्ळीयपूर, श्री शांतादुर्गा बाळ्ळीकरीण संस्थांतर्गत श्री कुनेश्वर देवस्थानाचा आर्चाशुद्धी वास्तुयोग सोहळा’. २००२.**

### ३.३.३ 'श्री चंद्रेश्वर भूतनाथ दैवताची आरती'



गीतीषट्क

श्री चन्द्रेश्वर भूतनाथ नूतन रथ महोत्सव निमित्त
गीतीषट्क श्री वन्दन

कैलासशृंगिदर्शन घ्याया सायास हो जना सान्या ।।
प्रगटे सास्तव पर्वती चन्द्रेश्वर भूतनाथ वंदू त्या ।।१।।


पुजारिसंकटवारं प्रगटे सौधिकरास भेटाया ।।
नांदती तदापितस्थली चन्द्रेश्वर भूतनाथ वंदू त्या ।।२।।

*एकोणिसाच्या दोन्हीत शकी रौद्री चैत्रपौर्णिमोत्सवी या ।।
आरूढती नूतनरथी चंद्रेश्वर भूतनाथ वंदू त्या ।।३।।

भाविक महाजनकरवी घडवोनी अपूर्वशा महोत्सवी या ।।
नूतनरथसेवा घेती, चन्द्रेश्वर भूतनाथ वंदू त्या ।।४।।

शरणागतां पहाया कृपाप्रसादे जगतल्या सान्या ।।
आरूढती नूतनरथी चन्द्रेश्वर भूतनाथ वंदू त्या ।।५।।

नांदवी सुखात सर्वां पुर्वी मनकामना हि सान्या त्या ।।
व्हावे सदैव पावे, चन्द्रेश्वर भूतनाथ वंदू त्या ।।६।।



श्री चन्द्रेश्वर भूतनाथ प्रणाममंत्र

श्री चन्द्रेश्वर भूतनाथ दीनानाथ दयारत ।
श्री पर्वतानिवासिन् श्री पार्वतीश नमोस्तुते ।।१।।

नमःशिवाय सांबाय समणाय समूलवे ।
सर्वांदिने सगजनाय सविषाय नमो नमः ।।२।।

विश्वेश्वराय शरणागतरक्षणाय
गौरीहराय कमनीयगुणाश्रयाय ।
धूर्तिप्रियाय दुरितक्षयकारणाय
चन्द्रेश्वराय शिवभूतधवाय ते नमः ।।३।।

चन्द्रेश्वर भूतनाथ नमस्तुभ्यं त्वभीष्टद ।
मम सिद्धिमसिद्धिं वा स्वप्ने सर्वं प्रदर्शय ।।४।।

श्रींची मूर्ति ध्यानी आणून भक्तिभावाने पठण केल्याने भाविकांची मनकामना पुर्ण करणारी श्री चन्द्रेश्वर भूतनाथ चतुःश्लोकी विनवणी :–

सद्विद्या भाग्य दे चन्द्रेश्वर त्वद्गुण गावया ।
आरोग्यायु महेश्वर तुझी सेवा करावया ।।१।।
शक्ति दे नयना भूतनाथा दर्शन घ्यावया ।
पुण्यपीठा आदिनाथा दे त्वत्पदी रमावया ।।२।।
धनधान्यादि दे आम्हा दानधर्म करावया ।
सं-विघ्न-नीवनी ठाव लाभो शांति क्षमा दया ।।३।।
सत्समागम हि दावा स्वस्वरूप करावया ।
देवा विनवणी आता सच्चिदानंद दावी या ।।४।।

" चन्द्रेश्वर भूतनाथा आम्हा ठाव दावा आता "
हा मंत्र वरील श्लोकात गुंफला आहे.

सौजन्य:- 'श्री चंद्रेश्वर भूतनाथ देवस्थानातील पुस्तक पत्रिका'

### ३.३.४ 'श्री पुरुषम्हारू राखणदाराची आरती, अभंग'

## आरती श्री पुरूषम्हारूची

जय देवा जय देवा जय पुरुषम्हारू
आरती ओवळू तुजला सर्वेशा
जुवारी तीरी स्थान । विराजेक जयाते ।।
दर्शन नामे ज्याच्या । वारी क्लेशातें ।।
पावे क्षणी भावे । करीता नवसातें ।।
नाम घेता रोग । जाती विलयातें ।। १ ।। जय
महा संकट येता । नीज भक्तावरी ।।
साक्षात्कार दाऊनी । देसी अभयांते ।।
पडता संकटी भक्त । सांभाळशी त्यातें ।।
किर्ती जगती तुझी । भक्तगण गाती ।। २ ।। जय
स्थापिली नुतन मुर्ती । मंगल दिनी ।।
चैत्र मास तव । उत्सव करीती ।।
अगम्य महीमा । वर्णावा किती ।।
भक्ती भावे येती शरण ।
होतसे कल्याण ।। ३ ।। जय

## अभंग

रूप पाहता हे सर्वेशा
माझे नमन श्री पुरूषम्हारू देवा
कुड्डेश्वराच्या पूर्ण कृपेने
मिटवी दुरीते भक्त गणांची ।।१।।
रूप तुझे उज्वल तेज मनोहर
डोईवर शोभे फेटा शूभ्र ।।२।।
हाती खडग दिव्य जोत
दावी सकला निरंतर ।।३।।
अनंत जन्माची ही पुण्याई
म्हणोनी झाले आम्हा दर्शन देवा ।।४।।

## नामस्मरण (गजर)

सतपुरूषा, महापुरूषा,
श्री पुरूषम्हारू देवा ।।
तुज विणा आम्हा नाही ठावा ।।

## ❋ श्री पुरूषम्हारू नमस्काराष्टक ❋

चंद्रेश्वराचा राखणदेव ।। भुतखेतांचा नोहे भेव ।।
अगम्य जयाच्या लिला ।।
नमस्कार अमुचा श्री पुरूषम्हारूला ।।१।।
दिव्य ज्योत खडग् दण्ड धारी ।। कांबळ खांद्यावरी ।।
चिपळ्यांचा ख निनादला ।।
नमस्कार अमुचा श्री पुरुषम्हारूला ।।२।।
तुझ्या कृपेने शुभ मुहूर्त तिथी ।। स्थापिली तुझी नुतन मुर्ती ।।
मंगलमय झाला सोहळा ।।
नमस्कार अमुचा श्री पुरूषम्हारूला ।।३।।
आर्त करीता विनवणी ।। भावें नमीतां चरणी ।।
धांवत येई हाकेला ।।
नमस्कार अमुचा श्री पुरूषम्हारूला ।।४।।
रात्री अपरात्री सदनासी जातां ।। लक्ष ठेवी अपुल्या भक्तां ।।
पोंचवी त्यासी सदनाला ।।
नमस्कार अमुचा श्री पुरूषम्हारूला ।।५।।
शुभ मनें घालीतां साद ।। त्वरीत लाभे प्रतिसाद ।।
प्रचीती भक्तजनाला ।।
नमस्कार अमुचा श्री पुरूषम्हारूला ।।६।।
कुडचडेंच्या ग्रामांतरी ।। जुवारीच्या शुभतिरीं ।।
वसे राखणदेव भला ।।
नमस्कार अमुचा श्री पुरूषम्हारूला ।।७।।
एक मागणें तव पाया ।। दृढ राहो आमच्यावरी दया ।।
अभय दे आम्हां पामराला ।।
नमस्कार अमुचा श्री पुरूषम्हारूला ।।८।।
नमस्कार अमुचा श्री पुरूषम्हारूला
नमस्कार अमुचा श्री पुरूषम्हारूला

**सौजन्य:- 'श्री पुरुषम्हारू संस्थान संपादित पत्रिका'**

# परिशिष्ट ४

# प्रबंधिकेतील कठीण शब्द

- ‘राझु’ :- नारळाच्या सोणा कात्यापासून बनवलेली दोरी.
- ‘बेतकाडी’ :- दसऱ्यारा अवसर येणारा व्यक्ती हातात घेतो (बेत्याची बडी).
- ‘शेणाची गायर’ :- एखादा खूप शेण एकटी केलेली जाग .
- ‘गाऱ्हाणे’ :- देवाला सांगणे, ह्याला ‘सांगणे करणे’ असेही म्हणतात.
- ‘कोपर’ :- दर महिन्यात पैसे सांभाळून ते व्याज वर इतरांना देणे (सेल्फ हेल्प ग्रुप).
- ‘व्होर’ :- वरात.
- ‘सावत’ :- विधीसाठी मारलेल्या प्राण्यांची बळी.
- ‘फातोर’ :- दगड (पाषाणी दगड).
- ‘फोण’ :- खड्डा.
- ‘भूलोन’ :- फसवून.
- ‘शेपल्या माडा शेंद्री’ :- माडाच्या चुट्टीपासून विर काढून केलेली शेंद्री.
- ‘मुतारी’ :- राखणदाराच्या हातात असलेली बडी ज्याला घुंगरू असतात.
- ‘गोभ्याची पूजा’ :- केळीच्या गोभ्याची पूजा.
- ‘आडमेळ’ :- अडखळे निर्माण करणे.
- ‘डोचणे’ :- एखादा विधीसाठी चामडीतून सुई टोचून धागा ओवतात त्याला गडा‘डोचणे’ असे म्हणतात.

- ‘भार’ :- अवसर.
- ‘शेंस घालणे’ :- देवी समाजात मुलींना देवासोबत लग्न करण्याची विधी (देविदासी प्रथा).
- ‘मेस्त’ :- सुतार.
- ‘मडवळ’ :- धोबी समाज, परीट.
- ‘सावरीची मेड’ :- सावरी झाडाची फांदी तोडून (ताळे साकळून) केलेली मेड.
- ‘शेण्या उजो’ :- सुक्या गोवरीला आग पेटवून खेळली जाणारी होळी.
- ‘दोणे’ :- फणसाच्या पानांत तांदूळाचे पीठ त्यात पंचखाद्य घालून बनवलेला पदार्थ.
- ‘भोवंडी’ :- शिकारीला जाणे, विधीशी संबंध असलेली शिकार.
- ‘थळ’ :- जागा.
- ‘खेत्री’ :- भूत, प्रेत.
- ‘फणी’ :- केस सावरण्याची फणी.
- ‘पुरीस’ :- मंदिरासमोरील खांबा.
- ‘रोट’ :- केळीच्या पानावर तांदळाच्या पिठात गुड घालून चुलीवर वाचलेली भाकर.
- ‘फाके फुटणे’ :- फांदी येणे.
- ‘सवाई’ :- पूर्वीच्याकाळी लढाईला जाण्यासाठी तयार झालेला गडी शिपाई.
- ‘वाजंत्री’ :- दैवताच्या उत्सवावेळी वाद्ये वाजवणारी लोक.
- ‘गळसरी’ :- स्त्रियांच्या गळयात घालण्याचे एक प्रकारचे दागिने.
- ‘गोरवा’ :- गाय, म्हैस.
- ‘बोणी मारणे’ :- पावणी लावणे.
- ‘करो’ :- लग्नात करवली हातात धरणारी मातीची मडकी.

- ‘वाशो’ :- समशानभूमीत मृत्यू वेळी वापरणारा मातीचा मडका.
- ‘व्हड्याचेर’ :- बोटीवर.
- ‘फोपार मारलो’ :- लाथ मारणे.
- ‘आरमा’ :- बंदूक.
- ‘माडा सोरो’ :- माडाच्या झाडापासून बनवलेले मद.
- ‘कांट्याची पणti’ :- रानातील  एक कडूफळजे दिवाळीच्या दिवशी रावण म्हणून पायाखाली ठेवून फोडतात.
- ‘खेडे’ :- मृत्यूनंतर आठवणीसाठी बांधली जाणारी लहान मंदिर (घुमटी).
- ‘गण’ :- दैवतांच्या खाली असणारे गाव राखणारे लहान राखणदार त्यांना ‘गण’ म्हणतात.

# संदर्भसूची

**अ) ग्रंथसूची (मराठी)**


1. मांडे, प्रभाकर. '*लोकसाहित्याचे स्वरूप*'. सविता प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती १९७८.
2. मोरजे, गंगाधर. '*इतिहास आणि लोकसाहित्य*'. दस्ताने रामचंद्र आणि कं ८३० सदाशिव पेठ पुणे ४११०३०.
3. मोरजे, गंगाधर. '*लोकसाहित्याचे बदलते संदर्भ; बदलती रूपे*'. पद्मगांधा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती १९९७.
4. ढेरे, रा. ची. '*लोकदैवतांचे विश्व*'. अरुण जाखडे पद्मगंगा प्रकाशन, पुणे १९९६.
5. प्रभू देसाई, उल्हास. '*गंगावळ्ळी पर्थगाळ्ळी नेत्रावळ्ळी शंखावळ्ळी*'. श्री चंद्रेश्वर केपे, जानेवारी २००३.
6. प्रभू देसाई, उल्हास. '*लोकवेदाचे कुळ नि मुळ*'. गोमंतक मराठी अकादमी-पर्वरी २००५.
7. भागवत, दुर्गा. '*लोकसाहित्याची रूपरेखा*'. वरदा बुक्स ३९७/१, सेनापती बापट मार्ग पुणे ११, प्रथम आवृत्ती १९५६.
8. गमे, भाऊसाहेब., धनगर, धनराज. '*लोकसाहित्याचे संशोधन*'. प्रशांत पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती २०१६.
9. कुबल, रमेश. '*लोकसाहित्याचे अतरंग*'. मुंबई विद्यापीठ-मराठी विभाग आणि शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर प्रथम आवृत्ती २०१४.
10. फळ देसाई, पांडुरंग. '*गोमंतक संस्कृतीच्या पाऊलखुणा*'. वैभव फोंडेकर-गरग मित्र समाज प्रकाशन, प्रथम आवृत्ती २०१३.
11. फळ देसाई, पांडुरंग. '*गोमंतकीय लोकवाद्ये*'. मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे प्रथम आवृत्ती १९९२.
12. भोसले, द. त्ता. '*लोकसंस्कृती: स्वरूप आणि विशेष*'. पद्मगंधा प्रकाशन पुणे, २७ मे २००४.
13. व्यवहारे, शरद. '*लोकसंस्कृतीचा अंतप्रवाह*'. प्रतिमा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती १९९९.
14. ढेरे, अरुणा. '*आठवणीतील अंगण*'. पद्मगाधा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती १९९९.
15. सातोस्कर, बाळकृष्ण. '*गोमंतक: प्रकृती आणि संस्कृती*'. शारदीय प्रकाशन पणजी गोवा,खंड १ प्रथम आवृत्ती: १९७९

16. देसाई, रत्नाकर राघोबा. *'गोवा स्थळ नामाची जडणघडण'*. सरिता रत्नाकर देसाई, २०१५.

17. पर्वतकर, अरुण. *'गोमंतक परिसर परिचय'*, गोमंतक मराठी अकादमी गोवा, १९९६.

18. मडगावकर, विनय. *'लोकसाहित्याचा अभ्यास संशोधन व आव्हाने'*. प्रकाशन, गोवा विद्यापीठ मराठी विभाग, २१ फेब्रुवारी २०१९.

19. वाकोडे, मधुकर. *'मराठी लोककथा'*. साहित्य अकादमी, नवी दिल्ली, १९९२.

20. नायक, दामोदर काशिनाथ. *'गोमंतकाचे अतरंग'*. राजहंस वितरण, पणजी, १९९६.

**आ) ग्रंथसूची (कोंकणी)**

1. नायक, जयंती. *'कोंकणी लोककाण्यो'*. साहित्य अकादमी, २०००

2. नायक, जयंती. *'अमोणे - एक लोकजीण'*. गोवा कोंकणी अकादमी, १९९३.

**ब) कोष, प्रबंध, इत्यादी**

3. जोशी, महादेवशास्त्री. *'भारतीय संस्कृती कोश'*. खंड चौथा.

4. माजिक, चंद्रकांत दुर्गेश. *'गोमंतकीय लोकनाट्याच्या अनुषंगाने 'रणमालेचा' चिकित्सात्मक अभ्यास'*. गोवा विद्यापीठ २०२१

5. मराठी विश्वकोश,.'लोकदैवत'. Google Play app

6. अय्या, हेमंत. 'गोमंतकातील काणकोण, तालुक्यातील लोकसाहित्य चिकित्सक अभ्यास'. २०२३

7. संपादक जोशी, सागर अशोक. लटके, नीला गिरीश.*'लोकसाहित्य व लोककला'*. भाग. एम. ए १, मराठी, डॉ. व्ही. डी नांदवडेकर कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

**क) स्मरणिका, नियतकालिका**

1. प्रभू देसाई, उल्हास., फळदेसाई, निलेश., देसाई, योजना., *'बाळ्ळीपुर…श्री शांतादुर्गा बाळ्ळीकरीण संस्थातर्गत श्री कुनेश्वर देवस्थानाचा आचार्यशुद्धी वास्तूयाग सोहळा'*.१० मार्च २००२

2. श्री क्षेत्र श्री चंद्रेश्वर भूतनाथ देवस्थान. पर्वत-चंद्रवाडी.

3. मणगुतकर, आशा. ‘*चंद्रवाडी*’. २४ गोमंतक मराठी साहित्य संमेलन २००१, केपे गोवा.

**ड) वृत्तपत्र**

1. दसरोत्सव. ‘श्री शांतदुर्गा कुंकळ्ळीकरीण संस्थान’, ‘श्री शांतदुर्गा बाळ्ळीकरीण संस्थान’, ‘श्री शांतादुर्गा चामुंडेश्वरी कुडतरी महामाया’, ‘श्री शांतादुर्गा फातर्पेकरीण संस्थान’, ‘श्री सातेरी मंदिर, कुडचडे’. लोकमत गोवा २०२३.
2. असोल्डा, ‘श्री सातेरी ग्रामदेवीचा जात्रोत्सव’, तरुण भारत, २६ जानेवारी २०२२.
3. ‘शांतादुर्गा कुंकळ्ळकारीण जात्रोत्सव’, तरुण भारत, जानेवारी २०२३.
4. ‘शांतादुर्गाच्या चामुंडेश्वरी’, तरुण भारत, जानेवारी २०२३.

**प) व्यक्तीनामसूची**

1. **संतोश गावकर** ( लोककलाकार)- सोलय कुडचडे, वय ६२.
2. **प्रांजली शिरोडकर** (गृहिणी ) - माध्येगाळ, ककोडा, वय ४८.
3. **सुरेश विठोबा सावंत देसाई** (लोककलाकार) - गुन्यार, ककोडा, वय ७७ .
4. **शंभू गावकर** (लोककलाकार) – मळकर्णे, वय ७०.
5. **महादेव गावस देसाई** (लोककलाकार) – शेल्डे, वय ६०.
6. **योगिता रायकर** (शिक्षिका) – कोठंबी, वय ४०.
7. **विश्वनाथ प्रभूदेसाई, मुळी** (जल्मी मंदिरातील पुजारी) – काकोडा, वय ५६.
8. **रामचंद्र घाडी** (देवाची पूजा करणारा घाडी) – घाडीवाडा, वय ६९.
9. **कांता घाडी** (लोककलाकार) – घाडीवाडा, वय ५२.
10. **कृतिका गुरुनाथ नाईक** (विद्यार्थी) – व्हरा, वय २४.
11. **फाल्गुन परवार** (लोककलाकार) - महारवाडा, ककोडा, वय ५८
12. **केशव आदेल** (लोककलाकार) - माड, बाणसाय, वय ५५
13. **विठ्ठलदास मोरतु कामत** ( पुजारी) - बाळ्ळी, मठ, वय ७५.

14. **शंभू गावकर,** (लोककलाकार) – आंबावली, वय ८०.

15. **किशोर खोलकार** (माजी शिक्षक) - बाळ्ळी, मठ, वय ५४.

16. **विश्वमित्र वस्ता** (लोककलाकार) – कुडचडे, वय ६९

17. **मनोज बर्वे** (पुजारी )-बाळ्ळी, वय ७३.

18. **प्रदीप वामन जोशी** (पुजारी) केपे, वय ५६.

19. **शिल्पा देविदास** (गृहिणी) – काकोडा, वय ५१.

20. **प्रसाद शिरोडकर** (लोककलाकार) – काकोडा, वय ५४.

21. **विनय खोलकर** (लोककलाकार) – बाळ्ळी, ५२.

22. **लवू घाडी** (घाडी/ पुजारी देवाची पूजा, विधी करणारा) – घाडीवाडा, वय ६९.

23. **आशा प्रशांत खोलकर** (गृहिणी) – बाळ्ळी, वय ४९.

24. **विकास रायकर** (लोककलाकार) – मळकर्णे, वय ४८.

25. **ब्रिनि परवार** (विद्यार्थी)- महारवाडा, काकोडा, वय २४.

**फ) संकेतस्थळ**


1. **https://en.m.wikipedia.org/wiki/Quepem_taluka**
2. **https://en.m.wikipedia.org/wiki/File:Quepem_taluka_in_South_Goa_district.png**
3. **http://www.eindiatourism.com/goa-india-maps/quepem-goa-indiamaps.html**
4. **https://youtu.be/Dd6B7e48OZw?si=vJbjlKTVEJGIh-_o**
5. **https://youtu.be/NhSjuAIxyGU?si=2F4eQ82LC9vRB9Zs**
6. **https://youtu.be/zRqGMbM4Qrk?si=dIfb8_DpZpxmDVlD**
7. **https://youtu.be/0dmAP9UwFJU?si=iwBuBCg2VCabjcNW**